शनिवार
१३
सप्टेंबर २०२५
अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १९१
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



रजत पाटीदारचा शतकी तडाखा! (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### आत्महत्येचे पाऊल उचलू नये - छगन भुजबळ



**लातूर :** मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाबाबतच्या यशस्वी आंदोलनामुळे, ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या नैराश्यातून लातूरच्या भरत महादेव कराड या तरुणाने आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना काल घडली. त्यामुळे आज, ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी मृत तरुणाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यादरम्यान त्यांनी, ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आपण लढत आहोत. आपल्या देशात लोकशाही व्यवस्था असून न्यायव्यवस्थेवर आपला पूर्णपणे विश्वास आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी आपण न्यायालयीन आणि प्रसंगी रस्त्यावरील दोन्ही लढाया देखील लढू. त्यामुळे कोणीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन ओबीसी समाजाला केले आहे.

### राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा इशारा

**मुंबई :** हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील चार दिवस महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक वाढणार असून १३ सप्टेंबर रोजी मराठवाडा प्रदेशात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १३ व १४ सप्टेंबरला कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः विदर्भ मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाचा जोर अधिक राहणार असून, कोकण किनारपट्टी, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. रविवारपासून विदर्भात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता असून मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीवर पावसाला पोषक वातावरण असण्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे.

### सरकारच्या धोरणांवर वडेट्टीवार यांचा घणाघात

**नागपूर :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील वांगदारी गावातील भरत कराड या ३५ वर्षीय तरुणाने जीवन संपवल्याचे वृत्त आहे. हे वृत्त धक्कादायक आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निराशेने या तरुणाने टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. गेले काही दिवस मुख्यमंत्र्यांपासून ते ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष सांगत आहे की, सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या हक्कावर गदा येणार नाही. पण हाच सरकारचा विश्वासघात आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. मराठा समाजासाठी काढण्यात आलेल्या जीआर मध्ये आधी पात्र हा शब्द होता आणि अवघ्या काही तासात दुसरा जीआर काढून त्यातून पात्र हा शब्द वगळण्यात आला.

## स्वच्छ हवेचा अधिकार देशातील सर्वच नागरिकांना : सरन्यायाधीश

# संपूर्ण देशात फटाक्यांवर बंदी येणार?





■ सरन्यायाधीश म्हणाले की, मी गेल्या वर्षी हिवाळ्यात अमृतसरला गेलो होतो. तेथील प्रदूषण दिल्लीपेक्षाही वाईट होते. जर फटाक्यांवर बंदी घालायची असेल तर संपूर्ण देशात बंदी घातली पाहिजे. संपूर्ण देशात प्रदूषण रोखण्यासाठी धोरणे राबवण्यावर भर दिला.

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

नॅशनल कॅपिटल रिजन अर्थात एनसीआर उर्फ दिल्लीमधील शहरांना हवा स्वच्छ करण्याचा अधिकार आहे, तर इतर शहरांतील लोकांना का नाही? स्वच्छ हवेचा अधिकार फक्त दिल्ली-एनसीआरपुरता मर्यादित असू शकत नाही, तर संपूर्ण देशातील नागरिकांना तो मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन सरन्ययाधिश भूषण गवई यांनी केले आहे. प्रदूषण नियंत्रणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने ही महत्त्वाची टिप्पणी केली आहे.

दिल्लीमध्ये फटाक्यांवर बंदी घालण्याच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश गवई म्हणाले की, पर्यावरण धोरण जे काही आहे ते संपूर्ण भारताच्या पातळीवर असले पाहिजे. देशातील उच्चभ्रू वर्ग येथे आहे म्हणून आपण दिल्लीसाठी धोरण बनवू शकत नाही. जर फटाक्यांवर बंदी घालायची असेल तर संपूर्ण देशात बंदी घातली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाची ही टिप्पणी ३ एप्रिल २०२५ च्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान आली. याचिकेत दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांची विक्री, साठवणूक, वाहतूक आणि उत्पादनावर पूर्ण बंदी घालण्याच्या आदेशात सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान, अमिकस वरिष्ठ वकील अपराजिता सिंह म्हणाल्या की, उच्चभ्रू वर्ग स्वतःची काळजी घेतो. प्रदूषण झाल्यावर ते दिल्लीतून बाहेर पडतात. दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याच्या विरोधात दाखल झालेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंटला नोटीस बजावली आणि दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले. यापूर्वी, एप्रिलमध्ये दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांवर बंदी घालण्याच्या प्रकरणाची सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाने ते अत्यंत आवश्यक असल्याचे म्हटले होते. ही बंदी काही महिन्यांपुरती मर्यादित ठेवून कोणताही उद्देश साध्य होणार नाही. लोक वर्षभर फटाके गोळा करतील आणि बंदी लागू झाल्यावर त्यांची विक्री करतील.

# महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापतींसाठी आरक्षण जाहीर

* अकोला, वाशिम : अनुसुचित जमाती महिला प्रवर्ग
* बुलडाणा, यवतमाळ : सर्वसाधारण प्रवर्ग
* अमरावती : सर्वसाधारण महिला प्रवर्ग

**मुंबई, दि. १२ वृत्तसंस्था**



महाराष्ट्रात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीआधी केंद्रीय निवडणूक आयोग बिहार प्रमाणेच महाराष्ट्रातही मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग लवकरच होणार असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तयारी करत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतींसाठी आरक्षण जाहीर केले. एकूण ३४ जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले.

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या आरक्षणाच्या शासन निर्णयानुसार अर्थात जीआरनुसार, ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. पालघर जिल्हा परिषदेच्या ( पान २ वर)

### जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण:

**ठाणे:** सर्वसाधारण (महिला)
**पालघर:** अनुसूचित जमाती
**रायगड:** सर्वसाधारण
**रत्नागिरी:** नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
**सिंधुदुर्ग:** सर्वसाधारण
**नाशिक:** सर्वसाधारण
**धुळे:** नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
**नंदुरबार:** अनुसूचित जमाती
**जळगाव:** सर्वसाधारण
**अहमदनगर:** अनुसूचित जमाती (महिला)
**पुणे:** सर्वसाधारण
सातारा: नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
**सांगली:** सर्वसाधारण (महिला)
**सोलापूर:** नागरिकांचा मागास प्रवर्ग
**कोल्हापूर:** सर्वसाधारण (महिला)
**छत्रपती संभाजीनगर:** सर्वसाधारण
**जालना:** नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
**बीड:** अनुसूचित जाती (महिला)
**हिंगोली:** अनुसूचित जाती
**नांदेड:** नागरिकांचा मागास प्रवर्ग
**धाराशिव:** नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
**लातूर:** सर्वसाधारण (महिला)
**अमरावती:** सर्वसाधारण (महिला)
**अकोला:** अनुसूचित जमाती (महिला)
**परभणी:** अनुसूचित जाती
**वाशिम:** अनुसूचित जमाती (महिला)
**बुलडाणा:** सर्वसाधारण
**यवतमाळ:** सर्वसाधारण
**नागपूर:** नागरिकांचा मागास प्रवर्ग
**वर्धा:** अनुसूचित जाती
**भंडारा:** नागरिकांचा मागास प्रवर्ग
**गोंदिया:** सर्वसाधारण (महिला)
**चंद्रपूर:** अनुसूचित जाती (महिला)
**गडचिरोली:** सर्वसाधारण (महिला)

## आक्षेपार्ह पोस्ट: कंगनाला दिलासा देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**



शेतकरी आंदोलनाविरोधात मंडीच्या खासदार, अभिनेत्री कंगना राणावत हिने केलेल्या आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी दिलासा देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या पोस्टमध्ये कंगनाने अनावश्यक मसाला घातल्याने आंदोलकांची किंमत राहिली नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर हा खटला सुरू आहे. बॉलीवूड अभिनेत्री कंगना राणावतने शेतकरी आंदोलनावर पोस्ट केली होती. न्यायालयाने म्हटले आहे की, ही सामान्य ट्विट नव्हती. तुम्ही त्यात अनावश्यक तपशील दिला आहे. तुम्ही तुमच्या कमेंटबद्दल काय म्हणता? म्हणून हा खटला रद्द करण्याच्या याचिकेत त्याचे स्पष्टीकरण विचारात घेतले जाऊ शकत नाही. तुमचे स्पष्टीकरण कनिष्ठ न्यायालयासाठी योग्य आहे, पण सर्वोच्च न्यायालयासाठी ते आक्षेपार्हच आहे. भाजप खासदार कंगना राणावतने कथितपणे बदनामीकारक विधाने केल्याच्या प्रकरणात तक्रार रद्द करण्याची विनंती करणारी याचिका मागे घेतली आहे. खंडपीठाने याचिकेवर विचार करण्यास अनिच्छा दर्शविल्यानंतर, कंगनाच्या वकिलाने याचिका मागे घेतली. अभिनेत्री-राजकारणी कंगनाने २०२०-२१ च्या कृषी कायद्यांविरुद्धच्या शेतकरी आंदोलनादरम्यान एका महिला निदर्शकाबद्दल टिप्पणी करणाऱ्या तिच्या पोस्टबद्दलच्या मानहानीच्या तक्रारीला आव्हान दिले. तक्रारदार, महिंदर कौर (७३) ही पंजाबच्या भटिंडा जिल्ह्यातील बहादुरगड जांडियन गावची रहिवासी आहे. तिने जानेवारी (पान २ वर)

# नेपाळची संसद बरखास्त!

## सुशीला कार्की हंगामी सरकारचे नेतृत्व करणार



**काठमांडू : दि. १२ वृत्तसंस्था**

### नेपाळमध्ये आणीबाणीची घोषणा होण्याची शक्यता

देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता, आणीबाणी लागू करण्याची घोषणा होऊ शकते. हंगामी सरकारच्या शिफारशीनुसार, राष्ट्रपती आज रात्री १२ वाजल्यापासून संपूर्ण नेपाळमध्ये आणीबाणी जाहीर करू शकतात. नेपाळच्या संविधानाच्या कलम २७३ नुसार, जर देशात कोणत्याही प्रकारची आपत्ती, युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा सशस्त्र बंडखोरी झाल्यास, अशा परिस्थितीत देशात जास्तीत जास्त ६ महिन्यांसाठी आणीबाणी जाहीर केली जाऊ शकते. या काळात, संपूर्ण देशाची सुरक्षा व्यवस्था लष्कराच्या हातात येते.

नेपाळमध्ये जेन-झी च्या नेतृत्वाखालील हिंसक आंदोलनांनंतर निर्माण झालेल्या राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती राम चंद्र पौडेल यांनी सध्याची संसद बरखास्त केली. दरम्यान, माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांना हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रपती पौडेल यांच्यासोबत लष्करप्रमुख जनरल अशोक राज सिग्देल यांच्या उपस्थितीत जेन-झी समूहांसोबत झालेल्या बैठकीत सुशीला कार्की यांच्या नावाला हंगामी सरकारच्या प्रमुख म्हणून मान्यता मिळाली. यानंतर राष्ट्रपती पौडेल यांनी कार्की यांना भेटीसाठी बोलावून ही जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली, जी नेपाळच्या माजी सरन्यायाधीशांनी मान्य केली. आज, शुक्रवारी (दि. १२) रात्री राष्ट्रपती भवनात त्यांचा शपथविधी सोहळा पार पडेल. पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना त्यांच्या सरकारविरोधात भ्रष्टाचार, (पान २ वर)

## मुंबई हायकोर्टात बॉम्ब ठेवल्याची धमकी !

**मुंबई :** दिल्ली उच्च न्यायालयानंतर आता मुंबई उच्च न्यायालयालाही बॉम्बची धमकी मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनंतर मुंबई पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि संपूर्ण कॅम्पसची तपासणी करत आहेत. खबरदारी म्हणून, सर्व न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि अभ्यागतांना न्यायालय परिसर तात्काळ रिकामा करण्यात आला. दरम्यान, तपासणीत काहीही संशयास्पद आढळून न असल्याने सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. दिल्ली उच्च न्यायालयानंतर आता मुंबई उच्च न्यायालयालाही बॉम्बची धमकी मिळाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांना दुपारी बॉम्बस्फोटाची धमकी देणारा ईमेल आला. यानंतर पोलिसांनी संपूर्ण न्यायालयाचा परिसर रिकामा केला. याप्रसंगी बॉम्बच्या धमकीनंतर, शोध मोहीम राबवण्यात आली आहे.

# आरक्षणावरून भुजबळ-जरांगे यांच्यात जुंपली!

## अजून जरांगेशाही यायची आहे - भुजबळ

**जालना, दि. १२ वृत्तसंस्था**



मुंबई येथे मनोज जरांगे यांचे आंदोलन सुरु झाल्यानंतरही ओबीसी नेते छगन भुजबळ शांत होते. जरांगे यांनीही त्यांच्यावर टीका करणे टाळले होते. भुजबळ आणि जरांगे यांच्यातील वाकयुध्द जणू थांबल्यात जमा झाले होते. परंतु, जरांगे यांचे आंदोलन संपविण्यासाठी राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भातील जीआर काढला. यानंतर काही महिन्यांपासून शांत असलेले भुजबळ आक्रमक झाले. भुजबळ यांनी या जीआरवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यावर जरांगे यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले. यामुळे भुजबळ-जरांगे वाकयुध्दाचा नवीन अंक सुरु झाला आहे.

मुंबईतील मराठ्यांच्या आंदोलनानंतर शासन निर्णय जाहीर झाल्यावर आता हा विषय संपला असे सर्वांना वाटत होते. परंतु, त्यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. ओबीसी समाजाचे वेगवेगळे नेते आपआपली भूमिका मांडत आहेत. ओबीसींचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी नाशिक येथे मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण हवे का, हे राज्यातील मराठा नेत्यांनी आणि मंत्र्यांनी स्पष्ट करावे, असे आवाहन केले. पूर्वी खुल्या प्रवर्गात असलेल्या मराठा समाजाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० टक्के आरक्षण दिले. आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासांसाठी हे (पान २ वर)

## सुनावणी

## प्रकरण उच्चस्तरीय समितीकडे वर्ग करण्याबाबत सर्वांचे एकमत

# माधुरी हत्ती प्रकरण : कोल्हापूरला पाठविण्यावर तूर्तास निर्णय नाही!

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

**कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील जैन मठात ३३ वर्षांपासून असलेली माधुरी उर्फ महादेवी हत्ती परत कोल्हापूरला पाठवण्यावर सर्वोच्च न्यायालयात आज, शुक्रवारी सुनावणी झाली. मात्र, तातडीने कोल्हापूरला पाठवण्याबाबत कोणताही निर्णय देण्यात आलेला नाही. हे प्रकरण आता एका उच्चस्तरीय समितीकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे न्यायालयात सर्व पक्षकारांनी मान्य केले आहे.**



हत्तीचे नाव : - महादेवी उर्फ माधुरी
स्थान :- जैन मठ, नांदणी (कोल्हापूर)
विवादाचा मुद्दा :- धार्मिक भावना -विरुद्ध- प्राणी कल्याण
कोर्ट निर्णय :- तातडीचा निर्णय नाही, प्रकरण उच्चस्तरीय समितीकडे

याप्रकरणाच्या सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्या वकीलांनी सांगितले की, माधुरी हत्ती कोल्हापुरातून जामनगरमधील वनतारा पुनर्वसन केंद्रात हलवण्यात आली असून, स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन तिला परत कोल्हापूरला आणावे, अशी आमची भूमिका आहे. यावर न्यायालयाने हत्तीची प्रकृती चिंताजनक असल्याचे निरीक्षण नोंदवत, आम्ही वनताराशी संवाद साधू, असे म्हटले. तसेच कोर्टाच्या निर्णयापेक्षा लोकांच्या भावना अधिक महत्त्वाच्या का? असा थेट सवाल देखील राज्य सरकारच्या वकिलांना विचारण्यात आला. हायपॉवर कमिटी म्हणजे नेमकं काय ? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.

त्यावर राज्य सरकारने हे प्रकरण त्या समितीकडे वर्ग करण्यात येईल, असे स्पष्ट केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माधुरी हत्तीला जामनगरमधील 'वनतारा' पुनर्वसन केंद्रात हलवण्यात आले होते.

या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. स्थानिक नागरिक, मठाचे संत आणि अनुयायी हत्तीच्या परतीसाठी आग्रही असून, राज्यभर या प्रकरणावरून तीव्र चर्चा सुरू आहे. दुसरीकडे, प्राणीसंवर्धन संस्था आणि कायदेमंडळ हत्तीच्या आरोग्य व कल्याणाला प्राधान्य देण्याच्या भूमिकेत आहेत.

## उड्डाणानंतर विमानाचे चाकच धावपट्टीवर पडले!



**मुंबई, दि. १२ वृत्तसंस्था**

गुजरातमधील कांडला येथून मुंबईला येणाऱ्या स्पाइसजेटच्या ४०० विमानाचे बाहेरील चाक उड्डाणानंतर लगेचच धावपट्टीवर निखळून पडले. त्यामुळे हे विमान मुंबईत उतरताना पायलटने आपत्कालीन स्थिती जाहीर केली होती, मात्र सुदैवाने अनर्थ टळला आणि विमान सुरक्षितपणे मुंबईच्या धावपट्टीवर उतरले.

झाले असे की, स्पाइसजेटच्या बॉम्बार्डियर ८-४०० या विमानाने, ज्याचा उड्डाण क्रमांक -२९०६ होता, शुक्रवारी दुपारी २.३९ वाजता कांडला विमानतळाच्या धावपट्टी क्रमांक २३ वरून उड्डाण केले. उड्डाणानंतर लगेचच टॉवर कंट्रोलरला धावपट्टीवर विमानातून एक मोठी काळी वस्तू पडताना दिसली. दरम्यान तपासणी पथकाने जाऊन पाहिले तेव्हा तिथे विमानाचे चाक पडलेले त्यांना आढळले. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुपारी १५:५१ वाजता तांत्रिक बिघाडाची नोंद झाल्यानंतर विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. खबरदारी म्हणून (पान २ वर)

# पान 1 वरून...

## महाराष्ट्रातील ३४ जिल्हा ...

अध्यक्षपदाची जागा ही अनुसुचित जमातीसाठी राखीव आहे. रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, बुलडाणा, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर अशा आठ जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण प्रवर्गाचं आरक्षण जाहीर झालं आहे. सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या सहा जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे. पालघर, नंदुरबार या दोन जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहे. अहिल्यानगर, अकोला, वाशिम या तीन जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद अनुसुचित जमाती महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. परभणी, हिंगोली, वर्धा या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद हे अनुसुचित जातीसाठी आरक्षित आहे. बीड आणि चंद्रपूर जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद अनुसुचित जाती महिला प्रवर्गसाठी आरक्षित आहे. रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, धाराशिव या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित आहे. भारत निवडणूक आयोगाने देशव्यापी सखोल पुनरावलोकन मोहिमेच्या तयारीसाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची परिषद नवी दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसी अँड इलेक्टोरल मॅनेजमेंट येथे आयोजित केली. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी उपस्थित होते. परिषदेत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रातील मतदारसंख्या, मागील एसआयआरची पात्रता आणि मतदार यादी डिजिटायझेशनची माहिती सादर केली. भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या सुसूत्रीकरणासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर जास्तीत जास्त १,२०० मतदार असावेत, यासाठी मतदार केंद्रांचे पुनर्गठन करण्यात आले आहे. याशिवाय, कोणताही पात्र नागरिक मतदार यादीतून वगळला जाणार नाही आणि अपात्र व्यक्तींचा समावेश होणार नाही, याची खबरदारी घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची शिफारस करण्यात आली आहे. या आरक्षणामुळे जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत महिलांना आणि मागासवर्गीय उमेदवारांना मोठी संधी मिळणार आहे. या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे.

## आक्षेपार्ह पोस्ट: कंगनाला ...

२०२१ मध्ये भटिंडा येथे तक्रार दाखल केली. भटिंडा न्यायालयात केलेल्या तिच्या तक्रारीत दावा करण्यात आला आहे की, कंगनाने तिच्यावर खोटे आरोप केले आहेत. कंगना म्हणाली होती की, ही तीच दादी आहे, जी शाहीन बाग निषेधाचा भाग होती. कंगनाच्या वकिलाने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात युक्तिवाद केला होता की भटिंडा न्यायालयाचा समन्स आदेश टिकाऊ नाही कारण तो फौजदारी प्रक्रिया संहितेचे उल्लंघन करतो.

## आरक्षणावरून भुजबळ-जरांगे ...

१० टक्के आरक्षण होते. यानंतर राज्यात मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षण देण्यात आले. असे असतानाही आता मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी आंदोलन केले जात असल्याने भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. मराठा समाजाला १० टक्के इडब्लूएस, राज्य सरकारने दिलेले १० टक्के आरक्षण आणि खुल्या प्रवर्गाचे यापैकी कोणतेही आरक्षण नको का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कोणी रस्त्यावर उतरण्याची भाषा करत असेल तर ओबीसी समाज देखील एकत्र येऊ शकेल. या देशात लोकशाही आहे. अजून जरांगेशाही यायची आहे. आपल्याकडे बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान असल्याने इथे जरांगेशाही येणार नाही, असा टोलाही भुजबळ यांनी जरांगे यांना हाणला. भुजबळ यांच्या आरोपांना मनोज जरांगे यांनीही उत्तर दिले आहे. लोकशाही मार्गाने आम्ही सर्व मिळवणार आहोत. तुम्हांला काय करायचे ते करा, असे आव्हान त्यांनी भुजबळ यांना दिले. भुजबळ यांच्या प्रत्येक गावात जमिनी आहेत. भुजबळांनी गोरगरीब ओबीसींना वेड्यात काढले आहे. ओबीसींनी शहाणे व्हावे, त्यांच्या नादी लागू नये, असे आवाहन त्यांनी केले.

## नेपाळची संसद बरखास्त!

घराणेशाही आणि सोशल मीडियावरील बंदीवरून जेन-झी च्या नेतृत्वाखाली ८ आणि ९ सप्टेंबर रोजी झालेल्या देशव्यापी हिंसक आंदोलनांमुळे राजीनामा देण्यास भाग पाडले गेले होते. जेन-झी आंदोलकांनी सध्याची संसद बरखास्त करून देशात पुढील राष्ट्रीय निवडणुका होईपर्यंत हंगामी सरकारची स्थापना करण्याची मागणी केली होती, जी राष्ट्रपती राम चंद्र पौडेल यांनी लष्करप्रमुखांशी चर्चा केल्यानंतर स्वीकारली. हंगामी सरकारच्या अंतर्गत एक मर्यादीत मंत्र्यांचे मंत्रिमंडळ स्थापन करण्याची तयारी सुरू आहे. ज्येष्ठ वकील ओम प्रकाश आर्यल आणि नेपाळ विद्युत प्राधिकरणाचे माजी प्रमुख कुलमान घिसिंग यांचा मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता आहे. जेन-झी समूहांच्या एक किंवा दोन प्रतिनिधींनाही हंगामी सरकारमध्ये स्थान दिले जाऊ शकते. कार्की यांच्या शपथविधीनंतर हंगामी सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक राष्ट्रपती भवनातच होईल, ज्यात नेपाळमध्ये आणीबाणीची परिस्थिती जाहीर करणे, न्यायिक चौकशी आयोग आणि भ्रष्टाचारविरोधी एक चौकशी आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

## उड्डाणानंतर विमानाचे...

विमानतळ प्रशासनाने संपूर्ण आणीबाणी जाहीर केली होती. तथापि, विमान धावपट्टी क्रमांक २७ वर सुरक्षितपणे उतरले. विमानात क्रूसह सुमारे ७८ प्रवासी होते. ते सर्व सुरक्षित आहेत. लँडिंगनंतर विमानतळावर सामान्य कामकाज पूर्ववत करण्यात आले. बॉम्बार्डियर ८-४०० मध्ये एक ट्रायसायकल लँडिंग गियर सिस्टम आहे, ज्याच्या नोज गियरवर दोन चाके आहेत आणि प्रत्येक मुख्य लँडिंग गियरवर दोन मुख्य चाके आहेत.

# आमरण उपोषणाची जिल्हाधिकारी दखल घेणार काय ?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**तेल्हारा, दि.१२ :** नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांच्या गैर आणि मनमानी विविध कामाच्या चौकशी करता सुईवाल यांचे सुरू असलेले आमरण उपोषणाला पाचवा दिवस असून या आमरण उपोषणांची जिल्हाधिकारी साहेब किंवा संबंधित अधिकारी दखल घेऊन उपोषण करणाऱ्याला न्याय मिळवून देणार की मुख्याधिकारी यांची बाजू घेणार याकडे तेल्हारावासी लक्ष देऊन आहेत. शहरात घाणीचे साम्राज्य, नाल्या कचऱ्याने तुडुंब भरलेल्या जिथं पहावं तिथं गटारी,विद्युत पोलवर लाईट नाही,स्वच्छतागृह नाहीत, रस्ते नाही. अतिक्रम काढण्याला तेल्हरा वासियांचा, व्यावसायिकांचा विरोध नाही मात्र अतिक्रमण काढताना भेदभाव करणे हे चुकीचे आहे. तसेच अतिक्रमणावरून काढलेल्य दुकानांना दुसरीकडे पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावे अन्यथा छोट्या व्यावसायिकांचे रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होईल आणि अशाच विविध तेल्हारा शहरातील समस्यांसाठी नागरिकांना नगरपरिषद किंवा मुख्याधिकारी यांना वारंवार तक्रारी द्याव्या लागतात मात्र आपल्याच तोऱ्यात असलेले अधिकारी याकडे डोळेझाक करतांना दिसतात यामुळे नरेंद्र सुईवाल यांच्या सारख्या सामाजिक कार्यकर्त्याला आमरण उपोषणाला बसण्याची वेळ येते सुईवाल हे ८ सप्टेंबर सोमवार सकाळी ११ वाजता तेल्हारा नगरपरिषदच्या समोर उपोषणाला बसले आज त्यांच्या आमरण उपोषणाला पाचवा दिवस उजाडला आहे सामाजिक कार्यकर्ते व समस्या ग्रस्त नागरिकांन शिवाय कोणत्याही संबंधित अधिकारी यांनी त्यांच्याकडे फिरकले सुद्धा नाही. सुईवाल यांनी जिल्हाधिकारी अकोला, पोलिस अधीक्षक अकोला, तहसीलदार तेल्हारा यांना नगरपरिषदेचा विकास कामातील भ्रष्टाचार व मनमानी कारभार याची तक्रार करूनही कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही



मग प्रश्न पडतो कि,अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना अभय कुणाचे? याच नगरपरिषदने कित्येक व्यावसायिकांचे संसार उघड्यावर आणले आहेत शहरात आधीच बाजारपेठ नाही छोटेमोठे व्यवसाय करून व्यावसायिक आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह व्हावा अतिक्रमण करून कशीबशी आपली दुकाने टाकली होती त्यांचे अतिक्रमण काढून त्यांना रस्त्यावर आणण्याची काम या मुख्याधिकाऱ्यांनी केले आहे यासोबतच विकास कामाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात अपहार केल्याचे सुद्धा उपोषणकर्त्यांचे मत आहे. उपोषणा ठिकाणी असंख्य नागरिकांनी भेटी देऊन आपला अभिप्राय नोंदविला आहे या सोबतच उपोषण करते सुईवाल यांच्याबाबत काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा देत मुख्याधिकारी नगरपरिषद तेल्हारा यांची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी उपोषण करणाऱ्यासह पाठिंबा देणाऱ्या नागरिकांनी केली आहे.

**❑ उपोषणाच्या चौथ्या दिवशी मुख्याधिकारी नगरपरिषद यांचा प्रतिनिधी उपोषण स्थगित करण्याकरिता उपोषणकर्त्याला येऊन भेटले असता त्यांना उपोषणकर्त्यांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाही. त्यामुळे त्यांनी पळ काढला.**

**❑ उपोषणकर्ते सुईवाल यांची तब्येत खालावली, कोणतेही मेडिकल घेण्यास नकार. उपोषणाला पाचवा दिवस उजाडला असताना सुद्धा उपोषणाची दखल न घेतल्यामुळे तेल्हारा शहरातील रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्ते तथा आमरण उपोषण कर्ते सुईवाल यांच्या कडुन प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त करण्यात येत आहे.**

# शिवार फेरीतून शेत रस्त्यांचा शोध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट , दि.१२ :** तालुक्यातील वडाळी देशमुख येथे छ. शिवाजी महाराज स्व अभियानाच्या अनुषंगाने शेत रस्त्यांच्या अडचणींचा थेट आढावा घेण्यासाठी एक विशेष शिवारफेरी आयोजित करण्यात आली. ही फेरी अकोट तहसीलचे नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली पार पडली.त्यांच्यासोबत तलाठी कु. अनुश्री तायडे,तलाठी चरवंडे आणि मंडळ अधिकारी पी ए होपळ यांनीही सक्रिय सहभाग घेतला.या शिवारफेरीत विशेष आढावा घेण्यात आला.




शेत रस्त्यांवरील अतिक्रमणांची प्रत्यक्ष पाहणी,शेतकऱ्यांच्या तक्रारींची नोंद आणि त्वरित प्रतिसाद,भविष्यातील रस्ते नियोजनासाठी शेतकऱ्यांच्या सूचना,महसूल नकाशे आणि जमीन अभिलेखांची पडताळणी.या उपक्रमामुळे प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील विश्वासदृष्टी अधिक दृढ झाली असून,शेत रस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी एक ठोस पाऊल उचलले गेले आहे. ही फेरी तहसील कार्यालयाच्या पुढाकाराने राबवण्यात आली असून ती तालुक्यातील प्रशासनाच्या जनसहभागवर्धक आणि पारदर्शक दृष्टिकोनाची साक्ष देणारी ठरली. .''शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर त्वरित कार्यवाही करणे हेच प्रशासनाचे खरे कर्तव्य आहे.

# मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई करा

## मच्छीमार भोई समाजाच्यावतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातुर , दि.१२ :** अकोला येथे गुलजारपुरा येथे झालेल्या घटनेचा निषेध करण्याकरता व आरोपीवर कठोर कारवाई करण्याबाबत पातुर शहरातील मच्छीमार भोई समाजाच्या वतीने पातुर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले याप्रसंगी मोरणा संस्थेचे अध्यक्ष मनोहरराव सौंदळे,उपाध्यक्ष दिलीपराव इंगळे, पैलवान सुरेश भाऊ श्रीनाथ, बाबुलाल भाऊ श्रीनाथ, रामपाल इंगळे, गजानन इंगळे, पुंडलिक श्रीनाथ, भगवान म्हात्रे, गोपाल म्हात्रे,विशाल मेसरे, महेश सौंदळे, बंडू श्रीनाथ, शिवा सौंदळे, वसंतरावजी मेसरे, रविंद्र मेसरे,परसराम इंगळे,गजानन इंगळे, गणेश मेसरे,सागर नेमाळे, जिल्हा मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे संचालक गणेश गाडगे, सागर सौंदळे, रामदास श्रीनाथ,रामदास इंगळे,



रवींद्र मेसरे, महादेवराव श्रीनाथ,नवनीत वानखडे,गणेश इंगळे, गजानन इंगळे, सुरेश सौंदळे, सचिन श्रीनाथ, परसराम इंगळे, दिलीप इंगळे, प्रकाश इंगळे,बंडू श्रीनाथ,सुभाष इंगळे,अजय श्रीनाथ, किशोर श्रीनाथ,सुरेश नेमाडे, संदीप सौंदाळे गोलू मेसरे बाळू सौंदळे नरेश सुरवसे विशाल मेसरे भगवान श्रीनाथ महादेव मेसरे विठ्ठल मिस्त्री विनोद श्रीनाथ आदींनी निवेदन देऊन तीव्र निषेध नोंदवण्यामध्ये प्रामुख्याने भूमिका बजावली

# श्री शिवाजी महाविद्यालयातील २७ विद्यार्थ्यांना मिळाला रोजगार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि.१२ :** श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथील विविध विभागातील एकूण २७ विद्यार्थ्यांची मुख्यमंत्री प्रशिक्षण योजनेच्या अंतर्गत शासनाच्या जिल्हा उद्योग व कौशल्य विभागाच्या वतीने निवड करण्यात आली आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेतील सर्वात अग्रगण्य असलेले श्री शिवाजी महाविद्यालय अकोला म्हणून ओळखल्या जाते. या महाविद्यालयामधून सेट,नेट, पीएचडी, एनसीसी युनिट द्वारे सैन्यातील निवडीसोबतच विविध कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाली आहे. शासनाच्या मुख्यमंत्री प्रशिक्षण योजनेच्या अंतर्गत



२७ विद्यार्थ्यांना रोजगार देण्याचे कार्य महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रोहन बुंदेले, संकेत भालेराव, शिवा रेळे, प्रशांत भोपे,अनिशा कोल्हे, वैष्णवी दहिभात, जिया कोटक, कुंदन भिरूड, अभिजीत शिरसाट, चंचल गीते, नीरज गीते वैष्णवी राऊत, पल्लवी राऊत, श्रुती महाजन, रुची शुक्ला, सिद्धांत मेश्राम, विष्णू उज्जैनकर, सूर्यवंशी, अर्चना ढोबळे, करण आवटे,अभिषेक देशमुख यांच्यासह २७ विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणेने व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांच्या नेतृत्वात सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडत आहेत.

# सोलापुरात पाच तासांत १३२ मि.मी पाऊस, पाणीच पाणी चोहीकडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पंढरपूर, दि.१२ :** सोलापुरात पूर्वा नक्षत्रावर पाच तासात विक्रमी म्हणजे १३२ मि.मी. पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील १३ महसुली मंडलात विक्रमी तर सात मंडलात १०० मि.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. या पावसाने शेत शिवारा सह शहरातील १५० नगरा मध्ये पाणी शिरल्याची घटना घडली.तर शहरातून जाणार्या तीन महाम्र्ला नदीचे रूप आले होते. अनेक गावांचा संपर्क तुटला होता. मात्र आज जनजीवन हळूहळू पर्वपदावर आले आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अतिवृष्टी भागाची पाहणी केली. या बाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याबाबत तातडीने पावले उचलली जातील असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.सोलापूर येथे बुधवारी पावसाने अक्षरशः दाणादाण उडाली. अवघ्या पाच तासात पाणीच पाणी दिसून आली. अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथे १३७.५,किणी येथे १३३.८ ,मैंदर्गी येथे ९९.५ , जेऊर येथे ८७.८,अक्कलकोट येथे ११६.८ , चपळगाव येथे ११६.८,तडवळ येथे ६६ मि.मी पावसाची नोंद झाली तर दक्षिण सोलापूर येथील वळसंग येथे ११६.८ , होटगी येथे १२५ , बोरामणी येथे ६५.८ मि.मी. पावसाची नोंद झाली.

# सेवा पंधरवड्यात रस्ते सिमांकन मोहीम सुरू

## शेतकरी व नागरिकांना प्रशासनाचे सहकार्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि.१२ :** छ. शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनापासून १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत २ ऑक्टोबर सेवा पंधरवाडा कार्यक्रमांतर्गत शासनाने ग्रामीण भागातील रस्त्यांचे सिमांकन, अभिलेख अद्ययावत करणे आणि प्रत्येक रस्त्याला विशिष्ट क्रमांक देण्याची महत्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या नव्या कार्यपद्धतीनुसार मुर्तीजापूर तालुक्यातील रस्ते सुधारणा व नोंदणी प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे.

उपविभागीय अधिकारी, संदिप कुमार अपार मूर्तिजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेचे नियोजन करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात तालुक्यातील ४१ गावांमध्ये ग्रामसेवक, तलाठी, महसूल सेवक व पोलीस पाटील यांच्या सहभागासह शिवार फेरीचे आयोजन दि. १० सप्टेंबर रोजी झाले. यात नकाशावरील तसेच नकाशाबाहेरील सर्व रस्त्यांची माहिती संकलित करण्यात आली.

यानंतर दि. १५ सप्टेंबर रोजी ग्रामसभेत प्रपत्र-१ व २ मधील माहितीचे वाचन होणार असून नागरिकांकडून हरकती व दावे नोंदवून घेतले जातील. दि. १६ व १७ सप्टेंबर रोजी भूमी अभिलेख विभागाच्या वतीने मोजणी करून सीमा चिन्हे स्थापली जातील. तर दि. १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान अतिक्रमण असलेल्या रस्त्यांबाबत सुनावणी व निष्कासनाची कार्यवाही पोलीस यंत्रणेमार्फत केली जाणार आहे. यानंतर रस्त्यांची अद्ययावत नोंद प्रपत्र-३ व गाव नमुना १ फ मध्ये केली जाईल तसेच प्रत्येक रस्त्याला प्रपत्र-४ नुसार विशिष्ट क्रमांक दिला जाईल. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचणे, शेतीमाल वाहतूक सुलभ होणे, रस्त्यांवरील अतिक्रमण कमी होणे, अभिलेख कायमस्वरूपी स्पष्ट राहणे आणि भविष्यातील वाद-तक्रारी टाळता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

तालुका प्रशासनाने या कार्यवाहीत सर्व शेतकरी व नागरकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# रमाबाई आंबेडकर सार्वजनिक वाचनालय मलकापूर येथे वृक्षारोपण



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १२ :** स्थानिक रमाबाई आंबेडकर सार्वजनिक वाचनालय मलकापुर अकोला येथे सम्यक वाचक ग्रुप चे वतीने सम्यक वाचक ग्रुप चे सकीय सदस्य बबनराव सदांशिव यांचा वाढदिवस व शिक्षक दिना निमित्त वाचनालयाचे प्रांगणात वृक्षरोपन कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष बाबाराव दंदी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ठाणेदार मनोज केदारे साहेब, प्रा. डॉ. प्रेमसिग जाधव पंचफुला देवी समाज कार्य महाविद्यालय, माजी नगरसेविका किरणताई बोराखडे, ग्रामविकास अधिकारी बबनराव सदांशिव यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्राध्यापक जाधव सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी वाचनाला महापुरुषांचे फोटो फ्रेम दिले पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपन करून ती जगविने काळाची गरज आहे, असे बाबराव दंदी यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. यावेळी सम्यक वाचक ग्रुपचे सदस्य प्रकाश वानखडे सिद्धार्थ वानखडे, बाळकृष्ण खंडारे, संजय सोनवणे, विकास सदाशिव, किशोर तेलगोटे, वसंत इंगोले, विद्यमान गवई प्रा.भोवते सर, शांताराम गोपनारायण, प्रभाकर भिसे, सेवानंद इंगळे, अमोल खैरे, भाऊराव सोनोने, वृक्षारोपण करण्याकरिता पंचफुला देवी समाजकार्य महाविद्यालय याचे विकास जाधव, शीला गवई, सुमित शेख, अभिजीत येवले, कोमल चिकटे, शीतल सानप, वैभव तायडे, वैष्णवी डांगे, कल्याणी वाघाडे, प्रतीक्षा मानकर, अनिकेत जटाळे, पूजा मेतकर, सुप्रिया वानखडे, भाग्यश्री शिंदे, आकांक्षा दाकोले, प्रतीक्षा दाकोले इत्यादी विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री पुरुषोत्तम वानखडे यांनी केले.

## उत्सव | चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# दि सेंट जोसेफ शाळेत विविध उपक्रम साजरे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १२ :** बार्शीटाकळी तालुक्यातील हातोला येथे ग्रामीण भागात अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या सेंट जोसेफ इंग्लीश स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये सण- उत्सवांच्या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपव्रम राबविण्यात आले.








शिक्षक दिन, ईद आणि गणेशोत्सवानिमित्त शाळेत सामूहिक स्नेहभोज कार्यव्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सर्व विद्यार्थी आणि पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. प्रत्येकाने कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोदविला. सर्व शिक्षकवृंद आणि इतर कर्मचारी यांनी यावेळी सर्वांसाठी उत्तम भोजन तयार केले. ईद निमित्त उपस्थितांना यावेळी शीरखुरमा वाटप करण्यात आला. त्याचा सर्वांनी आस्वाद घेतला. गणेशोत्सवानिमित्त विद्याथी आणि पालकांना महाप्रसादाचे वाटप करुन सामाजिक एकता व सर्वधर्मसमभावाचा संदेश देण्यात आला आणि समाजासमोर एक आदर्श ठेवण्यात आला. पालकांच्यावतीने मोदक तयार करण्याची स्पर्धाही यावेळी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये अनेकांनी उत्स्फ ूर्तपणे सहभाग घेतला. हातोला ग्रामवासियांनी हे सर्व कार्यव्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. शाळेत प्रतिष्ठापणा करण्यात आलेल्या गणपतीच्या मूतीचे शिक्षकांच्या हस्ते विधिवत विसर्जन करण्यात आले. शाळेत सर्व धर्माचे सण आणि उत्सव तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नित्यनियमाने आयोजन करुन ग्रामीण भागातील मुलांना सण आणि उत्सवांचे महत्व पटवून देताना देशाची संस्कृती त्यांच्या बालमनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती शाळेच्या प्राचार्या रचना गोरडवार यांनी दिली. रचना गोरडवार यांना बेस्ट प्रिंसीपल ऑफ दि ईयर या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने नुकतेच नवी दिल्ली येथे शानदार सोहळ्यात राष्ट्रीय पातळीवर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले हे येथे उल्लेखनीय.

# विकासकाच्या कर्जापोटी ५० सदनिकांवर बँकेकडून जप्तीची नोटिस!

**मुंबई :** दहिसर पश्चिम येथील एका गृहप्रकल्पातील विकासकाने बँकेतून घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे तब्बल ५० घरांवर जप्तीची नोटिस बजावण्यात आली आहे. यामध्ये पुनर्विकासातील मूळ रहिवाशांच्या तीन घरांचा समावेश असल्यामुळे खळबळ माजली आहे. आतापर्यंत बँकेने प्रत्यक्षात सहा सदनिका आणि तीन दुकानांचा ताबा घेतला आहे. या कारवाईमुळे रहिवाशी तसेच घर खरेदीदार हादरले आहेत.दहिसर पश्चिम येथील ४६ रहिवाशांच्या श्री साई विश्राम सहकारी गृहनिर्माण संस्थेचा 'पुनर्विकास आर्यदीप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स'मार्फत केला जात आहे.

## महत्त्वाचे

### जिल्हा पंचायत निवडणुकीची तयारी सुरू



**पणजी :** राज्यात जिल्हा पंचायतीसाठी लवकरच होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने उत्तर आणि दक्षिण गोव्यासाठी निवडणूक अधिकारी आणि साहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यासंबंधी आदेश काल जारी करण्यात आला आहे. आदेशानुसार उत्तर गोव्यातील हरमल, मोरजी, धारगळ, तोरशे, या मतदारसंघासाठी निवडणूक अधिकारी म्हणून पेडणे उपजिल्हाधिकारी आणि आणि उपविभागीय अधिकारी तर साहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून पेडणे मामलेदार काम पाहणार आहेत.शिवोली, कोलवाळ, हळदोणे, शिरसई आणि अंजुणे या मतदारसंघासाठी निवडणूक अधिकारी म्हणून बार्देश उपजिल्हाधिकारी आणि आणि उपविभागीय अधिकारी-१ तर साहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून बार्देश मामलेदार काम पाहणार आहेत.

### प्रभादेवी पूल बंद केल्याने वाहतुकीत बदल

**मुंबई :** प्रभादेवी येथील १२५ वर्षांहून अधिक जुना पूल शुक्रवारी रात्रीपासून वाहतुकीसाठी बंद केला जाणार आहे. तर पूल बंद केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) पुलाचे पाडकाम करत त्याजागी द्विस्तरीय पूल बांधला जाणार आहे. पाडकाम आणि नवीन द्विस्तरीय पुलाचे काम पूर्ण करत नवीन द्विस्तरीय पूल वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी किमान २० महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे प्रभादेवी पूल बंद करताना या पुलावरून जाणारी वाहतूक इतरत्र वळविण्यात आली असून वाहतुकीत अनेक बदल करण्यात आले आहेत.

दादर पूर्वेकडून दादर पश्चिमेकडे आणि दादर मार्केटकडे जाणाऱ्या वाहन चालकांना टिळक पुलाचा वापर करावा लागेल.-परळ पूर्वेकडून प्रभादेवी आणि लोअर परळला जाणाऱ्या वाहन चालकांना करी रोड पुलाचा वापर सकाळी ७ ते दुपारी ३ या वेळेत करावा लागेल. -परळ, भायखळा पूर्वेकडून प्रभादेवी, वरळी, सागरी किनारा मार्ग आणि सागरी सेतूच्या दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांना चिंचपोकळी पुलाचा वापर करावा लागेल.-दादर पश्चिमेकडून दादर पूर्वेकडे जाणाऱ्या वाहन चालकांना टिळक पुलाचा वापर करावा लागणार आहे.

### मोटारीच्या धडकेत दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू

**पुणे :** मोटारीच्या धडकेत दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना लोहगावमधील हवाई दलाच्या वसाहतीत घडली. या प्रकरणी मोटारचालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विदार्थ विपीन मावी (वय दोन) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत विदार्थचे वडील विपीन राजसिंग मावी (वय ३४, सध्या रा. हवाई दल वसाहत, लोहगाव) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विपीन मावी हे हवाई दलात अधिकारी आहेत. त्यांचा दोन वर्षांचा मुलगा विदार्थ गुरुवारी (११ सप्टेंबर) दुपारी साडेबाराच्या सुमारास हवाई दल वसाहतीतील घरासमोर खेळत होता. त्या वेळी वसाहतीत राहणाऱ्या एका मोटारचालक महिलेने घरासमोर खेळणाऱ्या विदार्थला धडक दिली. अपघातात विदार्थ गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## आपसात तुंबळ हाणामारी

# नेपाळमध्ये जेन-झेड आंदोलकांमध्ये फूट

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**



नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि आंदोलन थांबण्याचे नाव घेत नाहीये. अंतरिम पंतप्रधानाच्या नावावरून जेन-झेड आंदोलक दोन गटांत विभागले गेले असून, गुरुवारी (११ सप्टेंबर) लष्कर मुख्यालयाबाहेर या गटांमध्ये हाणामारी झाली. यात अनेक तरुण जखमी झाले. आंदोलकांमध्ये अंतरिम पंतप्रधानाच्या नावावर एकमत होत नसल्याने तणाव वाढला आहे.

नेपाळी माध्यमांनुसार, काठमांडूमधील लष्कर मुख्यालयाबाहेर अंतरिम पंतप्रधानाच्या उमेदवाराच्या नावावरून तरुणांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. काही तरुण काठमांडूचे महापौर आणि रॅपर बालेन शाह, माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की किंवा इंजिनिअर कुलमान घीसिंग यांना अंतरिम पंतप्रधान बनवण्याची मागणी करत आहेत. मात्र, बालेन शाह आणि सुशीला कार्की यांनी पंतप्रधानपद स्वीकारण्यास नकार दिल्याने कुलमान घीसिंग यांचे नाव आघाडीवर आहे. ९ सप्टेंबरला बालेन शाह, १० सप्टेंबरला सुशीला कार्की आणि ११ सप्टेंबरला कुलमान घीसिंग यांचे नाव चर्चेत होते.

नेपाळमधील जेन-झेड आंदोलकांनी ज्येष्ठ नेत्यांच्या कारभाराला कंटाळून संसद भंग करण्याची मागणी केली आहे. जीन्स-झेड नेते अनिल बनिया आणि दिवाकर दंगल यांनी सांगितले की, ''हा आंदोलनाचा उद्देश संविधान बदलणे नसून, संसद भंग करणे आहे.'' दोन दिवसांपूर्वी झालेल्या तख्तापलटानंतर आंदोलक आणि लष्कर यांच्यात तणाव वाढला आहे. सध्या जीन्स-झेड प्रतिनिधी, राष्ट्रपती रामचंद्र पौडेल आणि लष्करप्रमुख यांच्यात चर्चा सुरू आहे. लष्कर मुख्यालयाबाहेर आंदोलकांमध्ये झालेल्या हाणामारीने नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. नेते आणि वैद्यकीय व्यावसायिक दुर्गा प्रसाई यांना लष्कराने चर्चेसाठी बोलावले. यामुळे आंदोलकांचा संताप आणखी भडकला. लष्कर आपला उमेदवार पुढे आणण्याचा प्रयत्न करत असल्याची शंका आंदोलकांना आहे. यामुळे लष्कराच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

अंतरिम पंतप्रधानाच्या नावावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. जीन्स-झेड आंदोलकांमधील मतभेद आणि लष्कराच्या कथित हस्तक्षेपामुळे नेपाळमधील राजकीय परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली आहे. काठमांडूमधील तणाव निवळण्याची चिन्हे दिसत नसून, आंदोलनाची दिशा लष्कर आणि आंदोलकांमधील चर्चेवर अवलंबून आहे.

# मेट्रो स्टेशनला शिवाजी महाराजांचे नाव बदलून 'सेंट मेरी' नाव

## काँग्रेस सरकारचा वादग्रस्त निर्णय

**बेंगळूरु : दि.१२ वृत्तसंस्था**



कर्नाटकातील काँग्रेस सरकार पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडलं आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बंगळूरमधील शिवाजीनगर मेट्रो स्टेशनचं नाव बदलून 'सेंट मेरी स्टेशन' करण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्रात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. काँग्रेसचे आमदार रिझवान अर्शद यांनी शिवाजीनगर मेट्रो स्टेशनचं नाव बदलण्याची मागणी केली होती. विशेष म्हणजे, या मागणीला मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत केंद्र सरकारला पत्र लिहिण्याची तयारी दर्शवली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांचा सन्मान देश-विदेशात होतो. अशा महान राजाचे नाव काढून टाकण्याच्या निर्णयामुळे शिवप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे. त्यांच्या मते हा निर्णय अवमानकारक आणि चुकीचा असून महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का देणारा आहे.

या निर्णयावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ''बंगळूरमधील शिवाजीनगर मेट्रो स्टेशनचं नाव बदलून सेंट मेरी करणं म्हणजे छत्रपती शिवरायांचा अपमान आहे. काँग्रेसमध्ये हा अपमान करण्याची परंपरा नेहरूंच्या काळापासून दिसून येते.''

# राजीनाम्यानंतर ५३ दिवसांनी समोर आले जगदीप धनखड

## उपराष्ट्रपतीपदाच्या शपथविधी सोहळ्यात हजर



**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सीपी राधाकृष्णन यांनी आज शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधी समारंभात माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड देखील उपस्थित होते. २१ जुलै रोजी पदाचा राजीनामा दिल्यानंतर ते पहिल्यांदाच सार्वजनिक कार्यक्रमात पाहायला मिळाले.

सीपी राधाकृष्णन शपथ घेत असताना जगदीप धनखड हे इतर माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि हमीद अन्सारी यांच्या शेजारी बसले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ यांच्यापर्यंत अनेक मोठे मंत्री शपथविधी समारंभाला उपस्थित होते. धनखड यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये उपराष्ट्रपतीपदाची सूत्रे स्वीकारली आणि संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी २१ जुलै रोजी पदाचा राजीनामा दिला. त्यांनी प्रकृतीचे कारण देत राजीनामा दिला. २१ जुलै रोजी संध्याकाळी धनखड यांनी राजीनामा दिला तेव्हा राज्यसभेचे कामकाज त्याच दिवशी सुरळीत पार पडले.

## महिंदा राजपक्षे शासकीय निवासस्थान सोडणार



**कोलंबो :** श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती महिंदा राजपक्षे यांनी गुरुवारी शासकीय निवासस्थान सोडले आहे. संसदेत संमत एका नव्या कायद्यामुळे माजी राष्ट्रपतींना मिळणारे विशेषाधिकार संपुष्टात आले आहेत. राजपक्षे यांचे अधिकृत निवासस्थान कोलंबोचा प्रमुख भाग सिनेमन गार्डनमध्ये होते. राजपक्षे येथे २०१५ पासून वास्तव्य करत होते. राजपक्षे हे २००५-१५ पर्यंत श्रीलंकेचे राष्ट्रपती राहिले आहेत. त्यापूर्वी ते २००४-०५ तसेच २०१९-२२ पर्यंत पंतप्रधानपदी होते. राजपक्षे यांचे वैयक्तिक घर तंगाले येथे असून हे ठिकाण कोलंबोपासून १९० किलोमीटर अंतरावर आहे.

# राहुल गांधी-योगींच्या मंत्र्यामध्ये खडाजंगी

**रायबरेली : दि.१२ वृत्तसंस्था**



उत्तर प्रदेशातील रायबरेली याठिकाणी राहुल गांधी आणि योगी सरकारचे मंत्री दिनेश प्रताप सिंह यांच्यात झालेल्या जोरदार वादाचा व्हिडिओ समोर आला आहे. राहुल गांधी यांच्या रायबरेली दौऱ्यादरम्यान हा वादविवाद झाला. राहुल १० आणि ११ सप्टेंबर रोजी रायबरेलीच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांचा योगी सरकारमधील मंत्री दिनेश प्रताप सिंह यांच्याशी वाद झाला. याचा व्हिडिओ समोर आला आहे.

रायबरेली येथे जिल्हा विकास समन्वय आणि देखरेख समितीची बैठक सुरू होती. उत्तर प्रदेशचे मंत्री दिनेश प्रताप सिंह राहुल गांधींच्या शेजारी बसले होते, तेव्हा दोघांमध्ये जोरदार वादविवाद सुरू झाला. राहुल गांधी म्हणाले की,''मी बैठकीचे अध्यक्षपद भूषवत आहे. जर तुम्हाला काही सांगायचे असेल तर आधी विचारा, मग मी तुम्हाला बोलण्याची संधी देईन. यावर मंत्री दिनेश प्रताप सिंह संतापले आणि दोघांमध्ये वादविवाद सुरू झाला.अमेठीचे खासदार केएल शर्मा देखील बैठकीत उपस्थित होते, जे राहुल गांधींसह दिनेश प्रताप सिंह यांच्याशी वाद घालताना दिसले. मिळालेल्या माहितीनुसार, बैठकीत दिशाच्या कार्यक्षेत्राबाबत चर्चा सुरू होती. यादरम्यान राहुल गांधींनी एका मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला आणि म्हणाले की मी आधीच विचारायला हवे होते. यावर मंत्री दिनेश प्रताप सिंह यांनी आक्षेप घेतला आणि म्हणाले की तुम्ही निश्चितच अध्यक्ष आहात, पण तुम्ही जे काही बोलता ते मी स्वीकारण्यास बांधील नाही. तुम्ही स्वतः लोकसभाध्यक्षांचे ऐकत नाही. काही वेळातच दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी आणि इतर लोकप्रतिनिधींही धक्का बसले. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

दिनेश प्रताप सिंह २०१८ पर्यंत काँग्रेस पक्षाचा भाग होते. २०१० आणि २०१६ मध्ये ते दोनदा उत्तर प्रदेश विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले होते. तथापि, २०१७ मध्ये उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार स्थापन झाले आणि २०१८ मध्ये दिनेश प्रताप सिंह यांनी बाजू बदलली. २०१९ मध्ये त्यांनी रायबरेली येथून सोनिया गांधींविरुद्ध लोकसभा निवडणूक लढवली होती, परंतु त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

# ऋषी नायरच्या पोटात सापडले ड्रग्स

**काठमांडू : दि.१२ वृत्तसंस्था**

**मडगाव :** बिट्स पिलानी कॅम्पसमध्ये ऋषी नायर (२०) हा विद्यार्थी मृत आढळून आला होता. त्याच्या मृत्यूचे निदान करण्यासाठी उलटीच्या रँडॉक्स चाचण्या घेण्यात आल्या असता, अंमलीपदार्थाचे अंश आढळून आले. तीन प्रकारचे सिंथेटिक्स ड्रग्स सापडल्याने या प्रकरणाचा गुंता वाढला आहे. वेर्णा पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला आहे. बिट्स पिलानीमध्ये एका वर्षापेक्षा कमी कालावधीत मृत्युमुखी पडलेला ऋषी नायर हा पाचवा विद्यार्थी. ४ सप्टेंबर रोजी त्याला मृत्यू आला होता. त्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ माजली होती. ऋषी नायरने आत्महत्या केली नसल्याचे सुरवातीला सांगण्यात आले होते. त्याच्या मृत्यूचे निदान करण्यासाठी रँडॉक्स चाचण्या घेण्यात आल्यानंतर या चाचणी अहवालात अंमलीपदार्थाचे सेवन झाल्याचे पॉझिटिव्ह परिणाम आले आहे आणि तेव्हापासून, वेर्णा पोलिसस्थानकाचे पथक बिट्स पिलानीच्या कॅम्पसमध्ये तळ ठोकून आहे. आम्ही त्याच्या सहकाऱ्यांचे जबाब नोंदवत आहोत आणि सीसीटीव्ही फुटेज तपासत आहोत, असे दक्षिण गोव्याचे पोलिस अधीक्षक टिकम सिंग वर्मा यांनी सांगितले.



# नेपाळमध्ये भारतीय यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बसवर हल्ला; काठमांडूमध्ये प्रवाशांना मारहाण

**काठमांडू : दि.१२ वृत्तसंस्था**

नेपाळची राजधानी काठमांडू सध्या प्रचंड अशांततेच्या छायेत आहे. सुरू असलेल्या हिंसक निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी भारतीय यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या एका बसवर मोठा हल्ला झाला. आंध्र प्रदेशातील यात्रेकरू पशुपतिनाथ मंदिराचे दर्शन करून परत येत असताना त्यांच्या बसवर समाजकंटकांनी अचानक दगडफेक सुरू केली. बसच्या सर्व खिडक्या फोडण्यात आल्या, प्रवाशांना मारहाण करण्यात आली आणि त्यांचे मोबाईल फोन, बॅगा व रोख रक्कम लुटण्यात आली. या हल्ल्यात सात ते आठ जण गंभीररीत्या जखमी झाले असून उर्वरित प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बसचे चालक राज यांनी सांगितले की, ''भारताकडे परतत असताना अचानक जमावाने आमच्या बसवर दगडफेक केली. आमचे सर्व सामान लुटले गेले. प्रवाशांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. मात्र, नेपाळी लष्कराचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आम्हाला वाचवले.''



बस कर्मचारी श्याम निषाद यांनी देखील हाच अनुभव सांगितला. ''आमच्या गाडीत ४० हून अधिक यात्रेकरू होते. अचानक झालेल्या हल्ल्यात सात-आठ जण जखमी झाले. आम्ही मदतीसाठी ओरडत होतो, पण नेपाळी लष्कर आले नसते तर कदाचित परिस्थिती अधिक भयानक झाली असती,'' असे त्यांनी सांगितले.

या हल्ल्यामुळे भारतीय प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर भारत सरकारने तातडीने हालचाली करत सर्व अडकलेल्या प्रवाशांना काठमांडूहून दिल्लीला विमानाने हलवण्याची व्यवस्था केली. हल्लाग्रस्त बस उत्तर प्रदेशातील महाराजगंजवळील सोनौली सीमेवर पोहोचली.



# आता सरकार ट्रम्पपासून सावध

## भारत व्यापार चर्चेत निर्णयांवर ठाम

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

भारत-अमेरिका व्यापार संबंध सध्या जागतिक स्तरावर चर्चेत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आले असताना, भारतासोबतच्या व्यापार चर्चेत त्यांचा सूर बदललेला दिसत आहे. मात्र, या बदलत्या परिस्थितीत भारताने आपली भूमिका स्पष्ट करत सांगितले आहे की कोणताही व्यापार करार हा परस्पर फायद्याचा असावा एकतर्फी दबावाखाली नव्हे.

सरकारमधील सूत्रांच्या माहितीनुसार, भारत व्यापार चर्चेत आपले निर्णय कायम ठेवणार आहे. विशेषतः कृषी व दुग्धजन्य पदार्थांवरील आयात शुल्क कमी करण्याची अमेरिकन मागणीला भारताने ठाम नकार दिला आहे. तसेच, कच्च्या पेट्रोलियम खरेदीबाबतचा सार्वभौम निर्णयाचा अधिकार भारताकडेच राहील, हेही स्पष्ट केले आहे.

अलीकडेच ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रूथ सोशल' प्लॅटफॉर्मवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख ''माझे चांगले मित्र'' असा करून भारत-अमेरिका संबंधांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोदी सरकार याकडे भावनिक न बघता व्यवहार्य दृष्टिकोनातून पाहत आहे. पंतप्रधान मोदींच्या सोशल मीडिया पोस्टस्वरही जगभराचे लक्ष आहे, कारण त्यातून भारत-अमेरिका संबंधांच्या पुढील प्रवासाची झलक मिळते.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, भारत आणि अमेरिकेतील व्यापार चर्चा योग्य दिशेने सुरू असल्या तरी, ट्रम्प यांनी काही अशा मागण्या केल्या आहेत ज्या भारतासाठी मान्य करणे कठीण आहे. उदाहरणार्थ, काही वस्तूंवर ५०% पर्यंत शुल्क आकारले जात आहे. हे भारतासाठी महसूल व संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक आहे, त्यामुळे ते हटवणे शक्य नाही.ट्रम्प यांना जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि युरोपियन युनियनप्रमाणे भारतही त्यांच्या बाजूने उभा राहील अशी अपेक्षा होती. पण मोदी सरकारने स्पष्ट संदेश दिला भारत आपले निर्णय स्वतः घेईल.

## स्पर्धा — तब्बल १४००० डॉलर्सचा दिला बोनस

# वजन कमी केल्यावर कंपनीकडून बोनस!

**वॉशिंग्टन , दि.१२ वृत्तसंस्था**

चीनमध्ये एका कंपनीने कर्मचाऱ्यांना वजन कमी करण्यासाठी प्रोत्साहित करत १४००० डॉलर्सचा बोनस दिला आहे. या घटनेची आता सोशल मीडियावर मोठी चर्चा होतेय. यातील एका कर्मचाऱ्याला केवळ ९० दिवसांमध्ये २० किलोग्रॅमहून अधिक वजन कमी केल्याबद्दल २० हजार युआन मिळाले आहेत. शेन्जेन येथील टेक फर्म अरशी व्हिजन इंक या कंपनीने हा उपक्रम राबविला आहे. या कंपनीला इन्स्टा ३६० स्वरुपात ओळखले जाते. या कंपनीने स्वतःच्या वार्षिक 'मिलियन युआन वेट लॉस चॅलेंज'मुळे प्रसिद्धी मिळविली आहे. या पुढाकाराचा उद्देश कर्मचाऱ्यांना नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराच्या माध्यमातून स्वस्थ जीवनशैली अंगिकारण्यासाठी प्रेरित करणे आहे. सर्व कर्मचारी या चॅलेंजच्या नोंदणीसाठी पात्र होते आणि प्रत्येकी ०.५ किलोग्रॅम वजन कमी करत स्पर्धकांना ५०० युआनचे रोख इनाम मिळू शकत होते.



या चॅलेंजमध्ये एक दंडात्मक तरतूदही सामील आहे. ज्या स्पर्धकांचे वजन वाढले, त्यांनी प्रत्येक अर्धा किलो वजन वाढल्यास ८०० युआनचा दंड भरण्याचा नियम होता. परंतु आतापर्यंत हा दंड कुणावरही ठोठावण्यात आलेला नाही. यंदा जेन-झेड कर्मचारी झी याकीने तीन महिन्यात २० किलोग्रॅम वजन कमी केले आणि २० हजार युआनचे रोख इनाम आणि वेट लॉस चॅम्पियनचा पुरस्कार मिळविला. मी पूर्ण चॅलेंजदरम्यान शिस्त पाळत होते, माझ्या आहाराचे लक्षपूर्वक व्यवस्थापन केले आणि प्रतिदिन १.५ तास व्यायाम केला. हा माझ्या जीवनातील सर्वात चांगला वेळ असल्याचे माझे मानणे आहे. हे केवळ सौंदर्यापुरती नसून आरोग्याबद्दल असल्याचे तिचे सांगणे आहे.

झीने ग्रूप चॅटमध्ये वजन घटविण्याची प्रक्रिया शेअर केली, जेणेकरून अन्य सहकाऱ्यांना प्रेरित करता येईल. ज्याप्रकारे आहाराद्वारे चिनी अभिनेता किन हाओला केवळ ४५ दिवसांमध्ये १० किलोग्रॅम वजन कमी करण्यास मदत मिळाली, त्याच पद्धतीला तिने अनुसरले. याच्या पहिल्या दिवशी केवळ सोया दूध पिणे, दुसऱ्या दिवशी मका खाणे, तिसऱ्या दिवशी फळे खाणे पाचव्या दिवसांमध्ये प्रोटीन आणि भाज्यांना आळीपाळीने सामील करण्याची प्रक्रिया तिने अवलंबिली होती.

२०२२ पासून कंपनीने या चॅलेंजचे ७ सीझन आयोजित केले असून एकूण पुरस्कारादाखल सुमारे २ दशलक्ष युआन खर्च केले आहेत. मागील वर्षी ९९ कर्मचाऱ्यांनी यात भाग घेतला होता.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## फ्रान्सलाही बसतेय असंतोषाची झळ!

नेपाळ पाठोपाठ आता फ्रान्सही असंतोषाची झळ सोसतोय! नेपाळमध्ये 'जेन झेड' वर्ग संतोष प्रकट करण्यासाठी रस्त्यावर उतरल्यामुळे तेथे सत्तापालट झाला. संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. आता हा देश लष्कराच्या नियंत्रणाखाली आहे. देशभरात प्रतिबंधात्मक आदेश, हिंसाचार रोखण्यासाठी संचारबंदी यांसारख्या उपाययोजनांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जे नेपाळमध्ये घडले, तेच फ्रान्समध्येही घडत आहे. तेथे सरकारविरोधात लाखोंच्या संख्येत निदर्शने सुरू आहेत. राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधानपदी सेबॅस्टिन लेकोर्नू यांची निवड केली. नव्या पंतप्रधानांना सर्वसामान्य लोकांनी विरोध केला असून, आंदोलन करणाऱ्या अडीचशे लोकांना अटक करण्यात आली. पंतप्रधान फ्रॉस्वा बायरो यांचा विश्वासदर्शक ठरावात पराभव झाल्यानंतर, अध्यक्षांनी या पदावर लेकोर्नू यांची निवड केली. पण खुद्द अध्यक्षांविषयी लोक नाराज असून, त्यामुळे त्यांची निवडही नागरिकांना पसंत नाही. त्याशिवाय अर्थसंकल्पातील कपाती आणि अन्य बाबींविरोधात 'ब्लॉक एव्हरीथिंग' या गटाच्या नेतृत्वात देशव्यापी आंदोलन होते आहे. बायरो यांच्या सरकारचा विश्वासदर्शक ठरावात पराभव झाल्यामुळे मॅक्रॉन यांच्यावर १२ महिन्यांत चौथा पंतप्रधान निवडण्याची नामुष्की ओढविली. विश्वासदर्शक ठरावात ३६४ विरुद्ध १९४ अशा मोठ्या फरकाने पराभव झाल्याने बायरो तसेच त्यांची निवड करणाऱ्या मॅक्रॉन यांच्याबद्दल जनतेत प्रचंड रोष आहे. फ्रान्सच्या डोक्यावरील कर्जाचे ओझे कमी करायचे तर सरकारी खर्च कमी करावा, त्यासाठी खासदार साथ देतील, हा विश्वासच बायरो यांना महागात पडला. फ्रान्सवरील हे संकट भळभळणाऱ्या जखमेसारखे असून त्याकडे दुर्लक्ष करणे महागात पडेल, असे उद्गार त्यांनी पंतप्रधान म्हणून केलेल्या अखेरच्या भाषणात काढले होते. मात्र नऊ महिन्यांच्या कारकिर्दीत ते साफ अपयशी ठरले. त्यांनी केलेले आर्थिक नियोजन खासदारांनाच पसंत नसल्याचे स्पष्ट झाले. अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, युक्रेन व गाझातील संघर्षामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि त्यातच देशांतर्गत अस्थिरतेमुळे फ्रान्स संकटात सापडलेला आहे. युरोपियन युनियनने कोणत्याही सदस्य देशाच्या वित्तीय तुटीची जी ३ टक्क्यांची लक्ष्मणरेषा आखून दिली, त्याच्या जवळपास दुप्पट तूट सध्या फ्रान्सच्या अर्थसंकल्पात दाखविली आहे. ठोकळ देशांतर्गत उत्पादनाच्या ११४ टक्के इतक्या कर्जाचे ओझे हा देश सध्या वाहतोय. पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात ४४ अब्ज युरोंनी खर्च कमी करावा, ही बायरो यांची योजना विरोधी पक्षांना अजिबात मान्य नाही. देशाच्या मानगुटीवर बसलेले या सरकारचे भूत उतरविलेच पाहिजे, असे उद्गार अतिजहाल पक्षाच्या एक नेत्या मरीन ली पेन यांनी काढले होते. देशात तत्काळ सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा करावी, अशी त्यांची मागणी मॅक्रॉन यांनी फेटाळून लावली असली तरी मॅक्रॉन यांचीच हकालपट्टी झाली पाहिजे, अशी मागणी अतिडाव्या आघाडीचे नेते जीन-लुक-मेलेनकॉन यांनी केली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांनी फ्रान्सचे पतमानांकन खाली आणले. कर्जाच्या सापळ्यात अडकलेला अर्थसंकल्प संमत करून घेण्यासाठी विरोधकांचे सहकार्य घेण्याची इच्छा आता लेकोर्नु यांनी व्यक्त केली. ते यापूर्वी देशाचे संरक्षणमंत्री होते. सध्याच्या अडचणीच्या वाटेतून मार्ग काढण्यासाठी कल्पक उपाय योजावे लागतील, याचे भान नव्या पंतप्रधानांना ठेवावे लागेल. देशातील असंतोषामागे असलेली ही पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. आज परिस्थिती हाताळण्यासाठी राजकीय स्थैर्य आणि संवेदनशील नेतृत्वाची गरज त्यातून स्पष्ट होते. मॅक्रॉन यांची धोरणे सामान्यांच्या हिताविरोधात असून, ते केवळ व्यापारी व उद्योगपतींची धन करीत आहेत, असा मतप्रवाह आहे. वित्तीय शिस्तीच्या नावाखाली सरकारने कल्याणकारी योजना बंद केल्या आहेत वा त्यांना कात्री लावली आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय जनता तसेच कामगारवर्ग भरडून निघतोय. फ्रान्समध्ये अनेक खासगी कंपन्या व सरकारी आस्थापनांत अनेक वर्षे काम करूनही कामगारांना १६०० युरोंपेक्षा जास्त निव्वळ वेतन मिळत नाही. त्यामुळे कामगार वर्ग रस्त्यावर आला असून, वेतनवाढीसाठी हजारो कामगारांनी पॅरिसमधील कामगार मंत्रालयाबाहेर निदर्शने केली, लवकरच राष्ट्रीय पातळीवर संपही केला जाणार आहे. फ्रान्सच्या प्रमुख मार्गांवर रास्ता रोको, रेल्वे स्थानकांत घुसणे, गाणी, नृत्ये अशा विविध प्रकारे निषेध नोंदवणे, हे प्रकार सुरू आहेत. देशाच्या राजकारणात अर्थसंकल्प हा नेहमीच वादाचा मुद्दा राहिला. दरवर्षी सरकार कोणत्या क्षेत्रात खर्च वाढविणार आणि कोणत्या योजनांवरील खर्चात कपात करणार, हे ठरविले जाते. सरकार उद्योगपतींच्या बाजूने झुकले असून, कोट्यवधी लोक गरिबीच्या खाईत लोटले जात आहेत, याची सरकारला पर्वा नाही, अशी लोकभावना आहे. बायरो यांनी सार्वजनिक खर्चात ४ लाख कोटी रुपयांची कपात केली. अनेकांचे पेन्शन बंद केले. संतापाची लाट उसळण्यामागे हे एक प्रमुख कारण मानले जाते. मुख्य म्हणजे 'सर्व काही बंद करा', किंवा 'ब्लॉक एव्हरीथिंग' या ऑनलाईन मोहिमेअंतर्गत हे आंदोलन सुरू झाले आणि संपूर्ण देशात ते वेगाने पसरले. देशभरातील सर्व व्यवहार ठप्प करण्याची योजनाच आखली गेली. २०१८ मध्ये 'येलो व्हेस्ट' हे आंदोलन इंधनावरील करवाढीच्या विरोधात झाले होते. दैनंदिन वाहतूक खर्च प्रचंड वाढल्यामुळे कामगार तेव्हा खवळले होते. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १७ वर्षीय अल्जेरियन वंशाच्या तरुणाचा मृत्यू झाल्याच्या कारणातून देशव्यापी निदर्शने झाली. अनेक ठिकाणी हिंसेला तोंड फुटले. मोठ्या प्रमाणात आलेल्या स्थलांतरितांच्या विरोधात फ्रान्समध्ये एक सुप्त लाट निर्माण झाली. १९७० च्या दशकातील स्त्रीवादी चळवळ, वृक्षतोडीच्या विरोधात झालेली प्रचंड जनआंदोलने, साहित्य, संगीत व चित्रपट क्षेत्रांमधील 'न्यू वेव्ह' या सामाजिक सुधारणांमागे देशाचे योगदान मोठे आहे. विविध चळवळींपासून जगभरातील तरुणांना प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा जगाला संदेश देणारी फ्रेंच क्रांती ज्या देशात झाली, त्याच देशात आज सत्ताधाऱ्यांविरोधात तरुणांनी आवाज उठविणे साहजिकच आहे, मात्र या परिस्थितीतून मार्ग काढण्यास कोणतेही द्रष्टे, संयमी नेतृत्व नसेल, तर त्यामधून केवळ अराजकाचीच निर्मिती होऊ शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### जीवघेणा पाऊस



असा कसा बरसतो
हा अवकाली पाऊस
बळीच दुःख वाढवतो
हा जीवघेणा पाऊस

पै पै जमा करून
बडी पेरतो जमीन
हवालदिल होऊन
उभारी का नवीन

यार पावसा तू फक्त
सख्यांचा मित्र बन
आम्हाल नको सक्त
तू त्यांचा आनंदवन

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

कुणा अहकर
बा युक्तीचा येतो ।
सर्वांना काढतो
मुर्खात तो ॥

अहंकार तुझा
भोवतो सारखा ।
खोडतो सारखा
तुझ्या खुणा ॥

अहंकार जेव्हा
मोडतो मोडतो ।
जन्म नवा होतो
माणसाचा ॥

सोड सोड आता
मित्रा अहंकार ।
आहे हा विकार
दुराचारी ॥

# प्रिय सावित्रीमाईस...



## चर्चा

डॉ. प्रतिभा जाधव
मो. 9657131719



माई, कशी आहेस गं? खरं तर असं पत्रबित्र तुला कधी लिहिलं नाही यापूर्वी पण आज वाटलंच लिहून टाकावं सारं खोलवर साठलेलं, मळभ म्हणून मनात दाटलेलं! खरं सांगु माई? माझा एकही दिवस असा सरत नाही ज्यादिवशी तुझी आठवण होत नाही! आईला कुणी विसरतं होय?

माई, तू दिलेली पाटी-पेन्सिल इमानेइतबारे सांभाळतेय, लेखणीचा वापर सडेतोड करतेय, शब्दांनाही न्यायासाठी धार लावतेय, पाय घट्ट रोवून उभं राहायला तुझ्याकडूनच शिकलेय. माई, तू आमच्यासाठी झेललेल्या शेणमाती-दगडधोंड्यांचा विसर कधीच पडू देत नाही. आज जरी तुझ्या लेकींच्या वाटेवर फुलं असली तरी त्यासाठी तुला दगडधोंडे झेलावे लागलेय हे विसरून कसं चालेल? अबलेचा अ नसतो तर अपराजितेचा अ असतो हे उमजलंय माई मला तुझ्यामुळेच. माई, तुला तुझे शेठजी अक्षरं गिरवायला शिकवायचे तेव्हा नक्की काय वाटायचं गं तुला? कुठली खूणगाठ बांधत तू एवढं मोठं जीवघेणंअंतर पार केलंस तू माई ? तू शिकलीस आणि काळ्याकुट्ट नकार भरल्या जगात ज्योतिबांच्या साथीने ठामपणे उभी राहिलीस माय. प्रवाहाच्या दिशेने सारेच वाहतात पण तुझ्या धैर्याला, हिमतीला सलाम गं! कारण तू चक्क प्रवाहाविरोधात उभी ठाकलीस!! व्यवस्थेच्या विरोधात त्या प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करणं निश्चितच साधी गोष्ट नव्हती, तुझ्यात हे द्रष्टेपण, हा निर्धार, एवढा कणखरपणा, समंजसपणा कुठून आला माई? १८३१ साली जन्मलेली तू १८४८ साली अवघी सतरा वर्षांची तर होतीस, वयाच्या सतराव्या वर्षी इथल्या व्यवस्थेला हादरा दिलास आणि स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवलीस. पण यातना या गोष्टीची आहे की, आज तुझ्या नाती-पणतींना तुझा त्याग आणि तुझ्या दगडधोंड्यांच्या जखमांचा सोयीस्कर विसर पडलाय माई! खरं तर हे लिहिताना, बोलतानादेखील त्रास होतोय गं! पण मी आज वास्तव मांडणारच आहे. दोन वर्षांपूर्वी माझ्या माहेरच्या शोधात मी निघाले होते. माहेर म्हणजे माझ्या मायेचं आणि मायचं घर शोधत शोधत थेट फुलेवाड्यात पोहचले गं मी. वाड्याच्या कमानीतून आत शिरले आणि अंगी रोमांच उभे राहिले कारण कधीकाळी तू इथे वावरली होतीस, नांदली होतीस. तुझ्या अस्तित्वाच्या, वावरण्याच्या खुणा सैरभैर होऊन शोधू लागले. अंगणात तू तुझ्या हाताने सारवायचीस तो ओटा दिसला, तुळशी वृंदावन आणि ज्योतिबांची समाधी दिसली , मन गहिवरून आलं गं पार आतून! वाड्यातल्या अंगणात हौद दिसला , हा तोच हौद ना गं माई? जो ज्योतिबांनी आपल्या अस्पृश्य बांधवाना खुला करून दिला होता. माई, तुझी बैठकीची खोली, स्वयंपाकाची खोली बघितली , भिंतीतले खणं, कोनाडे निरखून बघितले, खिडक्यांच्या सागवानी तावदानांवरून कितीतरी वेळ हात फिरवत राहिले, भिंतींना अधाशासारखे स्पर्श करत सुटले...तु कधीकाळी त्या घराला प्रेमाने सारवलं, गोंजारलं असशील ना माई, या भावनेने मीही तुझा स्पर्श शोधत घरभर कितीतरी वेळ फिरत राहिले. तिथून बाहेर पडण्याचे भानच राहिलं नाही बघ. याच वाड्यात तू नवी नवरी म्हणून आलीस होतीस नं अजाण वयात? याच घरात खंडोजी पाटलांची लेक फुल्यांची साऊ झाली. याच वाड्यातून शिदोरी घेऊन जायचीस नं तू शेतावर पतीसाठी आणि शेतातल्या मातीत अक्षरं गिरवून परतायचीस पुन्हा, पण येताना तुझ्या डोळ्यात लक्षलक्ष स्वप्न असायची , ज्योतिबांनी अक्षरांतून पेरलेली. ह्याच अक्षरांच्या सोबतीने तू अक्षरक्रांती घडवून गेलीस माई! फुलेवाड्यासमोरील डेरेदार वटवृक्षाच्या सावलीत निवांत बसले माई तेव्हा त्या शीतल छायेत तू जाणवत राहिलीस कितीतरी वेळ... ज्योतिबा, फातिमाबी, लहुजी साऱ्यांचा पदस्पर्श तिथे झाला असणार म्हणून ललाटावर तिथली धूळ माखून घेतली माई त्या दिवशी. तुझ्या चरित्रात वाचलेले एकेक घटना प्रसंग तरळत गेले डोळ्यातल्या पाण्यात ...

प्लेगबाधित पांडुरंगला पाठीवर घेऊन दवाखान्यात धाव घेणारी तू त्याला जीवदान देऊन स्वतः मृत्यूच्या कुशीत विसवणारी तू. कितीतरी वेळ भिडेवाड्यासमोर रस्त्याच्या कडेला स्तब्ध, सुन्न होऊन उभी होते समोरचे दृश्य बघून तर सुन्नच झाले माई, अगं तू ज्यांना युगायुगांच्या अज्ञान आणि अंधकाराच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी उभी हयात घालवली नं त्याच तुझ्या लेकी, नाती कृतघ्न निघाल्या गं माई, कृतघ्न निघाल्या! ज्या वास्तुतून यांच्या उद्धाराची, स्वातंत्र्याची सुरुवात झाली त्याच खऱ्या तिर्थक्षेत्राकडे पाठ फिरवून ह्या काल्पनिकतेला पूजताय. तुझ्या आणि ज्योतिबांच्या क्रांतीमुळे, त्यागामुळे, कष्टामुळे समग्र महिलावर्गास-बहुजनवर्गास मानसन्मानाचे जगणे दिलेस पण त्यांना तुझे नाव घ्यायलाही कमीपणा वाटतोय माई! त्यांना तुझ्या जन्मदिवसाशी देणेघेणे नसते किंवा स्मृतिदिनाशीही नाही त्या तर मश्गुल असतात नऊ रंगाच्या साड्या नेसण्याच्या स्पर्धेत वा अनवाणी चालत जातात दर्शनाला कुठं दूर डोंगरात नाहीतर उपासतापास ,नवस करण्यात व्यस्त असतात त्या. तुझे, ज्योतिबांचे कर्तृत्व त्यांना मान्यच करायचे नसते कारण त्यांच्या डोक्यात जातीधर्माचे विष पद्धतशीरपणे पेरले गेलेय त्यामुळे महापुरुषांना प्रणाम करतानाही त्या जात वगैरे बघू लागल्या आहेत. कोण कुठे जन्मला ? यावरून श्रेष्ठत्व ठरवणारी ही येडी प्रजा शहाणी करण्याच्या पात्रतेचीही नाही खरं तर. पण तरीही तुम्ही खस्ता खात, रस्ता तयार केलात यांच्या कल्याणाचा. त्याची अजिबात जाणीव न ठेवणारी ही जमात खरे तर, यांच्या शिक्षणाचा आणि वर्तनाचा काडीमात्र संबंध नाही.

माई, तुझ्या शिकल्यासवरल्या लेकी स्वतःहून अंधश्रद्धांच्या जाळ्यात अडकल्या आहेत, वर्णवर्चस्ववाद्यांशी बरोबरी करण्याच्या नादात ह्याच अधिक कट्टर होऊ लागल्या आहेत, पोथ्यापुराणात पुन्हा एकदा फसताहेत. आता मात्र तुम्ही पुन्हा यांना ह्या दलदलीतून काढायला येणार नाही हे माहिती आहेच.... पण आणखी एक महत्वाची गोष्ट सांगते माई! तुझा विचार पुढे नेणाऱ्या, प्राणपणाने निर्भीडपणे वास्तव मांडणाऱ्या आणि खऱ्या अर्थाने सावित्रीच्या लेकी म्हणून विवेकाचा जागर करणाऱ्या स्त्रियाही आहेत हे चित्र फार आशावादी आहे. नवीन पिढीला आता ह्या तुझ्या लेकी सत्यवानाची सावित्री न सांगता फुल्यांची सावित्री सांगताय हे फार दिलासादायक आहे कारण सत्याला मरण नसतंच, असतं ते चिरंतन आयुष्य आणि तेजस्वी भविष्य. ह्या मनुवादी व्यवस्थेने तुला वा क्रांतीबांना जितेपणी छळलंच, नंतरही इतिहास खोटे लिहिले. नंतर आलेले कुणीतरी भारतरत्न होतात.... शिक्षक दिन ही दिनवाणे साजरे होतात....माई, खरं सांगू ? आमचे भारतरत्न तुम्हीच आहात आणि शिक्षक दिनाचे मानकरीदेखील!

आयुष्यभर विनावेतन राबणारे आणि आयुष्यभराची सारी कमाई शाळांसाठी खर्च करणारे तुम्ही भारतातीलच नव्हे तर जगातील महान शिक्षक आहात. आज खरंच मनमोकळं केलं माई मी तुझ्याकडे, काळजाच्या तळघरात कितीतरी दिवस कोंडून ठेवलेलं आज सारं रितं केलं बघ, आता बरं वाटतंय. तुझं आणि ज्योतिबांचं कर्तृत्व आभाळाएवढं आहे माई, ह्या विवेकाच्या आभाळाची छाया आणि माया आम्हा धडपडणाऱ्या तुझ्या लेकींना सतत लाभो , तुम्ही खरे समाजशिक्षक आहात तुम्ही दाखवलेल्या नैतिकतेच्या व्यापक वाटेवर आम्ही चालत राहू हे वचन देते आणि थांबते माई!

## संवाद



प्रा. मोहन काळे
७०३८२७६५५८




त्या निर्यात करणे बंद केले तर आपल्या देशातील शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे पर्यायाने देशाचे नुकसान होईल . त्याचा फटका सर्वच देशवासियांना बसेल. त्यामुळे देशादेशांत सामंजस्याचे वातावरण असणे आवश्यक असते परंतु जेव्हा एखादा लहरी वा अहंकारी देशाचा प्रमुख बनतो तेव्हा तो मनात येईल तसे निर्णय घेतो. हुकूमशहासारखे वागतो.''

''मग सर्वच देशांनी अशा देशावर बहिष्कार टाकायला पाहिजे ना? ''तसे नसते. जे देश त्या हुकूमशहाचे ऐकतात त्यांचा फायदा होतो. तर काही देश गरीब असतात किंवा त्या देशाची अर्थव्यवस्था त्या मोठ्या देशावर अवलंबून असते त्यांना ऐकण्यावाचून गत्यंतर नसते. शक्तीशाली एक गट बनवतात व इतर देशांवर दादागिरी करतात.हे तर बळी तो कान पिळी असेच झाले? हो, आजचा काळच बळी तो कान पिळी असा आहे. स्वतःला श्रेष्ठ समजणारे देश जेव्हा एकी करतात ते गरीब व कमकुवत देशांवर अंकुश ठेवण्यासाठी साम,दाम,दंड,भेद,धमकी, युद्ध, आर्थिक बंधने, इत्यादींसारखी आयुधे वापरतात. ''पण यावर उपाय काय?''

''उपाय एकच आहे. प्रत्येक बाबतीत स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न करणे. मोजक्याच देशांवर अवलंबून न राहता अनेक देशांशी व्यापारी व सांस्कृतिक संबंध निर्माण करणे, आपल्या गरजा कमी करणे, आपल्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.

''पण आपण अमेरिकेकडून कोणत्या गोष्टी आयात करतो? आणि ज्या गोष्टी आयात करतो त्या वस्तूंवर आपण सुद्धा तेवढाच कर लावला पाहिजे जेवढा आपल्या वस्तूंवर लावल्या जातो. आणि आपण त्या वस्तू आयात करायलाच नको.''

''भारत अमेरिकेकडून प्रामुख्यानेखनिज इंधन तेल,मोती आणि अर्ध-मौल्यवान खडे,अणुभट्ट्या,इलेक्ट्रिकल मशिनरी आणि उपकरणेयांसारख्या वस्तू आयात करतो. ''

''आपण आपला माल इतर देशांना विकायला पाहिजे आणि अमेरिकेकडून ज्या वस्तू आयात करतो त्या गोष्टी इतर देशांकडून आयात करायला पाहिजेत.''

'' या गोष्टी ताबडतोब होत नसतात. त्यासाठी वेळ लागतो. इतर देशांचे दुसऱ्या देशांशी आधीच करार झालेले असतात. आपलेही करार झालेले असतात. त्यामुळे साहजिकच नाही म्हटले तर थोडाफार फरक पडतोच ना?''

''भारतानेही आता अमेरिकेशी संपूर्ण संबंध तोडले पाहिजे असे माझे मत आहे.''

''असं आहे की एक ठराविक राज्यकर्ता कायम राहत नसतो. तो बदलत असतो. राज्यकर्ता बदलला की देशाची धोरणे बदलतात. आताही भारताविषयी जो आकस अमेरिका दाखवत आहे आणि भारताशी संबंध खराब करून घेत आहे हे अमिरिकेतीलच लोकांना व लोकप्रतिनिधींना आवडलेले नाही. पण ते तरी टीका करण्याशिवाय दुसरे काही करू शकत नाही. राहिली संबंध तोडण्याची गोष्ट तर तसे होत नसते. आपल्या कुटुंबातील सदस्यांत किंवा आपल्या भावकीत किंवा आपल्या नातेवाईकांत किंवा समाजातील कोणाशी काही वाद झाला तर आपण त्यांच्यासोबतचे संबंध ताबडतोब तोडत नाही. तसेच आंतरराष्ट्रीय संबंधांत असते. स्थिती एकसारखी कधीच राहत नसते. ती सतत बदलत असते.''

''पण आपणच इतके शक्तीशाली झालो पाहिजे की कोणाची आपल्याविरुद्ध वागायची हिंमत व्हायला नको. रशियाकडून सर्वांत जास्त खनिज तेलाची आयात चीन करतो, युरोपीय राष्ट्रे सुद्धा रशियाकडून बराच माल खरेदी करतात. एवढेच काय तर खुद्द अमेरिका सुद्धा रशियासोबत व्यापार करते. मग फक्त भारतावरच अशी नामर्जी का?''

''भारत हा जगातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. भारत हा प्रचंड मोठी बाजारपेठ आहे. आणि भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेली आहे. ही प्रगती काही देशांना विशेषतः प्रगत देशांना सहन होत नाही. कोणी आपल्यापेक्षा शक्तीशाली व्हायला नको ही मोठ्या देशांच्या राज्यकर्त्यांची स्वाभाविक भावना असते.''

''मग आपण काय करू शकतो की जेणेकरून ५० टॅरिफचा फटका कमीत कमी बसेल व आपली अर्थव्यवस्था कमजोर होणार नाही व सामान्य जनतेला काही त्रास होणार नाही.''

''जीएसटी सारख्या संवेदनशील बाबतींत सकारात्मक बदल करून आपले सरकार सामान्य जनतेला कसा त्रास होणार नाही याविषयी काळजी घेतच आहे. आपल्याशी चांगले संबंध असलेल्या व चांगले संबंध प्रस्थापित करू पाहणाऱ्या देशांशी सरकार सजगपणे बोलणी करत आहे. स्वदेशी वस्तूंना व उद्योग धंद्यांना सरकार प्रोत्साहन देत आहे. आपण स्वदेशी वस्तूंचा वापर जाणीवपूर्वक करायला पाहिजे. कितीही मोह झाला तरी जे देश सद्या आपल्याबद्दल वाईट भावना ठेवून आहेत त्या देशांतील कंपनीच्या वस्तू कोणत्याही परिस्थितीत न वापरणे हाच एक मार्ग अवलंबवायला हरकत नाही. स्वदेशीचा पुरस्कार व शत्रूवत वागणाऱ्या देशांतील वस्तूंवर बहिष्कार टाकणे हाच एकमेव पर्याय आहे. सरकार प्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय नियमांमुळे तसे बोलू शकत नाही परंतु आपण भारतीय स्वेच्छेने या गोष्टी करू शकतो. देशभक्ती फक्त देशभक्तीच्या पोकळ गोष्टी करून दिसत नसते. ती तुमच्या प्रत्येक विचारांत, आचारात व कार्यात प्रत्यक्षपणे दिसून आली पाहिजे. '' उदयच्या या विचारांना मात्र उपस्थित सर्वांनीच माना हलवून संमती दिली. **(समाप्त)**

# पदवीधरांचे वर्तमान व भविष्य

## शैक्षणिक



प्रा.डॉ.दीपक नागरिक
मो. 9970837347



कौशल्य-प्रगत कार्यक्रम व स्थानिक उद्यमशीलतेला प्रोत्साहन द्यण्याची गरज आहे. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बहुभाषिकता, सांस्कृतिक बुद्धिमत्ता, आणि तंत्रज्ञानातील प्रावीण्य हे महत्त्वाचे झाले आहेत. तसेच मोबिलिटी (विदेशी शिक्षण, एक्सचेंज प्रोग्राम्स) हा एक महत्त्वाचा घटक आहे जो पदवीधऱ्यांना आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्मवर साजरा करतो.

६. भविष्यकालीन तंत्रज्ञानाची दिशा व पदवीधऱ्यांसाठी संधी

तंत्रज्ञानामुळे भविष्यातील नोकऱ्यांचे स्वरूप आणि कौशल्यांची मागणी बदलणार आहे. खालील तंत्रज्ञान आणि त्यांच्या प्रभावांचे महत्त्वाचे बिंदू:

आर्टिफिशियल इंटेलिजन्स () व मशीन लर्निंग१) आणि मशीन लर्निंग यामुळे अनेक उद्योगांमध्ये प्रक्रियांचे ऑटोमेशन होत आहे.

२) यामुळे पारंपरिक नोकऱ्या कमी होऊ शकतात, पण त्याचवेळी नवीन प्रकारच्या नोकऱ्या उभ्या राहत आहेत.

३) विशेषतः डेटा-विश्लेषण, -डिझाइनिंग, आणि एथिक्स (नैतिकता) या क्षेत्रात पदवीधऱ्यांना संधी वाढते.

४) पुढील काळात चे नैतिक, सामाजिक आणि समाजशास्त्रीय परिणाम समजून घेणारे तज्ञ ( , , ) फारच आवश्यक ठरणार आहेत.

सायबर सुरक्षा

डिजिटल जगात सुरक्षेचे महत्त्व वाढले आहे; त्यामुळे सायबर-सेक्युरिटी तज्ञांची मागणी वाढणार आहे. हा क्षेत्र तांत्रिक आणि धोरणात्मक दोन्ही प्रकारच्या नोकऱ्यांसाठी खुला आहे.

हरित तंत्रज्ञान व सस्टेनेबिलिटी

क्लायमेट बदल व पर्यावरणीय आव्हाने हरित ऊर्जा, सस्टेनेबल अर्बन प्लॅनिंग आणि सर्कुलर इकनॉमी या क्षेत्रात काम करणारे पदवीधरांना वाव देतात.

जैव-तंत्रज्ञान व आरोग्य-तंत्रज्ञान

आयुष्यातील तज्ज्ञता, बायोइन्फॉर्मॅटिक्स, डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिन या क्षेत्रांमध्ये उच्च कौशल्यांची गरज असेल.

७. कौशल्य-विकास आणि शैक्षणिक सुधारणा

पदवीधर तयार करताना शाळा व महाविद्यालयांनी खालील बदल करणे आवश्यक आहे:

१. इंडस्ट्री-ऍकॅडेमिया जुडणी: अधिक अप्रेंटिसशिप, इंटर्नशिप आणि प्रोजेक्ट-आधारित शिक्षण.

२. कौशल्य-आधारित शिक्षण: संकुल अभ्यासक्रम, संप्रेषण कौशल्ये, डिजिटल साक्षरता आणि समस्या-निरूपण कौशल्ये.

३. आजीवन शिक्षणाचे मॉडेल: मिनी-कोर्सेस, प्रमाणपत्रे आणि अद्यतनित ऑनलाईन लर्निंग.

४. उद्यमशीलता व नवोपक्रम: इनक्युबेटर्स, मेन्टरशिप आणि स्टार्टअप फंडिंगसाठी अभ्यासक्रम.

५. नैतिकता व सामाजिक जबाबदारीचे शिक्षण: एथिक्स, पर्यावरणीय शाश्वतता आणि समुदाय-आधारित प्रकल्प.

मानसिक आरोग्य एक विसरलेला परंतु महत्त्वाचा मुद्दा

शैक्षणिक दबाव, बेरोजगारी चिंता, सोशल मीडिया-संबंधित तुलना आणि करिअर अनिश्चितता यांनी पदवीधरांचे मानसिक आरोग्य प्रभावित होते. काही प्रमुख पैलू:

डिप्रेशन व ऍंग्झायटी: नोकरीसंबंधी अपेक्षा न पावल्यामुळे तणाव वाढतो.

सामाजिक एकाकीपणा: खासकरून दूरचे रोजगार व स्टार्टअप जीवनातून सामाजिक जाळे बिघडू शकते.

नैराश्य व आत्महत्येच्या विचारांची वाढ: महाविद्यालयीन काळात अथवा नोकरीच्या सुरुवातीच्या टप्प्यात या समस्या गंभीर होऊ शकतात.

उपाय व हस्तक्षेप

शैक्षणिक संस्थांमध्ये काउन्सेलिंग सुविधा, - ग्रुप्स आणि तणाव व्यवस्थापन कार्यशाळा अनिवार्य कराव्या.

नियोक्त्यांनी मानसिक आरोग्याचे समर्थन ( ), फ्लेक्सिबल वर्क-आयलाइन्स व सुरक्षित कार्यस्थळे प्रदान करावीत.

समुदाय-आधारित स्थानिक हेल्थ सर्व्हिसेस आणि डिजिटल थेरपी प्लॅटफॉर्म्सचा वापर वाढवावा.

८. धोरणे, शिफारसी आणि उपसंहार

पदवीधरांच्या भविष्यासाठी विविध स्तरांवर धोरणात्मक बदल आवश्यक आहेत शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि तंत्रज्ञानिक:

धोरणात्मक शिफारसी

१. शिक्षण + उद्योग समन्वय: राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पॉलिसीमधून उद्योग-शिक्षण भागीदारीला प्रोत्साहन द्या.

२. कौशल्य-आधारित प्रमाणपत्रे: अधिक जे सतत करता येतील.

३. महिलांना समर्थ बनविणे: कार्यस्थळावरील समता, नेतृत्व विकास आणि क्रेडिट/फंडिंगसाठी विशिष्ट योजना.

४. ग्रामीण उद्यमशीलता: ग्रामीण क्षेत्रात , डिजिटल मार्केटिंग आणि लॉजिस्टिक सपोर्ट.

५. मानसिक आरोग्य धोरणे: महाविद्यालये आणि संस्थांमध्ये हार्मोनाइझड केअर; नियोक्त्यांसाठी मानसिक आरोग्य नियम.

६. टेक्नोलॉजी ॲडॉप्शनसाठी गो-टू-मार्ग: कायदे, व सायबर सुरक्षा मानके.

७. लॅबॉर मार्केट ट्रान्सपेरन्सी: रोजगार आणि कौशल्यांच्या गरजांविषयी पारदर्शकता , - .

पदवीधर हे समाजाच्या बदलत्या चेहऱ्याचे द्योतक आहेत. त्यांची संख्या वाढत असली तरी त्यांना योग्य मार्गदर्शन, कौशल्य-प्रशिक्षण, मानसिक आरोग्याचे समर्थन आणि समावेशक धोरणे देणे गरजेचे आहे. राजकीय जीवनात, उद्योगात, सामाजिक उपक्रमात आणि विज्ञान-तंत्रज्ञानात त्यांचा वाटा निर्णायक ठरेल परंतु हा वाटा सकारात्मक बनवणे हे शैक्षणिक संस्था, शासन आणि समाज या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांवर अवलंबून आहे.

आगाऊ विचार पदवीधऱ्यांसाठी व्यावहारिक कृतीसूची (चालू महिन्यासाठी)

(हा भाग मासिक-स्तरावरच्या ॲक्शन प्लॅनसाठी उपयुक्त आहे संस्थात्मक व वैयक्तिक पातळीवर लागू शकणारे त्वरित पावले.)

१. महाविद्यालयीन स्तरावर कमीतकमी एक कौशल्य-आधारित प्रकल्प पूर्ण करा (किमान ३-६ आठवडे).

२. समुदायाशी जोडलेल्या एका छोटे सामाजिक-उद्योग उपक्रमात सहभागी व्हा (रिलायबल मानसशास्त्र/काउन्सेलिंग/कौशल्य-शिविर).

३. महिन्यातील एका दिवशी मानसिक आरोग्य तपासणी/डिटॉक्स द्या डिजिटल डिटॉक्स/फोकस-टाइम.

४. स्थानिक उद्योजक किंवा ग्लोबल नेटवर्कशी कनेक्ट व्हा कमीतकमी दोन नेटवर्किंग कॉल.

५. तंत्रज्ञानाच्या एक नवीन घटकाचा प्राथमिक कोर्स पूर्ण करा (उदा. डेटा बेस, ).

पदवीधर हे समाजात एक बदलकर्ता आणि प्रगतिशील घटक आहेत. त्यांच्या प्रशिक्षणाचा दर्जा, उपलब्ध संधी, आणि मानसिक व शैक्षणिक समर्थन हे त्यांच्या भविष्यातील यशाचे मुख्य घटक ठरतील. राजकीय योगदान, महिलापदवीधऱ्यांचे सशक्तीकरण, ग्रामीण-शहरी अंतर कमी करणे आणि तंत्रज्ञानाच्या सकारात्मक वापराने आपण पदवीधरांना फक्त नोकरी देण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांना नेतृत्व, नवोन्मेष आणि सामाजिक परिवर्तनाचा भाग बनवू शकतो. **(समाप्त)**

# नाना पाटेकरांचा जीव जडला होता नेपाळी अभिनेत्रीवर



मराठमोळे बॉलीवूड नाना पाटेकर आणि मूळची नेपाळची असलेली अभिनेत्री मनीषा कोईराला यांचं नातं ९० च्या दशकात खूप चर्चेत होतं. दोघेही त्या काळात चित्रपटसृष्टीत आपापल्या अभिनयाने नाव कमावत होते. पण एका चित्रपटाच्या सेटवर झालेल्या ओळखीनंतर हळूहळू त्यांच्यात जवळीक वाढली. दोघे प्रेमात पडले. नाना पाटेकर विवाहित होते, तर मनीषा अविवाहित होती. मात्र या नात्याभोवती वाद, गैरसमज आणि मतभेदही होते. काही काळ रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर नाना व मनीषा वेगळे झाले होते.

'अग्निसाक्षी' या चित्रपटाच्या सेटवर नाना पाटेकर व मनीषा कोयराला यांची पहिली भेट झाली होती. १९९६ साली प्रदर्शित झालेल्या अग्निसाक्षी चित्रपटात नाना पाटेकर व मनीषा कोईराला मुख्य भूमिकेत होते. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान मनीषा कोईराला २० वर्षांनी मोठ्या असलेल्या विवाहित नाना पाटेकर यांच्या प्रेमात पडली. त्यानंतर संजय लीला भन्सालीच्या खामोशी चित्रपटातही त्यांनी एकत्र स्क्रीन शेअर केली होती. या चित्रपटात ते वडील-मुलीच्या भूमिकेत होते. परंतु, सेटवर त्या दोघांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या.मनीषा कोईरालाला नाना पाटेकरांशी लग्न करायचं होतं, असं म्हटलं जातं. नाना पाटेकर तेव्हा पत्नीपासून वेगळे राहत होते, त्यामुळे लग्न करुन आपल्याबरोबर संसार थाटावा, असं मनीषा कोईरालाला वाटत होतं. त्याचदरम्यान, नाना पाटेकरांचं नाव अभिनेत्री आएशा जुल्काबरोबरही जोडलं गेलं होतं. नाना पाटेकर व आएशाला रुममध्ये एकत्र पाहिल्यानंतर मनीषाने ब्रेकअप केलं असं म्हटलं जातं.

नाना पाटेकर विवाहित असूनही मनीषाबरोबर नात्यात होते. त्यामुळे त्यांच्या नात्यात नेहमीच असुरक्षितता आणि दडपण राहिलं. नानांचा थोडा आक्रमक आणि रागीट स्वभाव, तर मनीषाचा भावुक आणि संवेदनशील स्वभाव यामुळे दोघांमध्ये मतभेद होत, असं म्हटलं जातं. त्यातच मनीषाने नाना व आएशा जुल्काला एकत्र पाहिल्यानंतर ब्रेकअप केलं होतं, असं म्हटलं जातं.

# आरोग्यासाठी वेलची अतिशय उपयुक्त



वेलची केवळ चव आणि सुगंध वाढवण्यासाठीच वापरली जाते असा अनेकांचा गैरसमज आहे. चहा, गोड पदार्थ किंवा अन्य पदार्थांमध्ये मिसळला जाणारा हा छोटासा पदार्थ केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही तेवढाच उपयुक्त आहे. आयुर्वेदात वेलची औषधी मानली जाते. आयुर्वेदानुसार, औषधांमध्ये, पचन सुधारण्यासाठी, तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासाठी, हृदय मजबूत करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी वेलचीचा वापर केला जातो. आधुनिक संशोधनानुसारदेखील हे स्पष्ट झाले आहे.आयुर्वेदात वेलचीला मसाल्याची राणी म्हणतात. कारण त्यात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स, खनिजे आणि जीवनसत्त्वे शरीराचे अनेक आजारांपासून संरक्षण करतात. तज्ज्ञांच्या मते, दैनंदिन आहारात वेलचीचा समावेश केल्याने पचनापासून ते हृदयाच्या आरोग्यापर्यंत अनेक फायदे होतात. वेलचीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. ते रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. वेलचमधील अँटी-ऑक्सिडंट्स कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित ठेवतात आणि हृदयाचे ठोके सामान्य राखण्यास मदत करतात. वेलचीचे नियमित सेवन हृदय निरोगी ठेवते आणि रोगांचा धोका कमी करू शकते. शरीरातील अतिरिक्त मीठ आणि पाणी बाहेर काढण्यास वेलची मदत करते आणि त्यामुळे हृदयावरील दबाव कमी होतो.वेलचीचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे पचनक्रियेत मदत करते. त्यात असलेले सक्रिय घटक पाचक एंजाइम्स उत्तेजित करतात. त्यामुळे गॅस, आम्लता आणि पोट फुगणे यासारख्या समस्या कमी होतात. चहा किंवा खिचडीमध्ये थोडी वेलची पावडर घालावी. रात्रीच्या जेवणानंतर वेलची चावल्याने पचनक्रिया सुधारते.

# २ तास २३ मिनिटांच्या सिनेमाने बजेटपेक्षा चौपट केली कमाई



अनपेक्षित घटनांभोवती हा चित्रपट फिरतो. क्लायमॅक्सपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा हा चित्रपट दृश्यमची आठवण करून देतो. 'सूक्ष्मदर्शिनी' असं या सिनेमाचं नाव आहे.साउथ इंडस्ट्री आपल्या वेगळ्या आणि प्रभावी कथानकासाठी कायम ओळखली जाते. त्यांचे रोमँटिक, ॲक्शन, सस्पेन्स-थ्रिलर प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी ठरतात. जर तुम्हीही घरबसल्या एखादा थरारक चित्रपट पाहण्याचा विचार करत असाल, तर हा चित्रपट नक्की पाहा. या चित्रपटातील सस्पेन्स व क्लायमॅक्स इतका दमदार आहे की तुम्ही थक्क व्हाल.या चित्रपटाचं नाव आहे.

'सूक्ष्मदर्शिनी'. हा नोव्हेंबर २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला २ तास २३ मिनिटांचा मल्याळम मिस्ट्री थ्रिलर सिनेमा आहे. सूक्ष्मदर्शिनीचे दिग्दर्शन एम.सी. जितिन यांनी केलं आहे. बासिल जोसेफ, नजरिया नजीम आणि अपर्णा राम यांनी यात महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. विशेष म्हणजे, प्रमोशन न करताही या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बजेटपेक्षा जवळपास चारपट जास्त कमाई केली आहे. सूक्ष्मदर्शिनी' या सिनेमाची कथा प्रिया नावाच्या एका गृहिणीभोवती फिरते. ती आपल्या पती व मुलासोबत आनंदाने आयुष्य जगत असते. मात्र त्यांच्या कॉलनीत मॅन्युअल आणि त्याची आई ग्रेस राहायला येतात आणि त्यानंतर प्रियाच्या आयुष्यात अनपेक्षित वळणं येऊ लागतात आणि हळूहळू सगळं बदलू लागतं. सिनेमात इंटरव्हलनंतर कथानक पूर्णपणे बदलतं आणि क्लायमॅक्समध्ये उलगडणारं गुपित पाहून प्रेक्षक चक्रावून जातात.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 158



रसकस
श्रीगणेशा
हिमनग
हिरवळ
हिरमोड

**पाच अक्षरी**

तरफदार
ताटकळणे
पेचप्रसंग
सरसावणे
संगीतकार

**सहा अक्षरी**

चर्वित चर्वण

**अन्य अक्षरी**

माफीचा साक्षीदार
(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द**

**दोन अक्षरी**

कदा
गीत
चाम
टक
टका
दास
फीट
मोर
याग
रज
वर
वसा
संथ
स्वस्थ
हित
क्षीर

**तीन अक्षरी**

अनिल
आळशी
अस्थमा
आवक
आयाळ
आश्रीत
आळशी
उदास
कनक
कटरा
काळोख
खराब
गडवा
चाकर
टपोरा
थडगे
पोटशी
प्रवाह
फलक
फुलका
मखर
रजब
शाश्वत
सालस
संवाद
संतूर

**चार अक्षरी**

उफाळणे
कुतूहल
चाकवत
दलभार
दर्शनिका
फारकत
फुटकळ
मोबदला
रगदार
रचयिता

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | | अ | व | न | ती | | प | स | र | ट | | दे | ह |
| ल | स | वि | | व | र | | द | म | | | ज | ह्नं | |
| वा | | चा | हू | ल | | स | र | स | | प | र | त | |
| | स्वा | री | | वि | | र्व | | | स | र्व | | प्रा | ची |
| अ | र्थ | | वि | शे | ष | ज्ञ | | मा | ल | | अ | य | |
| ह | | ग | | ष | | | पा | य | | अ | नि | श्चि | त |
| म | ग | र | | | कं | गा | ल | | अ | | वा | त | |
| ह | | ज | ग | त | पा | ल | क | | प्रा | चा | र्य | | अ |
| मि | ठी | | रू | प | | बे | | ह | मा | ल | | मे | ल |
| का | | ता | ड | न | | ट | | क | णि | क | | ह | य |
| | भा | र | | | प्र | | | ना | क | | धू | र | |
| सं | ग | ण | क | | का | र्य | वा | ह | | वि | | म | ध |
| | व | | | वा | र | | र | क | म | वा | र | | र |
| श | त | पा | व | ली | | ठ | स | | ग | हि | व | र | णे |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 539



—: आडवे संकेत :—

१) ज्ञानपीठ पारितोषिक विजेती कादंबरी 'ययाती' चे लेखक
५) जसे कृत्य कराल तसे त्याचे परिणाम भोगावे लागतात या अर्थाचा एक वाक्प्रचार
११) धान्य मोजण्याचे एक वजनी परिमाण
१२) राशी, ढीग
१३) ओकारी होईल असे वाटणे
१४) मार्ग, रस्ता
१६) सैन्याला पुरविण्यात येणारा दारूगोळा, दाणागोटा वगैरे
१८) वनात राहणारा
२०) देव, ईश्वर
२१) ईश्वराचे अस्तित्व अंमान्य करणारा
२२) तृष्णा, पाणी पिण्याची इच्छा होणे
२३) एका वर्षातील एकंदर महिने
२४) प्रवाशांना वाहून नेणारे एक वाहन
२५) एक लाख ही संख्या
२६) गर्भगळीत होणे
२८) रामायणातील विद्वान खलनायक
२९) वर्ण, रंग
३०) बोलावणे, प्रारंभ
३३) मंत्रवून शरीराला बांधलेला दोरा
३४) १९९१ साली प्रदर्शित झालेला श्रीदेवी व ऋषी कपूरचा एक चित्रपट
३६) 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे'अशी गर्जना करणारे लोकनेते
३९) संतोष, तृप्ती
४०) श्रीमद्‌भगवतगीतेचे संक्षिप्त उच्चारण
४१) झुंज, चुरशीचा खेळ
४२) पाणी वाहून नेण्याची चामड्याची पिशवी
४३) सावधान, चौकस, दक्ष
४४) आश्चर्य, चमत्कार, नवी गोष्ट
४५) व्याकुळ, घाबरा
४७) ठसा, छाप, ओतणी
४८) चापल्य, कार्यशक्ती, उत्साह
५०) महाभारतात पांडवांकरीता चमत्कारिक सभागृह बांधणारा दानव
५१) लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिलेले श्रीमद्‌भगवतगीतेवरील भाष्य
५३) निबर, कठीण
५५) साखर, केशर घालून केलेला भात
५७) श्रीमानचे संक्षिप्त रूप
५८) डोकं खाजवायला प्रवृत्त करणारा एक क्षुद्र जीव
५९) घरातील कचरा
६०) जमिनीच्या पोटात बांधलेली खोली
६३) पसरलेल्या वस्तू, गोंधळ
६५) धोबी. परीट
६७) समुद्र किंवा नदीचा किनारा
६८) विषम, वरखाली, खडबडीत
६९) सूट, कसर
७१) श्यामल रंगाचा
७२) देवालय
७३) नागाच्या फण्यावर असलेला आंकडा
७४) आश्रयस्थान
७५) टवाळखोर
७६) राजनीती
७७) स्वर, आवाज

—: उभे संकेत :—

१) व्याकरणात ज्या नामाने एका विशेष वस्तूचा, प्राण्याचा किंवा समूहाचा बोध होतो ते नाम
२) माळ, जिंकणे
३) रांजण, मोठे पोट
४) शारीरिक व्यायान
५) चावी, दु:खाची रग, तीव्र वेदना
६) हिंग
७) समय, प्रसंग
८) खाणे, उपभोग
९) बुध कौशिक ऋर्षीनी रचलेले श्रीराम स्तोत्र
१०) ग्रामीण भाषेत पादत्राण, जोडा
१३) २०१५ मध्ये भारत रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक
१४) इंग्रजी राजवटीला प्रखर विरोध करणारे आद्य क्रांतिकारक
१५) गोळा करणे, जमविणे
१७) व्हॉलिबॉल खेळात एका चमूत असलेले एकंदर खेळाडू
१८) विवाह समारोहात वधूवरांची वाजत गाजत काढलेली मिरवणूक
१९) इतिहास, वर्तन
२३) पोरकट, लहान मुलांसारखे वागणे
२७) तालासुरात गीत गायन करणारा
२९) गावातील भले मोठे घर
३०) आजोबा
३१) वडिलोपार्जित मालमत्तेचा हकदार,
३२) पसंती, कबुली, होकार
३३) भारतातील सर्वात मोठी नदी
३५) चष्मा, चाळिशी
३६) केवळ लौकिकासाठी करण्यात येणारा शिष्टाचार
३७) मागच्या बाजूचे
३८) मृदू, मुलायम
४१) प्रामाणिक, सज्जन
४३) डांबरी रस्ता
४४) एक खनिज द्रव्य
४६) हिंदू धर्मात वर्णित चार वेदांपैकी एक
४७) समर्थ रामदास स्वामींचा 'सज्जनगड' या जिल्ह्यात आहे
४९) पहाट, सकाळ
५२) प्रत्येक वर्षी
५४) लाकूड कापण्याचे हत्यार
५६) अतिशय क्रोध, संताप
६१) पात्र, भांडे, मडके
६२) घोडा आणि गाढवी यांच्यापासून झालेली मिश्र उत्पत्ती
६३) एक चर्मवाद्य
६४) मस्ती, आवेश, जोम
६६) मुंबई—पुणे मार्गावरील एक घाट
६८) मूषक
६९) गंध उगाळण्याचा दगड
७०) सुंदर स्त्री
७३) मूल्य, किंमत (उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त्रि | पु | री | पौ | र्णि | मा | | व | रा | ती | मा | गू | न | घो | डे | |
| ता | र | | त्र | | न | ख | रा | | क्षण | | | ग | ड | | श |
| ल | व | ण | | दि | वं | ग | त | | | ग | क | | न | ज | र |
| | णी | | सं | वा | द | | | त | रु | त | ल | | व | र | ण |
| ओ | | सा | ग | | ना | | अ | प | क्ष | | म | धु | रा | | |
| म | धु | म | ती | | | दृ | | की | | गु | | त | | प्र | |
| | रं | | दो | ष | दृ | ष्टी | | र | म | णी | | का | ट | को | न |
| बो | ध | | ष | ट् | | आ | | | ळी | | व | र | | प | ग |
| च | र | खा | | का | बा | ड | क | ष्ट | | गा | ऱ्हा | णे | | | र |
| का | | स | वा | र | | सृ | ष्टी | | का | व | ड | | हा | य | से |
| र | ग | दा | र | | दृ | ष्टी | | अं | ग | ठी | | उ | | स | व |
| णे | | र | | दृ | ढ | | प्र | | | | उ | पा | शी | | क |
| | प्रा | | वि | | प्र | ति | बं | ध | क | उ | पा | य | | न | |
| आ | ज्ञा | | सं | त | ती | | धि | क्का | र | | स | | ज | ख | म |
| क्षे | | | ग | | ज्ञ | | का | | व | र | मा | य | | भ | र |
| प | रि | चि | त | | | खो | | क | त | वा | र | | स्म | र | ण |

Uday Munde - 8446302691

# लग्नानंतर २ वर्षांनी मराठी अभिनेता होणार बाबा!



मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्याने नुकतीच सोशल मीडियावर आनंदाची बातमी शेअर केली आहे. हा अभिनेता लग्नानंतर दोन वर्षांनी बाबा होणार आहे. आजवर अनेक मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेल्या या अभिनेत्याचं नाव आहे आकाश नलावडे. सध्या तो 'स्टार प्रवाह'च्या 'साधी माणसं' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे.आकाश नलावडे ( ८ सप्टेंबर ) आज त्याचा वाढदिवस साजरा करत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने अभिनेत्याने सोशल मीडियावर एक खास गुडन्यूज शेअर केली आहे. तो लवकरच बाबा होणार आहे. आकाशची पत्नी रुचिकाने, बॅकग्राऊंडला प्रेग्नन्सी टेस्ट किटचा फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. रुचिकाने यावर, ''आमच्या घरी लवकरच बाळाचं आगमन होणार आहे. आम्ही प्रेग्नंट आहोतदेवा तुझे खूप खूप आभार'' असं कॅप्शन दिलं आहे.रुचिका पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिते, ''ही आनंदाची बातमी अनेक दिवस आम्ही गुपित ठेवली होती.'' यापुढे तिने 'लव्ह'', ''आमच्या घरचा नवीन सदस्य'' असे हॅशटॅग्ज दिले आहेत. या पोस्टवर मराठी कलाकारांसह नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. साक्षी गांधी, दिगंबर नाईक यांनी कमेंट्समध्ये प्रतिक्रिया देत आकाश व रुचिका यांना शुभेच्छा दिल्या आहेत.आकाश नलावडेच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं तर, अभिनेत्याने २०२२ मध्ये रुचिका धुरीसह साखरपुडा केला होता. यानंतर १८ मार्च २०२३ रोजी आकाश आणि रुचिका यांनी लग्नगाठ बांधली. त्याच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते.अभिनेत्याने यापूर्वी 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'सहकुटुंब सहपरिवार' मालिकेत पश्या ही भूमिका साकारली होती. यानंतर गेल्यावर्षी प्रदर्शित झालेल्या 'साधी माणसं' मालिकेत त्याला मुख्य भूमिका करण्याची संधी मिळाली. यामध्ये त्याच्यासह अभिनेत्री शिवानी बावकर प्रमुख भूमिका साकारत आहे.

# राशी-भविष्य

**मेष** : आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. प्रिय व्यक्तीसोबत अनावश्यक मतभेद होऊ शकतात.

**वृषभ:** आज, तुमच्या धाडसाच्या आणि शौर्याच्या बळावर, तुम्ही काही धोकादायक काम करू शकाल.

**मिथून** : दिवसाची सुरुवात चांगली आणि प्रगतीशील असेल. लांबचा प्रवास किंवा परदेश दौरा होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : आज तुम्ही तुमच्या शत्रूंवर किंवा विरोधकांवर विजय मिळवाल. काही महत्त्वाचे काम पूर्ण होईल. तुमच्यावरील खोटे आरोप दूर होतील. तुम्ही बरोबर असल्याचे सिद्ध व्हाल.

**सिंह** : तुम्ही एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी व्हाल. व्यवस-ायात परिश्रमपूर्वक आणि वेळेवर काम करा. अडथळे दूर होतील.

**कन्या** : कुटुंबात आराम आणि सोयीसुविधांवर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. तुम्ही तुमच्या आवडीचे काहीतरी खरेदी कराल आणि ते घरी आणाल.

**तुळ** : आज वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक निर्माण झाल्यामुळे महत्त्वाचे काम यशस्वी होईल. व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृश्चिक** : आज उपजीविकेचा शोध पूर्ण होईल. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. विलासी कामात गुंतलेल्या लोकांना यश आणि आदर मिळेल.

**धनु** :आज तुम्हाला कामावर जाण्याची इच्छा होणार नाही. कुटुंबात काही अनुचित घटना घडण्याची भीती असेल.

**मकर** : आज तुम्ही राजकारणात वर्चस्व गाजवाल. व्यवसायात नवीन भागीदार फायदेशीर ठरतील. वाहन खरेदी करण्याची तुमची जुनी इच्छा आज पूर्ण होईल.

**कुंभ** : आज दिवसाची सुरुवात चांगल्या बातमीने होईल. राजकारणात पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी तुमच्या व्यवस्थापनाचे कौतुक होईल.

**मीन** : तुमच्या आयुष्याशी संबंधित गोष्टी सार्वजनिक ठिकाणी लोकांना सांगू नका. तुमचे विरोधक या गोष्टीचा गैरफायदा घेऊन त्रास देऊ शकतील.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

महत्त्वाचे

## वडकीत येवतीकरांचे अर्धनग्न आंदोलन

**राळेगाव :** तालुक्यातील येवती येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि. १२) थेट वडकी येथील महावितरण कार्यालय गाठले. आपल्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी, ग्रामस्थांनी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

गावात अनेक दिवसांपासून वीजपुरवठा अनियमित असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही महावितरणचे अधिकारी दखल घेत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. 'येत्या चार दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास, आम्ही कार्यालयाला टाळे ठोकून चक्काजाम आंदोलन करू,' असा निर्वाणीचा इशारा यावेळी देण्यात आला. उपसरपंच आशिष पारधी यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात पंकज गावंडे, किशोर राऊत, सागर वाघ, ऋषभ दरोडे, समीर कुरटकर, अभिजित बोबडे, संजय कुबडे, विनोद चाफले यांच्यासह येवती येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## युवक काँग्रेसचे स्वाक्षरी अभियान

**अमरावती:** सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या संविधान विरोधी कारभारा विरोधात युवक काँग्रेस तर्फे आज ''वोट चोर गद्दी छोड'' अशा घोषणांनी गगनभेदी नारे देत स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. हे अभियान डॉक्टर पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आले.या अभियानात शेकडो विद्यार्थी व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपला रोष व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी करून लोकशाहीची पायाभरणी मजबूत करण्यासाठी आणि जनादेशाचा अपमान करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध ठाम भूमिका घेतली.जनतेच्या मतांचा अनादर करून सत्तेत बसलेल्या सरकारविरुद्ध युवकांचा संघर्ष सुरू असून, या स्वाक्षरी अभियानाद्वारे लोकशाहीची खरी ताकद दाखविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहता युवक काँग्रेसचे हे अभियान पुढील काही दिवस शहरातील महाविद्यालये, बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी राबविण्यात येणार आहे, असे यावेळी अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख यांनी सांगितले.

## आश्रमशाळांनी व मदरशांनी गोवर-रुबेला लसीकरणात सहभाग नोंदवावा

**वाशिम :** वाशिम जिल्ह्यात १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान राबविण्यात येणाऱ्या विशेष गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेत जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळा व मदरसांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृतीदलाची बैठक पार पडली. या बैठकीत आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, समाजकल्याण विभाग तसेच स्थानिक बालरोग तज्ज्ञ संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून ही मोहीम यशस्वी करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. राज्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये ५ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विशेष गोवर-रुबेला लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. काही जिल्ह्यांतील आश्रमशाळांमध्ये गोवरचा उद्रेक झाल्यामुळे आरोग्य विभागाने हा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत पात्र सर्व विद्यार्थ्यांना गोवर-रुबेला लसीचा एक अतिरिक्त डोस दिला जाणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत गोवर व रुबेला रोगांचे निर्मूलन करणे, लसीकरणाचे प्रमाण ९५ टक्क्यांपेक्षा जास्त करणे आणि दोन्ही डोस घेतलेल्या मुलांमध्ये ड्रॉपआउट दर शून्य करणे ही प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

# अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती : दि. १२ :** परिसरातील शासकीय वसाहत मध्ये नांदगाव पेठ पोलिसांनी धडक कारवाई करून अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.१२ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नांदगाव पेठेतील शासकीय वसाहतीत अचानक धाड टाकली असता, तेथे एका घरात एलपीजी सिलेंडरची मोठ्या प्रमाणावर साठवणूक करून मशीनद्वारे अवैधरित्या रिफिलिंगचे काम सुरू असल्याचे आढळून आले. या धाडीत तब्बल ५८ एलपीजी



सिलेंडर, ३ रिफिलिंग मशीन, २ मोठे वजन काटे असा सुमारे चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आला.

या प्रकरणी साबीर लष्कर हासिम लष्कर (वय ४०, रा. शासकीय वसाहत, नांदगाव पेठ, अमरावती) यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध पुढील कारवाई सुरू आहे.

नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा हा अवैध व्यवसाय उघड झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.विविध कंपन्यांचे जवळजवळ ५८ सिलेंडर याठिकाणी आढळून आले. सिलेंडर मधून गॅस रिफिलिंग करून ऑटोचालक व ग्राहकांना विकण्याचा गोरखधंदा याठिकाणी गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होता.सिलेंडरच्या अवैध साठवणुकीमुळे आणि मशीनद्वारे केलेल्या बेकायदेशीर रिफिलिंगमुळे कोणत्याही क्षणी भीषण स्फोट होऊन मोठे अनर्थ घडण्याची शक्यता होती.याबाबत पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना गुप्त माहिती मिळताच त्यांनी या गंभीर प्रकरणी तत्काळ कारवाई करत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून संपूर्ण साहित्य जप्त केले.

ही धडक कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या नेतृत्वाखाली, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व सपोआ कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पो. उपनि. नवलकर, पोहेका राऊत, पो.शि. निलेश साविकार, राजा सय्यद, राजिक खान आणि वैभव तिखीले यांनी महत्वाची भूमिका बजावली.या संपूर्ण कारवाईनंतर नांदगाव पेठ परिसरात अवैध गॅस रॅकेटचा पर्दाफाश झाल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले असून, अशा अवैध धंद्याविरोधात कठोर कारवाई सुरू राहावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## उध्दट वागणूक देणाऱ्या ठाणेदारावर कारवाई करा !

### अनसिंग येथील नागरिकांचे पोलिस अधिक्षकांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम : दि. १२ :** गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत केलेल्या उद्धट वागणुकीसह धार्मिक भावना दुखावल्यामुळे जबाबदार असलेल्या ठाणेदारासह अन्य अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अनसिंग शहरातील अवैध धंद्यांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र तपास समिती नेमावी आणि भविष्यात धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांदरम्यान नागरिकांच्या भावनांचा आदर राखत योग्य बंदोबस्ताची हमी देण्याची मागणी अनसिंग येथील नागरिकांनी जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान अनसिंग येथील ठाणेदारांच्या निष्काळजीपणामुळे आणि शून्य नियोजनामुळे संपूर्ण शहरात गोंधळाची परिस्थिती निर्माण होवून मागील २० वर्षात गणेश उत्सवादरम्यान जो प्रकार घडला नाही तो यावर्षी घडला. गणेश विसर्जनाची वेळ संपल्यानंतर सर्व मंडळांनी उच्च न्यायालयाचा व पोलीस प्रशासनाचा मान ठेवून दहा वाजता वाद्य बंद केली तरी सुद्धा ठाणेदारांनी अचानक कारवाई सुरू केली. आणि पोलीस स्टेशन मध्ये गाड्या घेऊन गेले. मंडळातील कार्यकर्त्यांनी साहेबांना नम्रपणे विनंती केली की, जो काही दंड होईल, आम्ही ताबडतोब भरण्यास तयार आहोत, फक्त आत्ता दंड आकारा आणि आम्हाला विसर्जनाची परवानगी द्या, परंतु ठाणेदारांनी कुणाच्याही विनंतीकडे दुर्लक्ष करून उद्धट व अपमानास्पद वागणूक दिली.

## आंतरराज्यीय जुगार अड्ड्यासह दोन ठिकाणी छापे

### १८ जण ताब्यात, साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि.१२ :** पांढरकवडा पोलिसांनी जुगार अड्ड्यांवर दोन मोठ्या कारवाया करत १८ जणांना अटक केली आहे. महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील अड्ड्यासह, कुसळ गावातील चक्क एका अंगणवाडीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्याचा पर्दाफाश केल्याने खळबळ उडाली आहे. या दोन्ही धाडींमध्ये साडेतीन लाखांवर मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यातील दुसरी कारवाई अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. कुसळ गावातील ज्या अंगणवाडीत लहान मुलांना शिक्षणाचे आणि संस्काराचे धडे दिले जातात, त्याच पवित्र वास्तूचा वापर रात्रीच्या वेळी जुगाराचा डाव रंगवण्यासाठी होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी सापळा रचला आणि धाड टाकली असता, १० जण जुगार खेळताना रंगेहाथ सापडले. त्यांच्याकडून पोलिसांनी एक लाख ८४ हजार ९०० रुपयांची रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. या प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यापूर्वी, महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील पिंपळखुटी येथील नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर आंतरराज्यीय जुगार अड्डा सुरू असल्याची खात्रीशीर खबर पोलिसांना मिळाली होती.

या ठिकाणी तेलंगणातील व्यक्तीही मोठ्या संख्येने जुगार खेळण्यासाठी येत असल्याची माहिती होती. त्यानुसार, पोलिसांनी अचानक धाड टाकून आठ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ताब्यात घेतलेल्यांमध्ये सुधीर रासमवार, व्यंकना व्यंकट रेड्डी येनुगवार, नवनीत गोपीडवार, नंदू भुमन्ना नागुलवार, रमेश गंगाराम बावणे, रवी आशारेड्डी रासमवार, श्रीकांत देवारेड्डी येलमवार आणि सुभाष कुशाल गंगुलवार यांचा समावेश आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बंसल आणि पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल कावरे, सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रमोद घोटेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पथकाने ही धडक कारवाई पार पाडली.

## राज्याचे मुख्यमंत्री आज यवतमाळात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** राष्ट्रीय संत मुरारी बापू यांच्या अमृतवाणीतून सुरू असलेल्या रामकथेचा लाभ घेण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज शनिवारी, (दि. १३) यवतमाळ येथे येत आहेत. सकाळी ९.३० वाजता ते थेट कथास्थळी पोहोचून बापूंचे दर्शन घेणार असून, रामकथा श्रवण करणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे यवतमाळात सुरू असलेल्या या भव्य आध्यात्मिक सोहळ्याला राजकीय महत्व प्राप्त झाले आहे.



मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोजकांकडून जय्यत तयारी सुरू आहे. या दौऱ्याची अधिकृत माहिती प्रचार प्रसार समितीचे संयोजक विजयकुमार बुंदेला यांनी दिली आहे. त्यांनी सर्व पत्रकार बांधवांना नियोजित वेळेपूर्वी पत्रकार कक्षात उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

## जगदंबेच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांवर खड्ड्यांचे विघ्न



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि.१२ :** एकीकडे नवरात्रोत्सवाची तयारी आणि केळापूरच्या जगदंबा देवीच्या दर्शनाची ओढ, तर दुसरीकडे रेंगाळलेले उड्डाणपुलाचे बांधकाम आणि खड्डेमय रस्त्यांचे विघ्न... राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४वरील उड्डाणपुलाच्या अत्यंत संथ गतीने सुरू असलेल्या कामामुळे केळापूर गाव वाहतूक कोंडीच्या आणि अपघातांच्या छायेत सापडले असून, नवरात्रीसाठी येणाऱ्या हजारो भाविकांची सुरक्षा धोक्यात आली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून उड्डाणपुलाचे काम रखडल्याने, महामार्गावरील संपूर्ण जड वाहतूक गावातील अरुंद आणि आधीच मोडकळीस आलेल्या सर्व्हिस रोडवरून वळविण्यात आली आहे. दिवस-रात्र धावणाऱ्या ओव्हरलोड वाहनांमुळे या रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे दुचाकी आणि चारचाकी चालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. महामार्ग प्राधिकरणाचे अभियंते क्वचितच फिरकत असल्याने कंत्राटदार मनमानी पद्धतीने निकृष्ट दर्जाचे काम करत असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. नवरात्रीमध्ये विदर्भ, मराठवाडा, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातून येणाऱ्या हजारो भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि संभाव्य अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. यामध्ये सर्व्हिस रोडची दुरुस्ती करणे, वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त लावणे आणि ओव्हरलोड वाहनांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या तातडीच्या उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे.

### अरुंद रस्त्यांवर ओव्हरलोड वाहनांचा धुमाकूळ

केळापूरमधील सर्व्हिस रोड हे कधीही महामार्गावरील जड वाहतूक सहन करण्यासाठी बनवले गेले नव्हते. मात्र, आता दिवसभर ओव्हरलो ट्रक आणि कंटेनर या रस्त्यांवरून धडधडत जात असल्याने रस्त्यांशेजारी असलेल्या घरांनाही धोका निर्माण झाला आहे. या जीवघेण्या वाहतुकीमुळे नागरिक दहशतीखाली जगत असून, चालकाच्या एका चुकीमुळे मोठा अपघात होऊ शकतो, अशी भीती सातत्याने व्यक्त होत आहे. प्रशासनाने यावर वेळीच नियंत्रण न मिळविल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सरकारला शेतकऱ्यांचा विसर, कर्जमाफीचा शब्दही फोल

### जिल्हा काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल, अतिवृष्टीने शेतकरी संकटात



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** एकीकडे अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेला शेतकरी, दुसरीकडे मदतीच्या नावाने केवळ कोरडी आश्वासने... या पार्श्वभूमीवर, यवतमाळ जिल्हा काँग्रेसने आक्रमक पवित्रा धारण केला आहे. सरकारने शेतकऱ्यांची घोर निराशा केली असून, निवडणुकीपूर्वी दिलेला कर्जमाफीचा शब्द न पाळल्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करत काँग्रेसने सहा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केले आहेत.

जिल्हा काँग्रेस कमिटीच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही मदत न मिळाल्याने सरकार गंभीर नसल्याचा आरोप करण्यात आला. जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर यांनी कर्जमाफी न देण्याच्या सरकारच्या धोरणाचा निषेध करणारा ठराव मांडला. तसेच, राहुल ठाकरे यांनी अतिवृष्टीग्रस्तांना तत्काळ मदत देण्याची, प्रकाश शर्मा यांनी ई-पीक पाहणीसाठी मुदतवाढ देण्याची, तर दत्ताराव शिंदे यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करणारे ठराव मांडले. ॲड. जयसिंग चव्हाण यांनी कापसावरील आयात शुल्क रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. हे सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, वसंत पुरके उपस्थित होते.

### काँग्रेसचे सहा ठराव, सरकारला सवाल

जिल्हा काँग्रेसने मंजूर केलेले ठराव म्हणजे सरकारच्या धोरणांविरोधातील आरोपपत्रच आहे. निवडणुकीपूर्वी दिलेले कर्जमाफीचे आश्वासन का पाळले नाही?, अतिवृष्टीग्रस्तांना मदत कधी मिळणार?, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अडचणीत का आणले?, ई-पीक पाहणीसाठी पुरेसा वेळ का दिला जात नाही? आणि ओला दुष्काळ जाहीर करण्यास दिरंगाई का? असे थेट सवाल या ठरावांमधून सरकारला विचारण्यात आले आहेत.

### स्वबळाचा नारा, कार्यकर्त्यांना संदेश

या बैठकीतून काँग्रेसने आगामी निवडणुकांसाठी रणशिंग फुंकले आहे. जिल्ह्यातील सर्व निवडणुका पक्ष स्वबळावर पूर्ण ताकदीनिशी लढणार असल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे आणि इतर वरिष्ठ नेत्यांनी कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचे भावनिक आवाहन केले. यातून पक्षाने कार्यकर्त्यांमधील एकी टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

## कोनसरीच्या लेकींच्या हाती आले 'स्टिअरिंग' ४५ दिवसांच्या कठोर प्रशिक्षणानंतर १९ महिला कुशल कार्यबलात सामील

**कोनसरी:** पुरूषी मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या ड्रायव्हिंग क्षेत्रात आता गडचिरोलीच्या लेकींनी आत्मविश्वासाने प्रवेश केला आहे. लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने (एलएमईएल) कोनसरी गावातील १९ महिलांना वाहन चालविण्याचे व्यावसायिक प्रशिक्षण देऊन थेट कंपनीच्या सेवेत सामावून घेतले आहे. त्यांच्या या नव्या प्रवासाने महिला सक्षमीकरणाचा एक नवा अध्याय लिहिला आहे.

याच वर्षी जून महिन्यात या १९ महिलांना कंपनीने मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील अशोक लेलँडच्या निवासी प्रशिक्षण केंद्रात पाठवले होते. तेथे ४५ दिवसांचे कठोर प्रशिक्षण पूर्ण करून या महिलांनी हलकी मोटार वाहने चालविण्याचे कौशल्य आत्मसात केले. प्रशिक्षणानंतर कोनसरी येथील लॉईड्स कौशल्य विकास केंद्रात झालेल्या समारंभात, या महिलांना नियुक्तीपत्र, प्रमाणपत्र आणि वाहनचालन परवाना देऊन कंपनी परिवारात त्यांचे स्वागत करण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबवण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. शिस्त आणि सुरक्षिततेच्या जोरावर प्रगती करण्याची संधी या महिलांना मिळाली आहे, ज्यामुळे त्यांच्या कुटुंबातही अभिमानाचे आणि आनंदाचे वातावरण आहे.

दिशा महिला अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसा.मर्या.बुलडाणा
र.नं. बीयुडी(बीयुडी) सी.एस.आर./सी/आर/375/2017

वार्षीक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त कायम सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद,
मा.श्री/सौ:

संस्थेच्या सर्व कायम सभासदांना कळविण्यात येते की, दिशा महिला अर्बन को.ऑप क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा रजि.नं.375 ता.जि.बुलडाणा ची 07 वी वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 28/09/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता राजर्षी टॉवर समोर, सेठी प्लाझा, चिखली रोड, सुंदरखेड बुलडाणा येथे आयोजित केली आहे. सभेत खालील विषय ठेवण्यात येत आहे.
तरी सभेस आवर्जुन उपस्थित राहावे ही विनंती.

-: सभेपूढील विषय :-

1. सभेसाठी सभा अध्यक्षांची निवड करणे बाबत.
2. मागील सभा दिनांक 25/08/2024 चे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
3. दि.31/03/2025 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे आर्थिक पत्रके (ताळेबंद, नफातोटा, जमाखर्च पत्रक) मंजुर करणे.
4. संस्थेच्या सन 2024-25 वर्षाच्या वैधानिक अंकेक्षण अहवालाचे नोंद घेणे बाबत.
5. सन 2023-24 च्या वैधानिक अंकेक्षण अहवालातील दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे बाबत.
6. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकानुसार कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी व सन 2025-26 च्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबत.
7. संस्थेच्या सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी शासनाचे नामतालीकेवरील वैधानिक लेखापरीक्षकाची निवड करणे व नियमानूसार लेखापरीक्षण शुल्क ठरविणे बाबत.
8. संस्थेचा सन 2024-25 च्या नफ्याचे विभागणी (विनियोजन) करणे बाबत.
9. एक रकमी सामोपचार परतफेड योजनेनुसार कर्जदाराला सवलत दिलेल्या थकीत कर्जखात्याची माहिती घेऊन मान्यता देणे बाबत.
10. संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडील असलेल्या कर्जाचा तपशील सादर करणे बाबत.
11. मा.सहकार आयुक्त ह्यांचे परिपत्रकीय आदेशानुसार आदर्श उपविधी स्विकारणे बाबत.
12. मा.अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या विनंतीनुसार

दिनांक:- 28/09/2025
स्थळ :- भोंडे सरकार चौक, बु.जि.के सह. बँकेसमोर बुलडाणा
गणेश शेळके, मुख्य कार्यकारी अधिकारी
सविता विजय डुकरे, अध्यक्ष

01. गणसंखेच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी 1 तासानंतर घेण्यात येईल या सभेत वरील सुचनेत नमुद केल्याप्रमाणे सर्व कामकाज होईल. या सभेस गणसंखेची आवश्यकता राहणार नाही.
02. कृपया सभासदांनी या वार्षीक सभेची नोटीस नुसार वेळेवर उपस्थीत रहावे.
03. सभेची नोटीस वर्तमान पत्रामध्ये तसेच मुख्यालयी व शाखांच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे कृपया नोंद घ्यावी.

विरोध | किनगांव राजा ग्रामस्थांची मागणी

# सौर कृषी वाहिनी प्रकल्प अन्य जागेवर स्थलांतरीत करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**किनगांव राजा, दि. १२ :** किनगांव राजा येथे मानवी वस्ती जवळ होत असलेला मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प स्थलांतरीत करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे,शासकीय जमीन गट क्र.५२५ मधील एच-क्लास जागेवर सौर कृषी वाहिनी प्रकल्प नियोजित असुन स्थानिक नागरीकांनी दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणी केली आहे.इतर ठिकाणी शासकीय जमीन असताना याच जमिनीचा अट्टाहास कशासाठी करण्यात येतो असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.शासकीय जमीन गट नंबर ६२३ मध्ये १३.३४ हेक्टर ,गट ७०२ मध्ये ८.४१ हेक्टर जमीन उपलब्ध असून या ठिकाणी नियोजित सौर कृषी वाहिनी प्रकल्प स्थलांतरित करावा अशी मागणी स्थानिक नागरीकांनी केली आहे.

किनगांव राजा येथील फुलेनगर परिसरामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प तयार करण्यात येणार आहे,परंतु याच शासकीय जमिनीमध्ये सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून शेकडो वृक्षांची लागवड करण्यात आली होती,वृक्षरोपण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वृक्षाची देखभाल व संवर्धन करण्याची जबाबदारी सन २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायत प्रशासनाला हस्तांतरित करण्यात आली होती.याच वनीकरणांमध्ये शेकडो पशुपक्षी वास्तवास आहे.सौर कृषी वाहिनी प्रकल्प मुळे शासकीय जमिनीवर असलेल्या वृक्षांची वृक्षतोड होईल त्यामुळे वनक्षेत्र पुर्णपणे नष्ट होणार आहे.

नियोजित सौर कृषी वाहिनी प्रकल्पालगत मानवी वस्ती लागूनच असल्यामुळे प्रकल्पामुळे येथील वृक्षतोड झाल्याने प्रकल्पाचे सोलर पॅनल त्या ठिकाणी बसविण्यात आल्याने तेथील तापमानात वाढ होईल तसेच अशा प्रकारच्या मोठ्या सोलर प्रकल्पात वापरण्यात येणाऱ्या सोलर पॅनल मुळे प्रदूषण वाढते,तसेच अशा प्रकारच्या मोठ्या सोलार प्रकल्पात वापरण्यात येणाऱ्या सोलार पॅनल मुळे प्रदूषण वाढते उष्णता परावर्तित होऊन जनजीवन विस्कळीत होईल,मानवी वस्तीस लागून असल्यामुळे भविष्यात मानव कल्याणाच्या योजना ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्याची आवश्यकता नाही. शासकीय कार्यालय किंवा इतर सार्वजनिक योजना राबवण्यासाठी सदरचे क्षेत्र योग्य आहे.प्रकल्पाला नागरिकांचा विरोध नसून फक्त तो इतर शासकीय जमिनीवर स्थलांतरित करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.या निवेदनामध्ये किनगाव राजा येथील शेकडो जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

फुलेनगर वस्तीच्या लगतच शासकीय जमिनीवर सौर कृषी वाहिनी प्रकल्प तयार करण्यात येणार आहे, त्यामुळे मानवी वस्तीला त्यांचा त्रास होणार आहे.याठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये वृक्ष असल्यामुळे त्याची तोड होणार आहे,त्यामुळे सदर प्रकल्प हा इतर शासकीय जमिनीवर स्थलांतरित करावा अन्यथा आंदोलन करण्यात येणार आहे.

**मधुकर साळवे**
ग्रामस्थ किनगांव राजा

किनगांव राजा येथे शासकीय जमीन मोठ्या प्रमाणामध्ये आहे.सौर कृषी प्रकल्प हा गट ६२३ किंवा ७०२ मध्यें स्थलांतरित करावा,मुख्यमंत्री सौर कृषी प्रकल्पला कोणाचाही विरोध नाही,परंतु स्थानिक ग्रामपंचायत कडून मानवी वस्तीलगत असलेल्या शासकीय जमिनीवरचा हट्टाहास केला जात आहे.त्यामुळे मानवी वस्तीतील नागरीकांना भविष्यामध्ये त्याचा त्रास नागरिकांना होणार आहे.त्यामुळे सदर प्रकल्प इतर शासकीय जमिनीवर स्थलांतरित करावा.

**विद्या दिपक साळवे**
ग्रा.सदस्य किनगांव राजा

राजर्षी शाहू ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या.शिरपूर
र.नं. बीयुडी (बीयुडी) आर.एस.आर./सी/आर/333/2002

वार्षीक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त कायम सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद,
मा.श्री/सौ:

संस्थेच्या सर्व कायम सभासदांना कळविण्यात येते की, राजर्षी शाहू ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या. शिरपूर र.नं 333 ता.जि.बुलडाणा ची 23 वी वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 28/09/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता राजर्षी टॉवर समोर, सेठी प्लाझा, चिखली रोड, सुंदरखेड बुलडाणा येथे आयोजित केली आहे. सभेत खालील विषय ठेवण्यात येत आहे.
तरी सभेस आवर्जुन उपस्थित राहावे ही विनंती.

-: सभेपूढील विषय :-

1. सभेसाठी सभा अध्यक्षांची निवड करणे बाबत.
2. मागील सभा दिनांक 25/08/2024 चे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
3. दि.31/03/2025 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे आर्थिक पत्रके (ताळेबंद, नफातोटा, जमाखर्च पत्रक) मंजुर करणे.
4. संस्थेच्या सन 2024-25 वर्षाच्या वैधानिक अंकेक्षण अहवालाचे नोंद घेणे बाबत.
5. सन 2023-24 च्या वैधानिक अंकेक्षण अहवालातील दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे बाबत.
6. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकानुसार कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी व सन 2025-26 च्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबत.
7. संस्थेच्या सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी शासनाचे नामतालीकेवरील वैधानिक लेखापरीक्षकाची निवड करणे व नियमानूसार लेखापरीक्षण शुल्क ठरविणे बाबत.
8. संस्थेचा सन 2024-25 च्या नफ्याचे विभागणी (विनियोजन) करणे बाबत.
9. एक रकमी सामोपचार परतफेड योजनेनुसार कर्जदाराला सवलत दिलेल्या थकीत कर्जखात्याची माहिती घेऊन मान्यता देणे बाबत.
10. संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडील बाकी असलेल्या कर्जाचा तपशील सादर करणे बाबत.
11. मा.सहकार आयुक्त ह्यांचे परिपत्रकीय आदेशानुसार आदर्श उपविधी स्विकारणे बाबत.
12. कार्यालयाचे बांधकाम व गोदाम बांधकामा बाबत.
13. मा.अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या विनंतीनुसार

दिनांक:- 28/09/2025
स्थळ :- राजर्षी टॉवर, चिखली रोड, सुंदरखेड बुलडाणा
भागवत गव्हाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी
रामराव लक्ष्मण शेळके, अध्यक्ष

1. गणसंखेच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी 1 तासानंतर घेण्यात येईल या सभेत वरील सुचनेत नमुद केल्याप्रमाणे सर्व कामकाज होईल. या सभेस गणसंखेची आवश्यकता राहणार नाही.
2. कृपया सभासदांनी या वार्षीक सभेची नोटीस नुसार वेळेवर उपस्थीत रहावे.
3. सभेची नोटीस वर्तमान पत्रामध्ये तसेच मुख्यालयी व शाखांच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे कृपया नोंद घ्यावी.

महत्त्वाचे

## भारताचा 'हिटमॅन' शर्मा 'ॲक्शन मोड' मध्ये



**नवी दिल्ली** :आशिया कप २०२५ ला ( २०२५)सुरुवात झाली असून या स्पर्धेत आतापर्यंत तीन सामने खेळवण्यात आले आहेत. या स्पर्धेसाठी भारतीय टी-२० संघ सध्या यूएईमध्ये आहे. तर त्याच वेळी, एकडे भारतात भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने( ) ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वीच आपल्या सरावाला सुरुवात केली आहे. रोहित शर्मा गेल्या काही काळापासून भारताचे माजी सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्यासोबत सराव करत आहे. रोहित शर्माकडून ११ सप्टेंबर रोजी इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये तो नेटमध्ये फलंदाजी करताना दिसून येत आहे. रोहित शर्माने व्हिडिओ पोस्ट करून लिहिले की, खूप छान वाटत आहे.

## लिटन दास आर्मीने उडविला हाँगकाँगचा धुव्वा!

**नवी दिल्ली** : आशिया कप २०२५ स्पर्धेतील तिसरा सामना काल बांगलादेश आणि हाँगकाँग यांच्यात खेळवण्यात आला. या सामन्यात कर्णधार लिटन दास (३९ चेंडूत ५९ धावा) च्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर बांगलादेशने हाँगकाँगचा ७ विकेट्सने पराभव केला. या विजयासह बांगलादेशने पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय विजय मिळवला आहे. हा सामना गुरुवारी शेख झायेद क्रिकेट स्टेडियमवर खेळवण्यात आला.बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला तर हाँगकाँग संघाने प्रथम फलदाजी केली. हाँगकाँग संघाने ७ विकेट्स गमावून बांगलादेशसमोर १४३ धावा उभ्या केल्या.

हाँगकाँगकडून निजाकत खानने सर्वाधिक ४२ धावांचे योगदान दिले. बांगलादेशकडून तन्झिम हसन साकिबने शानदार गोलंदाजी करत २ विकेट्स घेतल्या.

# सात्विक-चिरागची उपांत्य फेरीत धडक!

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय पुरुष दुहेरीतील आघाडीचे खेळाडू सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी आपला विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. शुक्रवारी (दि. १२) झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्यांनी मलेशियाच्या जोडीवर तीन गेममध्ये २-१ ने थरारक विजय मिळवला.गेल्या काही आठवड्यांपासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या सात्विक आणि चिराग यांनी अलीकडेच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे. हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत त्यांनी आरिफ जुनैदी आणि रॉय किंग याप या जोडीवर २१-१४, २०-२२, २१-१६ अशी मात केली. ५ लाख अमेरिकन डॉलर्स बक्षीस असलेल्या या स्पर्धेतील हा सामना ६४ मिनिटे

## मलेशियाच्या जोडीवर २-१ ने थरारक विजय



चालला.आठव्या मानांकित भारतीय जोडीने सुरुवातीला संथ सुरुवात केली, परंतु १२-१२ अशी बरोबरी साधल्यानंतर त्यांनी वेग पकडला. जोरदार स्मॅश मारत त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना संधी दिली नाही आणि सलग पाच गुण घेत पहिला गेम जिंकला.दुसऱ्या गेममध्ये मात्र मलेशियाच्या खेळाडूंनी जोरदार पुनरागमन केले. त्यांनी भारतीय जोडीला सर्वच पातळ्यांवर टक्कर दिली. सुरुवातीला पिछाडीवर पडल्यानंतर त्यांनी ६-६ अशी बरोबरी साधली आणि त्यानंतर बहुतांश वेळेस आघाडी घेतली. अखेर सात्विक-चिरागने २०-२० अशी बरोबरी साधली. परंतु, मलेशियाच्या जोडीने शेवटपर्यंत झुंज देत हा गेम २०-२२ ने जिंकून सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली.निर्णायक तिसऱ्या गेममध्ये भारतीय खेळाडूंनी त्यांच्या खेळाचा स्तर उंचावला. त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना एकदाही आघाडी घेऊ दिली नाही आणि सहज विजय मिळवून उपांत्य फेरीत धडक मारली. गुरुवारी जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असलेल्या सात्विक आणि चिरागने थायलंडच्या पीरत्चाई सुकफुन आणि पक्कपॉन तेरारत्सकुल यांचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले होते.पुरुष दुहेरीमध्ये सात्विक आणि चिराग यांनी उपांत्य फेरी गाठली असताना, पुरुष एकेरीच्या एका सामन्याने उत्सुकता वाढवली आहे. या सामना दोन भारतीय खेळाडूंमध्ये रंगणार आहे. ही लढत उपांत्यपूर्व फेरीची असून यात लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी आमने-सामने असतील. यातील विजेता खेळाडू उपांत्य फेरीत प्रवेश करेल.प्री-क्वार्टर फेरीमध्ये लक्ष्य सेनने एच.एस. प्रणॉयचा २१-१५, १८-२१ आणि २१-१० ने पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. दुसरीकडे, आयुष शेट्टीने प्री-क्वार्टर फेरीच्या सामन्यात जपानच्या खेळाडूला २१-१९, १२-२१ आणि २१-१४ ने हरवून पुढच्या फेरीत जागा मिळवली.

## पाकिस्तानला धूळ चारण्यासाठी टीम इंडिया सज्ज




भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेटमधील संघर्ष हा जगातील सर्वात जुन्या व तीव्र क्रीडा प्रतिस्पर्धेत गणला जातो. जेव्हा जेव्हा हे दोन्ही संघ आमने-सामने उभे ठाकतात, तेव्हा तो केवळ एक सामना नसून तो इतिहास, भावना आणि अपेक्षा यांचा संघर्ष असतो. आता १४ सप्टेंबर रोजी दुबईमध्ये होणारी आशिया चषक स्पर्धेतील लढत पुन्हा एकदा चाहत्यांच्या हृदयाची धडधड वाढवणार आहे.

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**

आकडेवारीपासून ते सध्याच्या कामगिरीपर्यंत भारताचे पाकिस्तानवर पारडे जड असल्याचे दिसून येते. परंतु हा हायव्होल्टेज सामना असून इथे प्रत्येक षटक आणि प्रत्येक धाव एक नवा इतिहास रचते.आयसीसी स्पर्धांमध्ये पाकिस्तानवर भारताचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येते. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत झालेल्या १६ विश्वचषक सामन्यांपैकी १५ सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे.

यात एकदिवसीय विश्वचषकात दोन्ही संघांमध्ये आठ सामने झाले,

जे सर्वच्या सर्व भारताने जिंकलेआहेत. टी-२० विश्वचषकात देखील आठ सामने खेळवण्यात आले असून त्यातील ७ सामने भारताने तर १ सामना पाकिस्तानने जिंकला आहे. टीम इंडियाचे हेच यश आशिया चषकातही दिसून येते.१९८४ पासून आतापर्यंत खेळल्या गेलेल्या १६ आशिया चषकांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात १८ सामने झाले आहेत.

यापैकी १० सामन्यांमध्ये भारताने, तर ६ सामन्यांमध्ये पाकिस्तानने विजय मिळवला आहे. तर २ सामने निकाल लागला नाही.विशेष बाब म्हणजे, दोन्ही संघ आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात कधीही आमने-सामने आले नाहीत. त्यांची गाठ प्रामुख्याने गट किंवा सुपर-४ फेरीत पडली आहे.

सप्टेंबर २०२० पासून ते सप्टेंबर २०२५ पर्यंत, दोन्ही संघांनी टी-२० स्वरूपात ५ वेळा एकमेकांचा सामना केला आहे. यापैकी भारत ३-२ अशा फरकाने पुढे आहे. ही अलीकडील कामगिरी भारताचा आत्मविश्वास वाढवते.

# बॅडमिंटन आणखी वेगवान होणार

## 'बीडब्ल्यूएफ'ची २५ सेकंदांची 'टाईम-क्लॉक' प्रणाली लागू करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**

बॅडमिंटन सामन्यांना अधिक वेग देण्यासाठी, खेळाची जागतिक नियामक संस्था 'बीडब्ल्यूएफ'ने (बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन) 'टाईम-क्लॉक' प्रणालीची चाचणी घेण्यास मान्यता दिली आहे. या प्रणालीनुसार, एका रॅलीनंतर खेळाडूंना पुढील रॅलीसाठी २५ सेकंदांत तयार व्हावे लागेल. २० नोव्हेंबरपासून निवडक वर्ल्ड टूर स्पर्धांमध्ये या नियमाची अंमलबजावणी सुरू होईल.हे



नियम २०२६ पर्यंत सुरू राहतील आणि त्यांचा अधिक विस्तृतपणे वापर केला जाईल. 'बीडब्ल्यूएफ'ने एका निवेदनात म्हटले आहे की, या नियमांमुळे 'बीडब्ल्यूएफ'ला 'टाईम-क्लॉक'ची चाचणी सुरू ठेवता येईल, ज्यात खेळाडूंना पुढील रॅलीसाठी २५ सेकंदांत तयार राहावे लागेल. या प्रणालीची चाचणी यशस्वी झाल्यानंतर राष्ट्रीय महासंघांना त्यांच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांसोबत अंतर्गत चाचणी घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच, स्टेकहोल्डर्सकडून अभिप्राय घेण्यासाठी एक ऑनलाईन सर्वेक्षणही सुरू करण्यात आले आहे.'बीडब्ल्यूएफ'ने अनेक सामन्यांच्या डेटाचे विश्लेषण केल्यानंतर हा २५ सेकंदांचा नियम निश्चित केला आहे.

## महिलांच्या वर्ल्डकपमध्ये नारीशक्ती झिंदाबाद!

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आगामी महिला एकदिवसीय वर्ल्ड कपसाठी सर्व महिला अधिकाऱ्यांची निवड जाहीर केली आहे. हा निर्णय केवळ प्रतीकात्मक नसून, लैंगिक समानतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे 'आयसीसी'ने म्हटले आहे.भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या या स्पर्धेला ३० सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेचा पहिला सामना गुवाहाटी येथे यजमान भारत आणि श्रीलंका यांच्यात होईल. एकूण आठ संघ पाच मैदानांवर स्पर्धा करतील आणि अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी होईल. या पॅनेलमध्ये भारताच्या माजी खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय पंचांचा समावेश आहे. यामध्ये वृंदा राठी, एन. जननी आणि गायत्री वेणुगोपालन यांचा पंच म्हणून समावेश आहे. तसेच, भारताची माजी क्रिकेटपटू आणि पहिली महिला सामनाधिकारी (मॅच रेफ्री) जी. एस. लक्ष्मी चार सदस्यीय सामनाधिकारी पॅनेलचा भाग असतील.

## रजत पाटीदारचा शतकी तडाखा!

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**



दुलीप ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामन्यात मध्य झोन आणि दक्षिण झोन आमनेसामने उभे आहेत. मध्य झोनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. संघाला निर्णय चांगलाच फायदेशीर ठरला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या दक्षिण झोन पहिल्या डावात १४९ धावांतच गारद झाला. मध्य विभागाकडून गोलंदाजी करताना सरांश जैनने आणि कुमार कार्तिकेय यांनी मिळून ९ गडी बाद केले. धावांचा पाठलाग करणाऱ्या मध्य झोनचा कर्णधार रजत पाटीदारने शतक ठोकले आहे. या शतकासह त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी दावा ठोकला आहे.

## रुपयाच्या घसरणीत सोने झळकले

**मुंबई**: एकीकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाने गुरुवारी ऐतिहासिक नीचांकी तळ गाठला, तर दुसरीकडे सोन्याच्या दराने सर्व उच्चांक मोडीत काढत नवीन विक्रमी शिखर गाठले. राजधानी दिल्लीत गुरुवारी सोन्याच्या किमती १,१३,१०० रुपये प्रति १० ग्रॅम या नवीन उच्चांकी पातळीवर पोहोचल्या.भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार ताणामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाने ८८.४७ हा सार्वकालिक नीचांकी तळ गाठला. अमेरिकेच्या महागाई दराशीसंबंधित आगामी आकडेवारी आणि परकीय निधीच्या बहिर्गमनामुळे अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाला अधिक झळ बसली.

# ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई २.०७% वर

**नवी दिल्ली : दि. १२ प्रतिनिधी**

## खाद्यपदार्थांच्या किंमती वाढल्याचा परिणाम



ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर जुलैच्या १.६१% वरून किंचित वाढून २.०७% वर पोहोचला आहे. खाद्यपदार्थांच्या किंमतींमध्ये झालेली वाढ हे यामागील प्रमुख कारण आहे. सरकारने आज (१२ सप्टेंबर) किरकोळ महागाईचे अधिकृत आकडे जाहीर केले आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया () चे महागाई दर ४% २% च्या मर्यादेत ठेवण्याचे उद्दिष्ट आहे.महागाईमध्ये खाद्यपदार्थांचा जवळपास ५०% वाटा आहे. ऑगस्टमध्ये खाद्यपदार्थांच्या किंमतींमधील महिनानिहाय महागाई -१.७६% वरून -०.६९% झाली आहे. ग्रामीण भागातील महागाई दर १.१८% वरून १.६९% झाला, तर शहरी भागातील महागाई २.१०% वरून २.४७% वर पोहोचली आहे.४ ते ६ ऑगस्ट दरम्यान झालेल्या च्या चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीत आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी महागाईचा अंदाज ३.७% वरून ३.१% पर्यंत कमी करण्यात आला होता.महागाई वाढणे किंवा कमी होणे हे उत्पादनांच्या मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून आहे. लोकांकडे पैसा जास्त असेल तर ते जास्त वस्तू खरेदी करतात, ज्यामुळे मागणी वाढते. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडला तर वस्तूंच्या किंमती वाढतात, आणि बाजार महागाईच्या विळख्यात सापडतो. थोडक्यात, बाजारात पैशांचा अतिरिक्त ओघ किंवा वस्तूंची कमतरता ही महागाईचे कारण ठरते. याउलट, मागणी कमी आणि पुरवठा जास्त असेल तर महागाई कमी होते.ग्राहक म्हणून आपण किरकोळ बाजारातून वस्तू खरेदी करतो. या वस्तू आणि सेवांच्या किंमतींमधील बदल दर्शवण्याचे काम कन्झ्युमर प्राइस इंडेक्स () करते. आपण वस्तू आणि सेवांसाठी जे सरासरी मूल्य देतो, ते मोजते.

## माऊंटन ड्यूसाठी हृतिक रोशनचे साहस!

**मुंबई: दि. १२ प्रतिनिधी**

पेप्सिको इंडियाचा धाडसी आणि निर्भय पेय ब्रँड माउंटन ड्यू ने फक्त २० रूपयांत आपला नवीन ४०० मिली पेट पॅक आणण्याची घोषणा केली आहे. या अविस्मरणीय अनावरणासह माउंटन ड्यू ने ''डर के आगे जीत है'' या आपल्या प्रतिष्ठित तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून अधिक मूल्य आणि सुलभता प्रदान करण्यासाठी किमतीचे मूल्य वाढवले आहे. ब्रँडच्या चाहत्यांना प्रत्येक सिपमध्ये धैर्य आणि रोमांच स्वीकारण्यास प्रेरित केले जात आहे. या उत्पादनाच्या निमित्ताने माउंटन ड्यू ने प्रसिद्ध चित्रपट निर्माते अली अब्बास जफर दिग्दर्शित सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर हृतिक रोशनसह एक जबरदस्त टीव्ही जाहिरात मोहीम आणली आहे. या सळसळत्या जाहिरातीत हृतिक एक रोमांचक साहस करताना दिसतो. तो एका भीतीदायक नैसर्गिक आपत्तीचा सामना करतो. सस्पेन्स निर्माण करतानाच तो भीतीचा सामना करतो आणि पुढे जातो - पुन्हा एकदा ''डर के आगे जीत है'' हे सिद्ध करतो. ही जाहिरात हृतिकच्या निर्भय व्यक्तिरेखेवर, माउंटन ड्यू च्या धैर्य आणि विजयाचे तत्वज्ञानावर आणि ब्रँडच्या धाडसी नवीन २० रूपयांत ४०० मिलीच्या ऑफरवर प्रकाश टाकते. या मोहिमेबद्दल बोलताना हृतिक रोशन म्हणाले की, भीती ही अशी गोष्ट आहे जी आपण सर्वजण अनुभवतो. परंतु आपले धैर्य आपली ताकद ठरते. नवीन माउंटन ड्यू जाहिरात धैर्य स्वीकारण्याची आणि विश्वासाची झेप घेण्याची शक्ती पुन्हा स्पष्ट करते. मला अशा ब्रँडशी जोडले जाण्याचा अभिमान आहे जो डर के आगे जीत है या तत्वज्ञानाने लाखो लोकांना प्रेरणा देतो. आता, नवीन २० रूपयांत ४०० मिली पॅकसह माउंटन ड्यू हा अनुभव आणखी सुलभ बनवतो. पेप्सिको इंडियाच्या माउंटन ड्यू श्रेणी प्रमुख आकांक्षा दलाल म्हणाल्या, माउंटन ड्यूबाबत आमचे तत्वज्ञान नेहमीच लोकांना आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रेरित करण्याचे. आमच्या २० रूपयांत ४०० मिलीच्या पेट पॅकचे अनावरण आमच्या धाडसी ओळखीशी खरे राहून ड्यू अनुभव अधिक सुलभ बनवण्याच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे. ग्राहकांकडून आलेल्या माहितीवर आधारित राहून हा नवीन उपक्रम तडजोड न करता जास्त मूल्य देतो आणि हृतिक रोशनसोबतची आमची नवीन जाहिरात माउंटन ड्यूची व्याख्या करणाऱ्या धैर्य आणि विजयाचे सार उत्तम प्रकारे टिपते.

## हा खूप मोठा बदल ठरला आहे : तज्ज्ञ

# शस्त्रक्रियेत रोबोटिक्सचा वापर!

**नागपूर: दि. १२ प्रतिनिधी**

सर्जिकल प्रोग्राम मध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे. १०० हून अधिक रोबोटिक-असिस्टेड शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या असून, त्यामुळे ते या भागातील अत्याधुनिक आणि मिनिमली इनवेसिव्ह उपचार करणाऱ्या अग्रगण्य केंद्रांपैकी एक मॅक्स सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल, नागपूर ठरले आहे.हा महत्त्वाचा टप्पा हॉस्पिटलच्या अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे शस्त्रक्रियेत अचूकता वाढते, रुग्णांचे आरोग्य सुधारतात आणि बरे होण्याचा कालावधी कमी होतो. 'दा विंची' या अत्याधुनिक सिस्टीमवर आधारित रोबोटिक शस्त्रक्रियेच्या मदतीने डॉक्टरांना विशेषतः गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अतिशय अचूकतेने, लवचिकतेने आणि नियंत्रणासह शस्त्रक्रिया करता येते.या यशाबद्दल बोलताना डॉ. अभिनव देशपांडे, डायरेक्टर सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक ऑँकोसर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, ''शस्त्रक्रियेत रोबोटिक्सचा वापर हा खूप मोठा बदल ठरला आहे. यामुळे आम्हाला गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक नियंत्रण आणि अचूकतेने करता येतात, ज्यामुळे रुग्णांना अधिक सुरक्षितता आणि चांगले परिणाम मिळतात.''डॉ. राजविलास नरखेडे, प्रिन्सिपल कन्सल्टंट सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, लिव्हर ट्रान्सप्लांट आणि बिलियरी सर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, ''१०० शस्त्रक्रियांचा टप्पा गाठणे हे फक्त आकडेवारी नाही, तर रुग्णांचे जीवन बदलण्याचा प्रयत्न आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेच्या सहाय्यामुळे आम्ही गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया लहान चिरांद्वारे करू शकलो, ज्यामुळे रुग्णांना कमी वेदना झाल्या, लवकर बरे होणे आणि हॉस्पिटलमध्ये कमी दिवस राहणे शक्य झाले.''डॉ. जुनैद शेख, प्रिन्सिपल कन्सल्टंट युरोलॉजी आणि किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, ''युरोलॉजी आणि ट्रान्सप्लांट उपचारांमध्ये रोबोटिक असिस्टेड शस्त्रक्रिया एक मोठा बदल घडवून आणत आहे. रोबोटिक हात ३६० अंशांपर्यंत फिरू शकतात, ज्यामुळे डॉक्टरांना अतिशय गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अत्यंत अचूकतेने करता येतात. पारंपरिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत रुग्णांना खूप लवकर त्यांच्या दैनंदिन जीवनात परतता येते.''डॉ. साक्षी बंसल, सीनियर कन्सल्टंट ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाल्या, ''रोबोटिक असिस्टेड शस्त्रक्रिया केवळ डॉक्टरांसाठीच फायदेशीर नाही, तर रुग्णांच्या उपचारांमध्येही मोठा फरक घडवते. यामुळे रुग्ण लवकर बरे होतात आणि गुंतागुंतीचा धोका कमी होतो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत, रोबोटिक शस्त्रक्रिया भारतभरातील आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनणार आहेत. हे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया सर्जन आणि रूग्ण दोघांसाठी अधिक सोप्या, सुरक्षित आणि कार्यक्षम कशा बनू शकतात याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.''हॉस्पिटलने युरोलॉजी, ऑँकोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी अशा विविध क्षेत्रांत रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे.या यशामुळे मॅक्स सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल, नागपूरने प्रगत शस्त्रक्रियेसाठी विश्वासार्ह ठिकाण म्हणून आपली ओळख आणखी मजबूत केली असून रुग्णांची सुरक्षितता, उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा आणि नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे.

## महत्वाचे

### १८ सप्टेंबरला ‘महिला आयोग आपल्या दारी’

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून ‘महिला आयोग आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत नागपूर जिल्हयातील तक्रारींची जनसुनावणी १८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे होणार आहे. आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर तक्रारींची सुनावणी घेणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत कार्यरत आहे. जिल्ह्यातील अन्यायग्रस्त, पीडित महिलांनी जनसुनावणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोगातर्फे करण्यात आले आहे.

### सोन्याची साखळी चोरली

**नागपूर :** दुकानातील सोन्याची साखळी चोरल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या पाहणीतून आढळून आल्याने गुन्हा नोंदविण्यात आला आदित्य समीर कोल्हे यांचे पोलिस ठाणे तहसील हद्दीत सराफा ओळ, इतवारी येथे दुकान आहे. ११ सप्टेंबरच्या सायंकाळी ६ ते ६.३० वाजताच्या दरम्यान अंदाजे ३५ वर्षे वयाच्या अनोळखी इसमाने सोन्याची चेन विकत घेण्याच्या बहाण्याने १३ ग्रॅम वजनाची अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन नजर चुकवून चोरून घेतली. संशयाने दुकानातील कॅमेऱ्याची पाहणी केली असता नमूद अनोळखी चोरटा आपल्या पॅन्टच्या खिशात चेन टाकून घेऊन जाताना दिसून आला.

### जुगार खेळणाऱ्यावर कारवाई

**कळमेश्वर :** कळमेश्वर पोलिसांनी जुगार खेळणाऱ्यावर गुन्ह्याची नोंद केली ही कारवाई मागील बुधवारी रात्री आठ वाजता करण्यात आली स्थानिक बसस्थानकाजवळ एक इसम पैशांचा जुगार खेळवत असल्याची माहिती मिळाली त्याआधारे कळमेश्वर पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाड टाकली. यावेळी आरोपी संदीप अरुण पटेल (साई मंदिरजवळ, कळमेश्वर) हा घटनास्थळी हजर मिळून आला. अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून एक गुलाबी रंगाचा कागद (ज्यावर आकडे लिहिलेले होते), एक निळ्या रंगाचा शाईचा पेन आणि रोकड १८०० असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी कळमेश्वर ठाण्यात नमूद आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# वीज वितरणात ‘महावितरण’ प्रथम

## केंद्र सरकारच्या मानांकनात यश, १०० पैकी ९३ गुण

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी

**केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या कामगिरीमुळे कंपनीला यश मिळाले आहे.**

ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज कंपन्यांचे मानांकन निश्चित केले. पश्चिम भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण १०० पैकी ९३ गुणांसह महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असून, ‘ए’ मानांकन मिळाले आहे. मानांकन निश्चित करण्यासाठी पाच निकष ठरविण्यात आले होते. त्यापैकी संसाधन पर्याप्तता (३२ पैकी ३२ गुण), ऊर्जा परिवर्तन (१५ पैकी १५ गुण) व नियामकाच्या अनुषंगाने प्रशासन (५ पैकी ५) या तीन घटकात महावितरणला पैकीच्या पैकी गुण मिळाले. वीज कंपनीचे आर्थिक स्थैर्य या घटकात २५ पैकी २४ गुण मिळाले. जीवन सुलभता व व्यवसाय सुलभता या निकषात महावितरणला २३ पैकी १७ गुण मिळाल आहे.वीज क्षेत्रातील कामगिरीबद्दल गुणांकनाची प्रक्रिया ३ मार्च रोजी सुरू झाली होती. देशातील मानांकनामध्ये ८५पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या राज्यांचा ‘ए’गटात समावेश केला असून,यात महाराष्ट्रासह एकूण आठ राज्ये आहेत.

**करार आणि तरतूद**

ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार महावितरणने मागील अडीच वर्षात ४५ हजार मेगावॅट वीज खरेदीसाठीचे करार केले व आगामी पाच वर्षांची तरतूद केली. या करारांमध्ये नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे पुढील काळात वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असून, त्याआधारे महावितरणच्या वीजदरात पाच वर्षांसाठी सर्वच ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्यात आली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा १६ हजार मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महावितरणच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. राज्याच्या ऊर्जा परिवर्तनासाठी हा महत्त्वाचा ‘गेम चेंजर’ प्रकल्प आहे. शेतांमध्ये सौर पंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

**यशाचे कारण**

नागपूरसह अन्य सर्व प्रादेशिक विभागात महावितरणने मागील तीन वर्षांत ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी तसेच भविष्यकाळाचा वेध घेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली आहे. याशिवाय आगामी काळात राज्याची विजेची मागणी किती असेल याचा अभ्यास करून महावितरणने ऊर्जा विभागाच्या मदतीने आराखडा तयार केला. अशाप्रकारे ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

## कायम धोका ...



**नागपूर :** नागपुरातील मेडिकल चौक हे अतिशय महत्त्वाचे ठिकाण. तब्बल १२ रस्ते वाहनांनी ओसंडून वाहत असताृत पायदळ चालणाऱ्यांची संख्या सुद्धा मोठी असते मात्र, असे (छायाचित्र) अडथळे करून ठेवल्याने दुर्घटना होण्याची भीती असते या चौकातील १२ रस्त्यांवर ठिकठिकाणी ॲटोरिक्षा आणि ई-रिक्षा धोकादायक स्थितीत (अनेकदा मध्यभागी सुद्धा) उभ्या असतात.

# मोकाट श्वानांच्या लसीकरण मोहिमेस मिळाली गती !

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी



महानगरपालिकाद्वारा मोकाट कुत्र्यांची नसबंदी व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत राबविण्यात येत असलेल्या ‘मिशन रेबीज’ या मोहिमेअंतर्गत गेल्या १ ते ८ सप्टेंबरपर्यंत ३२५ कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. मनपाच्या या उपक्रमाला नागरिकाचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, ही मोहीम २८ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी आणि रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी ‘मिशन रेबीज’उपक्रम राबविण्यात येत आहे. यातून मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण येणार मदत होणार आहे. वर्ल्ड वाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस होप, मिशन रेबिज, निर्मिती पिपल्स ॲन्ड ॲनिमल वेलफेअर सोसायटी नागपूरद्वारा सामूहिक श्वान रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेची सुरुवात १ सप्टेंबरपासून सुरू आहे. या मोहिमेकरिता वर्ल्ड वाईड व्हेटर्नरी सर्व्हिस (डब्ल्यू व्हीएस) तर्फे लसीसह डॉक्टर आणि सहायक उपलब्ध करून देण्यात आले आहे. महानगरपालिकातर्फे वाहन आणि श्वानांच्या लसीकरणासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**मोठी मोहीम**

पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात कुत्र्यांच्या लसीकरणाची मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या मोहिमेत ८ सप्टेंबरपर्यंत ३२५ श्वानाचे रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले आहे. याशिवाय झोन क्रं. १ ते १० मध्ये आजारी, अपघातग्रस्त, पिसाळलेली, चावा घेणारी भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. याकरीता भांडेवाडी, गोरेवाडा आणि महाराजबाग येथे पशुनिवारा केंद्राची उभारणी केलेली असून, औषधोउपचारानंतर पश्चात मूळ जागी सोडण्यात येते,अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिली आहे.

# रसायनशास्त्र विभागात ‘केमिकल सोसायटी’चा प्रारंभ

## विविध उपक्रमांसह शिक्षकदिनाचेही आयोजन

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात ‘केमिकल सोसायटी’ निर्मिती करण्यात आली यानिमित्ताने आयोजित समारंभात समितीत १७ सदस्यांचा समावेश केला आहे.

कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर करडे यांनी भूषविले. भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (मध्य क्षेत्र नागपूर) रासायनिक विभागातील वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ नितीन नागमोते यांची उद्घाटक म्हणून उपस्थिती होती केमिकल सोसायटीच्या शिक्षक प्रभारी राधिका राजभोज, अध्यक्ष अनंत घवळे, उपाध्यक्ष लकी विश्वकर्मा आदी उपस्थिते होते

नितीन नागमोते यांनी रसायनशास्त्र विषयाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. रसायनशास्त्र हे सभोवतालच्या सर्व गोष्टींचे मूलभूत घटक आहे. विद्यार्थ्यांना आपल्या विषयात उत्कृष्टता प्राप्त करता येते रसायनशास्त्राचे सखोल ज्ञान कोणत्याही क्षेत्रात यश मिळवून देऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

**केमिकल सोसायटी**

चालू शैक्षणिक वर्षाच्या केमिकल सोसायटीत एक शिक्षक प्रभारी, अध्यक्ष, उपाध्यक्ष, १४ विद्यार्थी प्रतिनिधी, एक संशोधन विद्वान सदस्य आणि एक अशैक्षणिक कर्मचारी सदस्य अशा एकूण १७ सदस्यांचा समावेश आहे. राधिका राजभोज यांनी सोसायटीच्या वतीने दरवर्षी राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान नेट, सेट आणि गेट उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच संशोधन क्षेत्रात विशेष कार्यगिरी बजावणाऱ्या संशोधकांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विजय एम. तांगडे यांना विद्यापीठाचा ‘सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार’ प्राप्त झाल्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले. प्रा. करडे यांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. सर्वांनी शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत राहावी, असे आवाहन केले.समितीचे अध्यक्ष अनंत घवळे यांनी अनुभव विषद करत सहकाऱ्यांचे आभार मानले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त करत कार्यक्रम अधिक संस्मरणीय केला. सर्वांनी केमिकल सोसायटीच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा आणि शिक्षण, संशोधन आणि समाजसेवा या मूल्यांना पुढे नेण्याचा संकल्प केला. लकी विश्वकर्मा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जिल्ह्यात ‘सेव्हन स्टार’ महसूली गाव अभियान

## ‘सर्वसामान्यांना सुविधा व दिलासा देण्यावर भर

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत, नागपूर जिल्ह्यात ‘सेव्हन स्टार’ महसुली गाव अभियान राबवण्यात येणार आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या ‘सेवा पंधरवड्या’त होणाऱ्या या अभियानाची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी शुक्रवारी (दि. १२) दिली. यातून सर्वसामान्यांची कामे गतिमान केली जाणार आहेत.

या अभियानात सात प्रमुख कार्यक्षेत्रांवर गावांचे मूल्यांकन केले जाईल. यात पाणंद रस्ते मोकळे करणे, गरजूंना पट्टे वाटप, स्थानिक स्तरावर लोक अदालतीतून न्याय देणे, तक्रार निवारण आणि संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देणे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना ‘सेव्हन स्टार’ गाव म्हणून घोषित केले जाईल, असे डॉ. इटनकर यांनी सांगितले. प्रशासन अधिक पारदर्शी व्हावे आणि शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये सेवक वृत्ती वाढावी, हा यामागील उद्देश आहे. या पंधरवड्यात महसूल, ग्रामविकास, आरोग्य, शिक्षण अशा विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवला जाणार आहे. सर्व अधिकाऱ्यांनी जनतेला उत्तम सेवेचा अनुभव द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त प्रशासकीय आढावा बैठक

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी



प्रशासनासाठी दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तनदिनाचे आयोजन महत्वपूर्ण असून, याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक अनुयायांना आरोग्य, सुरक्षा, स्वच्छता, खानपान सुविधांचा योग्य वापर करता यावा, यादृष्टीने तातडीने नियोजन करावे तसेच, यासंबंधी खातरजमा प्रत्येक विभागाने करावी, अशा सूचना प्रशासकीय आढावा बैठकीत देण्यात आल्या.

पुढील महिन्यात दीक्षाभूमी येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे आयोजन होत आहे. त्यासाठीच्या व्यवस्थेसंदर्भातील आढावा बैठकीला माजी मंत्री सुलेखा कुंभारे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीचे डॉ.सुधीर फुलझेले, डॉ. राजेंद्र गवई यांच्यासह प्रशासनाच्या विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल,महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी विभाग प्रमुखांकडून उपरोक्त कार्यक्रमाच्या आयोजनाच्या तयारीचा आढावा घेतला. स्वच्छता, आरोग्य, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्नानगृहे, शौचालये, सुरक्षा आदी व्यवस्थेसह अनुयायांच्या आरोग्याची काळजी घेण्याची सूचना करण्यात आली. दीक्षाभूमी आणि ड्रॅगन पॅलेस येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने अभिवादनासाठी येणाऱ्या राज्याच्या विविध भागांसह देश-विदेशातील अनुयायांना सर्व प्रकारच्या आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या नियोजनाबाबत विभागनिहाय माहिती देण्यात आली. दीक्षाभूमी व परिसरात पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था, स्वच्छतेची विशेष काळजी घेत दीक्षाभूमी व ड्रॅगन पॅलेस परिसरात स्वच्छता कर्मचाऱ्यांची व्यवस्था तसेच, रेल्वेस्थानक व बसस्थानकांवरही स्वच्छतेची काळजी घेण्यात येणार आहे.

# ‘हॉट मिक्स प्लान्ट’ची दमदार कामगिरी

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी

महानगरपालिकाच्या ‘हॉट मिक्स प्लान्ट’ विभागाद्वारे जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत शहरातील रस्ते दुरुस्त करण्याचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात ‘हॉट मिक्स’ विभागाद्वारे उत्तम कार्य करण्यात आले आहे. सदर काळात शहरातील ४१ हजार ४११ चौरस मीटर क्षेत्रफळांच्या रस्त्यांची डांबरीकरण करून दुरुस्ती करण्यात आली. याच काळात शहरातील रस्त्यांवर पडलेले २,११४ खडे बुजविण्यात यश आले. डॉ. अभिजीत चौधरी यांच्या पुढाकाराने नागपूर महानगरपालिकाच्या ‘हॉट मिक्स प्लान्ट’ विभागाचे आधुनिकीकरण करण्यात आले. यामुळे कार्यक्षमतेमध्ये वाढ झाली आहे. ऐन पावसाळ्यात सुद्धा या विभागाने शहरातील रस्ते व खड्डे बुजविण्याचे काम यशस्वीपणे केले. पॅचर मशीन व इतर अत्याधुनिक साधने उपलब्ध झाल्याने रस्त्यांचे पॅच वर्क तातडीने करण्यात येत आहे. जून महिन्यात १५ हजार ३४५ चौरस मीटर क्षेत्रफळात रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली. तसेच,जुलै महिन्यात ११ हजार ७०९ चौरस मीटर तर ऑगस्ट महिन्यात १४ हजार ३५६ चौरस मीटर अशी एकूण ४१ हजार ४११ चौरस मीटर क्षेत्रातील रस्त्यांची कामे केली. याच काळात शहरातील २११४ रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले आहे. यात जून महिन्यात ६४१ खड्डे बुजविण्यात आले. तसेच, जुलै व ऑगस्ट महिन्यात अनुक्रमे ५४६ व ९२७ खड्डे बुजविण्याचे काम झाल्याचे कार्यकारी अभियंता अजय डहाके यांनी म्हटले आहे.

**दिव्यांग सर्वेक्षण ...** दिव्यांगांना योजनांचा लाभ घेण्यासाठी सुविधांची गरज प्रतिपादित

# ‘युडीआयडी कार्ड’साठी ‘एसओपी’ तयार करा: आयुक्त

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी

**महानगरपालिकाद्वारे दिव्यांगांचा एकत्रित डाटा संकलित करण्यासाठी मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने महात्मा गांधी सेवा संघ यांच्या माध्यमातून आशा सेविकांमार्फत दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले.**



हे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, त्याच्या अहवालानुसार युडीआयडी कार्ड पासून वंचित दिव्यांगांचे ‘युडीआयडी कार्ड’ तयार करण्याकरिता तातडीने ‘एससोपी’ तयार करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. महात्मा गांधी सेवा संघ यांचेद्वारे दिव्यांग सर्वेक्षणाचा अहवाल मनपा आयुक्तांना सुपूर्द करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., उपायुक्त डॉ. रंजना लाडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर उपस्थित होते. महात्मा गांधी सेवा संघचे विजय कान्हेकर यांनी अहवाल सोपविला. याप्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, डॉ. स्नेहल शंभरकर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नितीन शेंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. समता भटनागर, डागा रुग्णालयाच्या डॉ. एस.एन. खानम, सीआरसी नागपूरचे संचालक प्रफुल्ल शिंदे, दिव्यांग समन्वयक अभिजीत राऊत आदी उपस्थित होते. मनपाच्या आशा सेविकांमार्फत २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाची ओळख करून घेण्यासाठी दहाही झोनमध्ये एप्रिल ते जून २०२५ या कालावधीमध्ये दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले. याकरिता आशा सेविकांना प्रशिक्षण देखील देण्यात आले. त्यानुसार आशांनी शहरातील ५ लाख २० हजार ३६० घरांतील ९२ हजारावर दिव्यांगांचे सर्वेक्षण केले. यातील १४ हजार ९१६ दिव्यांगांकडे आधार कार्ड तर ७० हजार ८८४ संभाव्य दिव्यांगांकडे ‘यूडीआयडी कार्ड’ नसल्याची माहिती पुढे आली आहे. याशिवाय मतदार कार्ड, बँक खाते तसेच शासकीय योजनांपासून देखील अनेक दिव्यांग वंचित असल्याचे स्पष्ट झाले. दिव्यांगांना मनपा व शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी ‘यूडीआयडी कार्ड’ अनिवार्य आहे. त्यामुळे वंचित दिव्यांगांचे लवकरात लवकर कार्ड तयार करण्यासाठी ‘एसओपी’ निर्धारित करण्यासाठी समिती गठीत करण्याचे निर्देश दिले. समितीमध्ये वैद्यकीय आरोग्य अधिकारी, दिव्यांग समन्वयक यांचा समावेश असावा, असेही त्यांनी सूचित केले. ‘यूडीआयडी कार्ड’ तयार करण्यासाठी ४० टक्क्यांच्यावर दिव्यांगत्व असलेल्यांचा व युवा दिव्यांगांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने प्रक्रिया केली जाणार आहे.

# शिवसेनेने फोडली समस्यांना वाचा

नागपूर, दि. १२ प्रतिनिधी



मानेवाडा परिसरात ‘शिवसेना आपला दारी’ हा उपक्रम जोरात सुरू असून, प्रभाग क्रमांक ३२ मधील स्थानिक नागरिकांच्या गंभीर समस्या झोन कार्यालयात एका निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेने, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविला जात आहे. शिवसेनाकडून सामाजिक कार्यकर्ते प्रेम (हितेश) मुंदाफळे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मनपा हनुमान नगर झोन क्र. तीनचे सहाय्यक आयुक्त नरेंद्र बावनकर यांना विविध समस्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. बजरंग नगर, बोधिवृक्ष नगर, कैलास नगर, ज्ञानेश्वर नगर, सावित्रीबाई फुले नगर, विश्वकर्मा नगर, आदिवासी नगर, कौशल्य नगर, ताज नगर, वेळेकर ले-आऊट व कुकडे ले-आऊट या भागातील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनिय आहे. गल्ली क्र. १ ते १७ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण न झाल्याने खड्डेमय रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे.

**वाहते सांडपाणी...**

नाल्यांचे खोलीकरण व झाकणांची व्यवस्था नसल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. डास व जीवजंतूंची उत्पत्ती वाढतच आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने कचऱ्यांचे ढिगारे साचत असून, दुर्गंधी त्रासदायक ठरत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

बजरंग नगरातील उद्यानच गायब झाल्याने बालक आणि ज्येष्ठ नागरिक बगिच्यातील सुविधांपासून वंचितच आहेत. अशाप्रकारांमुळे दक्षिण नागपुरातील लोकांचे आरोग्य आणि सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात तातडीने उपाययोजना न झाल्यास नागरिकांचा रोष उफाळून येईल, असा इशाराही निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला शिष्टमंडळात राहुल हेडाऊ, प्रवीण इंगोले, सोनू (साहिल) देठे, पंकज इटनकर, मुकेश भंडारी, प्रकाश काळे, श्रीकांत तराळे, अनिल वासनकर यांच्यासह अन्य शिवसैनिक उपस्थित हजर होते.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com




# जनआक्रोश: बलात्काऱ्याला फाशी द्या

## सात दिवस आरोपीला आश्रय देणाऱ्यांचीही चौकशी व्हावी; लव जिहादविरोधी कायदा तातडीने लागू करा -आ.जगताप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ : गडंकी येथील अल्पवयीन मुलीवर गणेश विसर्जनाच्या दिवशी चाकूचा धाक दाखवत झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेविरोधात शुक्रवारी अकोल्यात जनआक्रोश उसळला. सकल हिंदू समाजाच्या वतीने शहरातील सर्वात मोठा निषेध मोर्चा काढण्यात आला.**

### असा निघाला मोर्चा

मोर्चाला सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास जुने शहरातील श्री राजेश्वर मंदिरासमोरून प्रारंभ झाला. मोर्चा जयहिंद चौक, मोठा पूल, महाराणा प्रताप चौक (सिटी कोतवाली), गांधी रोड, महापालिका, पंचायत समितीसमोरून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यासाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मोर्चाला संबोधित केले. सुमारे दीड वाजता मोर्चा संपला.

दुपारी राजराजेश्वर मंदिर येथून मोर्चाला सुरुवात झाली. हजारो महिला, युवक, युवती हातात निषेध फलक व भगवे झेंडे घेऊन हिंदू पीडिता के सन्मान में, हर हिंदू मैदान में अशा घोषणा देत सहभागी झाले. मोर्चा जय हिंद चौक, गांधी रोड मार्गे तहसील कार्यालय मार्गे थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. बलात्काऱ्याला फाशी द्या अल्पवयीन मुलींवरील अत्याचार थांबवा अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून सोडले. सकल हिंदू समाजाच्या प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. या घटनेने समाजाच्या सुरक्षिततेला हादरा बसला आहे. दोषींना उघड्यावर आणून कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, आरोपीला सात दिवसांनी पकडले, या काळात त्याला आश्रय देणाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच महाराष्ट्रात लव जिहादविरोधी कायदा तातडीने लागू झाला पाहिजे.

मोर्चात खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार संग्राम जगताप यांसह हजारो सलक हिंदू समाज सहभाग होता. महिलांच्या डोळ्यात अश्रू तर युवकांच्या नजरेत संताप स्पष्ट दिसत होता. गणेश विसर्जनाच्या मंगल वातावरणात घडलेल्या या घटनेने अकोला जिल्हा हादरून गेला आहे.



मोर्चामुळे शहरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. मात्र पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. सकल हिंदू समाजाने इशारा दिला की, आरोपीला तातडीने फाशी न दिल्यास उग्र आंदोलन उभे राहील. हा मोर्चा केवळ एका पीडितेच्या न्यायासाठी नसून सर्व मुलींच्या सुरक्षिततेसाठीचा लढा आहे, असा संदेश यातून देण्यात आला.

### आक्रमक होताच दुकाने बंद

१) जनआक्रोश मोर्चाची सुरुवात झालेल्या जयहिंद चौकातील बहुता:श दुकाने बंद होती. व्यावसायिकांनी स्वत:हून दुकाने बंद ठेवून अत्याचाराच्या घटनेचा निषेध नोंदवावा, असे आवाहन काही युवकांनी केले. त्यानंतर उघडी असलेली दुकाने बंद झाली.

२) मोर्चा गांधी रोडवर पोहोचला. याठिकाणी तयार कापडासह अन्य काही दुकाने सुरु होती. पुन्हा तरूणांनी व्यापाऱ्यांनी दुकाने बंद स्वत: बंद करून निषेध करावा, अशी विनंती केली. मात्र याकडे काही व्यापाऱ्यांनी दुर्लक्ष केले. परिणामी काही तरूणांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यानंतर सर्व व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली.

### वाहतूक वळवली

मोर्चात अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठ्या संख्येने पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षकांसह कर्मचारी मोठ्या संख्येने होते. जयहिंद चौकाकडून राजेश्वर मंदिराकडे, मोठ्या पुलाकडून जयिंहद चौकाकडे, कोतवालीकडून टिळक रोडकडे, तहसील कार्यालयाकडून मनपाकडे व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पंचायत समितीकडे जाणारी वाहतूक काही वेळसाठी वळवण्यात आली होती.

## 'एक खिडकी' सुरु करण्याचे निर्देश

**अकोला :** सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात येणारे नवदुर्गा उत्सव, विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन यासह विविध सण-उत्सव आनंदात आणि नियमांचे पालन करत साजरे व्हावेत, तसेच आवश्यक परवानग्या सोप्या पद्धतीने मिळाव्यात यासाठी 'एक खिडकी प्रणाली' कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.नियोजन भवनात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी मीना यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी आणि सार्वजनिक उत्सव मंडळांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## थकीत पाणी बिलांचा घोळ संपता संपेना

### रेकॉर्ड नसल्याने बिलात मोठ्या प्रमाणात वाढ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** घरगुती आणि वाणिज्य वापर असलेल्या नळधारकांना थकीत पाणीपट्टीसाठी कनेक्शन कट करण्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे. परंतु दुसरीकडे पाणीपुरवठा विभागाने पाणीपट्टीची मोठी बिले दिल्याने नळ धारकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. भरलेली बिले पुन्हा चालू बिलात वाढवून दिल्याने महापालिका कार्यालयात दुरुस्तीसाठी नागरिकांच्या रांगा लागत आहेत. पाणीपुरवठा विभागाचा हा घोळ संपण्याचे नाव घेत नसून यामुळे कमालीचा गोंधळ उडाला आहे.

पाणीपुरवठा विभागाची थकबाकी शंभर कोटींच्या वर पोहोचली असून दरम्यानच्या कालावधीत सदर काम कंत्राटदाराकडे दिल्यामुळे जुने रेकॉर्ड गायब झाल्याची परिस्थिती आहे. मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी थकीत असल्याने आयुक्त यांनी पाणीपुरवठा विभागाला तात्काळ वसुली करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने नळ धारकांना बिले जारी केली. दरम्यानच्या कालावधीत नियमित बिल न मिळाल्याने थकबाकी वाढत गेली. त्यापूर्वी कंत्राटदाराकडे सदर काम असताना जी दिले भरण्यात आली होती, त्याचे रेकॉर्ड कंत्राटदाराने महापालिकेकडे सुपूर्द केले नाही. त्यामुळे चालू बिलात ही रक्कम वाढवून आली आहे. सदर बिले घेऊन नागरिक महापालिका कार्यालयात येत आहेत. मात्र, रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने नागरिक अडचणीत सापडले आहेत. ज्या नागरिकांकडे बिल भरल्याची पावती आहे, त्यांना चालू बिलातून रक्कम कमी करून देण्यात येत आहे. ज्यांच्याकडे जुनी बिले नाही, त्यांना बिल भरण्यास अडचण निर्माण झाली आहे. बिलाचा हा गोंधळ कंत्राटदाराने केला असल्याची ओरड होत असली तरी, पाणीपुरवठा विभागाने रेकॉर्ड घेताना तपासणी केली नाही का असा सवाल उपस्थित होत आहे.

## हरकती दाखल करण्यासाठी शेवटचा एक दिवस

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध झाली असून त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी आता केवळ एक दिवस उरला आहे. शनिवार व रविवार महापालिका कार्यालयाला सुट्टी असल्याने सोमवारी अखेरच्या दिवशी हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. शुक्रवार, दि. १२ पर्यंत १८ हरकती दाखल झाल्या आहेत.

अकोला महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दि. ३ सप्टेंबर रोजी २० प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यात आली. त्यावर हरकती व सुचना दाखल करण्यासाठी ३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे. अद्यापपर्यंत १८ हरकती व सूचना दाखल झाल्या असून शुक्रवार, १२ सप्टेंबर रोजी, प्रभाग क्रं. १५ मध्ये काही भाग राष्ट्रीय महामार्ग ६ ओलांडून दुसऱ्या प्रभागामध्ये समाविष्ट करण्यात आल्याने हरकत घेण्यात आली आहे. हा भाग प्रभाग क्रं. १५ मध्ये समाविष्ट करण्याबाबत २ हरकती प्राप्त झाल्या आहेत.

प्रभाग रचनेच्या नकाशावर आक्षेप घेण्याबाबत १ हरकत असून ए.पी.एम.सी. मार्केट ते रेल्वे बोगद्यापर्यंतचा भाग प्रभाग क्रं. ७ मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात १ हरकत तसेच प्रभाग क्रं. ३ च्या रचनेवर आक्षेप घेण्यात आला आहे. प्रभाग क्रं. १२ मधील प्रगणक गट क्रं. ४०७, ४०९ व ४१४ प्रभाग क्रं. ११ मध्ये समाविष्ट करण्याविषयी हरकत घेतली आहे. प्रभाग क्रं. १२ मधील प्रगणक गट क्रं. ४११ प्रभाग क्रं. ११ मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात हरकत घेतली आहे. प्रभाग क्रं. २० मधील प्रभाग रचना (प्रगणक गट क्रं. ६४४ व ६२६) वर आक्षेप घेण्यात आला आहे. प्रभाग क्रं. १ व २ मध्ये दुरूस्ती करण्याबाबत हरकत घेण्यात आली असून अशा एकुण ९ हरकती प्राप्त झाल्या आहेत. हरकती व सूचना दाखल करण्यासाठी आता केवळ सोमवार, १५ सप्टेंबर शेवटची मुदत आहे. शनिवार व रविवार दोन दिवस मनपा कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे हरकती व सूचना दाखल करण्यासाठी केवळ एक दिवस उरला आहे.

**मोहीम** | स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

## अत्याचारी नराधम इंदौरमध्ये जेरबंद!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** डाबकी रोडवर गणेश विसर्जनाच्या दिवशी अल्पवयीन मुलीवर चाकूचा धाक दाखवत केलेल्या अमानुष अत्याचारानंतर फरार झालेला सराईत गुन्हेगार तौहिवखान समीरखान बैद (२८), रा. मोहम्मद प्लॉट, डाबकी रोड, अकोला) अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, अकोला पथकाने चार दिवसांत तब्बल ५००० किलोमीटरचा थरारक पाठलाग, २५० हून अधिक सीसीटीव्ही तपासणी, १२ रेल्वे तपास आणि सततची गुप्त माहिती गोळा करून आरोपीस मध्यप्रदेशातील इंदौर येथे वेषांतर करून सापळा रचून पकडले. या धडाकेबाज कारवाईने जिल्ह्यात संतापलेल्या जनतेला दिलासा मिळाला आहे. या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.




गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तातडीने विशेष पथके तयार करून आरोपीला कोणत्याही परिस्थितीत पकडण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक शंकरराव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली डाबकी रोड पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेची चार पथके आरोपीच्या मागावर लागली. भोपाळमध्ये शोधमोहीम सुरू असताना खात्रीलायक माहिती मिळाली की आरोपी इंदौर बायपास भागात आहे. तात्काळ पथक इंदौरला रवाना झाले. स.पो.नि. गोपाल ढोले, अंमलदार शेख हसन, एजाज अहमद आणि मोहम्मद आमीर यांनी वेषांतर करून गुप्तपणे सापळा रचला आणि शिताफीने आरोपीस पकडले. तब्बल ५००० किलोमीटरचा थकवणारा प्रवास, चौकस तपास, आणि तांत्रिक विश्लेषण या सर्वांचा परिपाक म्हणजे आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

### आरोपीविरुद्ध असे आहेत दाखल गुन्हे

सिटी कोतवाली: अप.क्र. १९४/२०१६ कलम ३७९, ३४ भादंवि, डाबकी रोड: अप.क्र. १०१/२०२० कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि, सिटी कोतवाली: अप.क्र. ५२६/२०२१ कलम ३७६(२), २९४, ५०६ भादंवि सह. ४,२५, डाबकी रोड: अप.क्र. २२७/२०२२ कलम ३७९ भादंवि, रामदासपेठ: अप.क्र. ११०/२०२५ कलम ११५(२), १३७(२), ३५१(२)(३), २९६, भा.न्या.सं. सह. पोक्सो कलम ४,६,८,१०, डाबकी रोड: अप.क्र. २९९/२०२५ सद्य प्रकरण

## जि.प. अध्यक्षपद- पहिल्यांदाच 'एसटी' महिला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** ग्रामविकास विभागाने राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या आरक्षणाची यादी शुक्रवारी जाहीर केली. यामध्ये अकोला जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमाती (एसटी) महिला प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले आहे. अकोला जिल्हापरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच अध्यक्षपद एसटी प्रवर्गासाठी राखीव निघाल्याने या प्रवर्गातील राखीव मतदारसंघाकडे राजकीय पक्षाचे विशेष लक्ष लागले आहे.




ओबीसी आरक्षण प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका रखडल्या होत्या. दरम्यान या प्रकरणाचा ५ मे २०२५ रोजी निकाल लागला व न्यायालयाने निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा केला. त्यानुसार जिल्हा परिषदेची अंतिम प्रभाग रचना देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. आता अध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाले असून पुढे सात पंचायत समिती सभापती, ५२ जिल्हा परिषद गट व १०४ पंचायत समिती गणांचे आरक्षण स्थानिक पातळीवर काढण्यात येणार आहे. जानेवारी २०२० मध्ये अकोला जिल्हा परिषदेची निवडणूक पार पडली होती तर १६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपुष्टात आला होता. ओबीसी आरक्षणाचा तिढा न्यायालयात अडकल्याने तेव्हापासून झेडपीत प्रशासकराज सुरू आहे.

### आरक्षीत जागा

जिल्हा परिषदेचे ५२ गट असून त्यापैकी १२ जागा अनुसूचीत जाती एससी प्रवर्गासाठी, ४ जागा अनूसुचित जमाती एसटी प्रवर्गासाठी तर १४ जागा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. पंचायत समिती सदस्यांची संख्या दुप्पट म्हणजेच १०४ असल्याने यामध्ये एससी प्रवर्गासाठी २४, एसटी प्रवर्गासाठी ८ तर ओबीसी प्रवर्गासाठी २८ गण राखीव ठेवण्यात येणार आहेत.

# शिक्षकांना टीईटीचे बंधन,शिक्षक संघटनांचा आक्रोश!

## निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांवर अन्याय!

। प्रा. एल. डी. सरोदे।

**मुर्तिजापूर, दि. १२ :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व शिक्षकांना शिक्षकपात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आले असून, या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. वयाची ५८ वर्षे पूर्ण करून सेवेच्या अखेरच्या टप्प्यात पोहोचलेल्या शिक्षकांनाही आता टीईटी उत्तीर्ण करावी लागणार आहे. यामुळे शिक्षक संघटनांनी शासनावर जोरदार टीका करत हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे.

एक वेळेला डी.एड, बी.एड करून नोकरीत दाखल झालेल्या शिक्षकांना पुन्हा शिक्षक पात्रता परीक्षा देण्यास भाग पाडणे ही पद्धत शिक्षण व्यवस्थेवर घाला घालणारी आहे. हा निर्णय शिक्षकांसाठी मानसिक ताण निर्माण करणारा असून शिक्षणाच्या गुणवत्तेवर याचा विपरीत परिणाम होईल. असे भाकीत केले जात आहे. ''टीईटी उत्तीर्ण शिक्षकांचीच नियुक्ती केली जावी, मात्र सेवेत असलेल्या शिक्षकांवर असे बंधन घालणे चुकीचे आहे. नियुक्तीच्या वेळी घेतलेल्या परीक्षा, निवड प्रक्रिया हेच शिक्षकांच्या पात्रतेचे प्रमाणपत्र आहे. आता पुन्हा परीक्षा घेणे म्हणजे शिक्षकांचा छळ आहे.''शिक्षक संघटनांनी शासनाला निवेदन देऊन तातडीने हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. तसेच, शिक्षक संघटनांनी इशारा दिला आहे की शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार.

शिक्षक भरती प्रक्रियेत आधीच टी ई टी अनिवार्य असून उमेदवारांची नियुक्ती त्यानंतर केली जाते. एका बाजूला डी. एड.बी. एड. उत्तीर्ण तरुण शिक्षकांची बेरोजगारी वाढत आहे. तर दुसरीकडे सेवेत असणाऱ्यांना टी. ई. टी.सारख्या ८ ते १० टक्के निकाल लागणाऱ्या अतिशय कठीण पातळी असणाऱ्या पात्रता परीक्षा लादने योग्य नाही. हा प्राथ. शिक्षकांवार फार मोठा अन्याय आहे

**- सुनिल रा. पंडित**
अध्यक्ष कास्ट्राईब शिक्षक संघटना शाखा मूर्तिजापूर

विद्य. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी परीक्षा पास होणे बंधनकारक केले आहे. हा निर्णय दिला तो निर्णय शिक्षकांवर अन्यायकारक आहे. शिक्षकांनी शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी आवश्यक त्या सर्व परीक्षा पात्र केल्या आहेत.तसेच शिक्षकांचे अद्यावत अध्यापन करण्याकरिता वारंवार प्रशिक्षण होत असतात. त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक हे आपले अध्यापन कौशल्य विकसित करतात. त्यामुळे ही परीक्षा कशासाठी?

**-सुधीर मधुकरराव डांगे**
तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा मूर्तिजापूर

शिक्षकांना वेठिस धरून गोरगरिबाचे ग्रामिण भागातील शिक्षण उध्वस्त करण्याचा घाट म्हणजे टी ई टी आहे.व्यावसायिक शैक्षणिक पात्रता व निवड मंडळाची परिक्षा पास करून शिक्षक म्हणून रुजू झाले आहे त्यामुळे आता परिक्षा देणे म्हणजे . शिक्षकांना मानसिक त्रास देणे होय

**- सुरेश मडावी शिक्षक**
सानेगुरुजी शिक्षक सेवा संघ.तालुकाध्यक्ष मुर्तिजापूर.

# तळेगाव वडनेर डवला परिसरात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**तेल्हारा, दि. १२ :** तालुक्यातील तळेगाव वडनेर व डवला परीसरात सततचा पाऊस पडत असल्यामुळे सोयाबीन, कपाशी पिकावर अनेक रोग येत आहेत .

आता सोयाबीन काही दिवसात परीपक्व होणार त्याआधीच सोयाबीन अचानक पिवळे पडत आहे. पानं करपत आहेत. झाडे सुकत आहेत .त्यामुळे सोयाबीनच्या शेंगा परीपक्व होणार नाहीत .पेरलेल्या बियाण्याचा खर्च निघणार की नाही? याचीही शंका आहे .कापुस पिकाचे तेच हाल आहेत अतीपावसाने बगायती कपाशीचे पाती,बोंडे गळुन पडले आहेत .अशा परीस्थीतीमुळे ज्याला जगाचा पोशिंदा म्हणतात तो शेतकरी भिकारी होणार आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा जगला पाहीजे म्हणुन शासनाने त्वरीत शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी शेतकरी संकटकाळात करीत आहे .



दरवर्षी सोयाबीन पिकावर हा पिवळा मोजॉक रोग येतो पण कुषी विद्यापिठाचे शास्त्रज्ञ हा रोग येऊ नये म्हणुन कधी उपाय शोधणार?

**-विजय मनोहर ताथोड ,शेतकरी तळेगाव डवला**

# केळीचे भाव घसरले, शेतकऱ्यांना मोठा फटका

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अडगाव बु: दि. १२ :** तेल्हारा तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा केळी पिकाकडे वळले असताना सध्याच्या हंगामात केळीच्या बाजार भावात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे बागायतदार आर्थिक संकटात सापडले आहेत.

सणासुदीचा कालावधी असूनही केळीला समाधानकारक दर न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी जलस्रोतांतील घट झाल्याने तालुक्यात केळीची लागवड कमी झाली होती. मात्र, यंदा विहिरींमध्ये पाण्याचा मुबलक साठा असल्याने अनेक शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा केळी लागवडीकडे मोर्चा वळवला. खर्चिक असले तरी मागील महिन्यात १८०० रुपये क्विंटल प्रमाणे चांगले दर मिळाले होते. मात्र या महिन्यात मोठ्या प्रमाणावर केळीचे दर खाली कोसळले आहे. शेतकऱ्यांनी सणासुदीच्या हंगामात केळी विक्रीतून चांगले उत्पन्न मिळेल या आशेने नियोजन केले होते. मात्र, प्रत्यक्षात बाजारात केळीचे दर केवळ ४०० ते ७०० रुपये प्रति क्विंटल इतकेच राहिले आहे. यामुळे उत्पादनाचा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी हताश झाले आहेत. बागेची देखभाल, मजुरी, खते, पाणी अशा सर्व बाबींसाठी मोठा खर्च होतो. त्यावर ही भाव घसरण हे डोक्यावर संकटाचे सावट घेऊन आले आहे. अतिवृष्टीमुळे केळीची वाहतूक ठप्प झाली, परिणामी इतर राज्यांतील बाजारपेठांमध्ये माल पोहोचू शकला नाही. त्यामुळे मागणी कमी झाली का? की हेतुपुरस्सर भाव पाडण्यात आले? असा संशय अनेक बागायतदार व्यक्त करत आहेत. सध्याच्या स्थितीत केळी उत्पादकांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



माझी ४ एकर केळी लागवड केलेली आहे. मागील महिन्याच्या तुलनेत निम्मे भाव झाल्याने खूप मोठं आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाने केळीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी

**-पप्पू बागडी ,केळी उत्पादक शेतकरी अडगाव बु**

# एच.टी.बी.टी. ला मान्यता द्या:शेतकरी संघटनेची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अडगाव बु : दि. १२ :**सततच्या पावसामुळे कपाशी पिकात तणाचा प्रादुर्भाव वाढला आहे याला आळा घालण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात लागवड होणाऱ्या कापूस उत्पादकांना दिलासा देत तणाला प्रतिकारक तंत्रज्ञान (हर्बीसाईड टॉलरंट) उपलब्ध करावे अशी मागणी शेतकरी संघटना (रघुनाथ दादा पाटील) यांचे वतीने केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे .

महाराष्ट्रासह देशात पावसाच्या दिवसात वाढ नोंदविली आहे काही भागात सात ते आठ दिवसांच्या कालावधीत महिनाभराचा सरासरी पाऊस बरसतो अशा कालावधीत पिकातील तणांचे नियंत्रण शेतकऱ्यांना शक्य होत नाही. यामुळे मजूरी खर्चातही वाढ होते दुसरीकडे कपाशीला बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने वाढीव उत्पादन खर्चामुळे शेतकऱ्यांचा ताळेबंद जूळत नसल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रात सुमारे ४० ते ४२ लाख हेक्टरवर कपाशीची लागवड होते. गेल्या काही वर्षांत खर्च उत्पादन आणि उत्पन्नाचा मेळ बसत नसल्याने हे क्षेत्र ३८ लाख हेक्टरवर आले. विदर्भात १८ लाख हेक्टरवर कापसाची लागवड होत होती.त्या क्षेत्रातही आता घट झाल्याची स्थिती आहे.यामुळे कापसासारख्या नगदी पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. त्यामुळे कापूस उत्पादनातील खर्च कमी करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज आहे. त्याकरीता शेतकऱ्यांची मागणी असलेले तणाला प्रतिकारक तंत्रज्ञान उपलब्ध करावे अशी मागणी शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील, विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकार,कार्याध्यक्ष कालिदास आपेट, नानासाहेब क्रांती ब्रिगेडचे शिवाजीराव नादखीले,पंकज माळी यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



शासनाची मान्यता नसल्याने शेतकरी एचटीबिटीची अनधिकृत लागवड करतात यात त्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता राहते त्यामुळे शासनाने याला रितसर मान्यता देण्याची गरज आहे केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी या प्रकरणी पाठपुरावा करावा अशी मागणी त्यांना संघटनेच्या वतीने दिल्ली भेटीत केली.

**- लक्ष्मीकांत कौठकार, विदर्भ अध्यक्ष**
**शेतकरी संघटना (रघुनाथ दादा पाटील)**

# पिंपळखुटा येथे विविध आजारांचे थैमान ; आरोग्य यंत्रणा ठरत आहे कुचकामी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पिंपळखुटा:दि. १२ :**येथील अनेक घरांमध्ये टायफाईड, चिकनगुनिया, मलेरिया आणि अन्य आजाराने पीडित आहेत. गावाजवळच चतारी येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करावे लागत आहेत. यामध्ये गोरगरीब रुग्णाची पिळवणूक होत आहे. खाजगी रुग्णालय अव्वाच्या सव्वा दरात रुग्णाची लूट करीत असून पिंपळखुटा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सस्तीचे उपकेंद्र असताना सुद्धा गावात कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण करण्यात येत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे.

हे गाव प्राथमिक आरोग्य केंद्र सस्तीच्या कार्यक्षेत्रात येत असून चतारी येथे ग्रामीण रुग्णालय सुद्धा आहे. येथील बरेचसे रुग्ण टायफाईड, चिकनगुनिया, मलेरिया आणि अन्य आजाराने पीडित आहेत.

चतारी येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करावे लागत आहेत.

यामध्ये गोरगरीब रुग्णाची पिळवणूक होत आहे. खाजगी रुग्णालय अव्वाच्या सव्वा दरात रुग्णाची लूट करीत असून पिंपळखुटा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सस्तीचे उपकेंद्र असताना सुद्धा गावात कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण करण्यात येत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. गोरगरीब रुग्णांना जर आरोग्य विषयक सोयीसुविधा उपलब्ध न करून दिल्यास येत्या काही दिवसात आरोग्य यंत्रणेच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते रवि महानकर महेंद्र वानखडे सुरज वानखडे धर्मेंद्र वानखडे प्रशांत वानखडे गोपाळ राऊत विकी दांदळे राजू माडोकार रवींद्र देशमुखं रोहित वानखडे अस्लम शाहा यांनी दिला आहे.




# संगीता जाधव नॅशनल आयकॉन अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**बार्शीटाकळी : दि. १२ :**अकोला जि. प.आरोग्य विभागात आरोग्य क्षेत्रात कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य चळवळ उभारणारी महिला, तथा महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष संगीता जाधव यांना नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२५ पुरस्कार देऊन मलकापूर येथे सन्मान करण्यात आला.

शिक्षकदिनानिमित्त आयोजित नॅशनल आयकॉन अवार्ड २०२५साठी आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल संगीता जाधव यांना आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. एका दैनिकाने सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून शिक्षकदिन व वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी नॅशनल आयकॉन अवार्डचे आयोजन केले होते.यामध्ये पत्रकारिता, शिक्षण, साहित्य, सामाजिक, खेळ, राजकीय, सौंदर्य, डॉक्टर , वकील ,महिला, सहकार, पतसंस्था, कला , इत्यादी क्षेत्रात कर्तृत्व घडवणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले . यामध्ये ✻ अकोला जिल्ह्यातील पातुर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे स्वास्थ अभ्यंगता असलेल्या संगीता जाधव यांची अकोला जिल्ह्यात आरोग्य क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल नॅशनल आयकॉन अवार्ड प्रदान करण्यात आला असून दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी मलकापूर येथील भातृ मंडळ हॉलमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला,

## महत्त्वाचे

### महिलेवर हल्ला

**मुर्तिजापूर :**प्रजापती लेआउट परिसरात पैशांच्या वादातून एका महिलेवर लोखंडी कड्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ. योगीता गजानन सोनटक्के वय ४०, रा. प्रजापती लेआउट, जुनीवस्ती ह्या आपल्या घरी असताना आरोपी अमोल अरुणराव चेडे वय ४०, रा. नविन घरकुल, जुनीवस्ती हा तिच्या घरासमोर आला. त्याने उसने घेतलेल्या १०,००० रुपयांच्या परतफेडीची मागणी केली. फिर्यादीकडे पैसे नसल्याचे सांगताच आरोपीने शिवीगाळ केली. त्यास प्रत्युत्तर देत फिर्यादीने पैशाची व्यवस्था झाल्यावर परत देऊ असे सांगितले. तरीही आरोपीने हातातील लोखंडी कड्याने तिच्या कपाळावर डाव्या बाजूस मारहाण केली. यात फिर्यादी जखमी झाली असून तिच्या कपाळातून रक्तस्त्राव झाला.फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व वैद्यकीय प्रमाणपत्रावरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. आरोपीवर यापूर्वी देखील गुन्हा नोंद आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### शशिकांत शिंदे यांचे केले जंगी स्वागत



**मुर्तीजापुर:**राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष व आमदार शशिकांत शिंदे यांचे मूर्तीजापुर नगरीच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. अकोला जिल्ह्यात प्रथम आगमन प्रसंगी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचा राष्ट्रवादी ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष इब्राहिम गाणेवाला व राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष संदीप जळमकर यांनी सत्कार केला तसेच येणारे निवडणूक संदर्भात व कार्यकर्त्यांची विषयी चर्चा करण्यात आली यावेळी माजीमंत्री राजेंद्र शिंगणे, माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे , प्रदेश उपाध्यक्ष डॉ संतोष कोरपे,श्याम अवस्थी, प्रा. विश्वनाथ कांबले, दिलीप आसरे, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, माजी नगरसेवक इब्राहिम घाणीवाला , निजाम इंजिनियर, राम कोरडे, पिंटू वानखडे, माजी महापौर रफिक सिद्दिकी, जावेद जकरिया ,नरेंद्र देशमुख,समीर खान, इरफान अजमेरी, अलीम ,वसीम गब्बर ,अकबर, कलीम खान ,जावेद , नासिर ठेकेदार ,सागर कोरडे व इतर अनेक मुर्तीजापुरचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### सुईवाल यांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित




**तेल्हारा:** जिल्हा सहआयुक्त नगरपालिका प्रशासन यांच्या पत्रानुसार उपोषणकर्त्यांनी केलेल्या तक्रारी वर कारवाई करण्याबाबतचे आणि उपोषण स्थगित करण्यात यावा याबाबत पत्र उपोषणाच्या पाचव्या दिवशी दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी मिळाल्यानंतर आमरण उपोषणकर्ते नरेंद्र सुईवाल यांनी उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. सुईवाल यांच्या तक्रारीवर योग्य ती कारवाई केल्या जाईल अशी आमरण उपोषणकर्त्याला अपेक्षा आहे.

# घरकुलाचे स्वप्न,कर्जाचे वास्तव

## अपुरा निधी,महागाई आणि तुटपुंजे अनुदान ठरतेय अडसर



**वार्तापत्र**
**देवानंद खिरकर**
**अकोट तालुका प्रतिनिधी**

**अकोट:** घरकुल योजना म्हणजे सरकारकडून गरिबांना दिलासा देणारी योजना आहे. अकोट तालुक्यात हीच योजना अनेक गरिबांसाठी डोकेदुखी ठरत असून आर्थिक संकटाचं कारण ठरत आहे.शासनाच्या विविध आवास योजनांतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना मिळणारा निधी अपुरा असून,महागाई आणि साहित्याच्या वाढत्या किमतीमुळे शेकडो लाभार्थी आजरोजी अडचणीत आले आहेत.''

घर मंजूर झालं,पण हप्तेच थांबलेत!''अकोट तालुक्यातील गावागावांत सध्या घरकुलाचे काम सुरू आहे.काही ठिकाणी पाया पूर्ण झाला आहे.तर काही ठिकाणी अर्धवट भिंती उभ्या आहेत.मात्र निधीच्या तुटवड्यामुळे आणि वेळेवर हप्ते न मिळाल्यामुळे काम ठप्प झालं आहे.प्रत्येक हप्त्यासाठी लाभार्थ्यांना प्रशासनाकडे बिलं,फोटो,प्रमाणपत्रं,पोर्टलवरील अपडेट्स अशी किचकट प्रक्रिया पार पाडावी लागते.''घर मंजूर झालं,पण पैशाअभावी छप्पर चढू शकत नाही.मजुरांना थांबवावं लागतं,आता कर्जाशिवाय पर्यायच नाही.'' अशी व्यथा अनेक लाभार्थी मांडत आहेत

.पावसात अर्धवट घरं,चिंतेचा संसार जुनं घर पाडून नवीन घरकुलाचं स्वप्नसुरू झालं;पण काम अर्धवट राहिल्याने पावसाळ्यात अनेक कुटुंबं उघड्यावर राहत आहेत.अंगणात तात्पुरती छप्परं,प्लास्टिकचे पट्टे,शेजाऱ्यांची मदत अशा तात्पुरत्या मार्गांनी संसार चालतो.वृद्ध,लहान मुलं,महिलांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे.महागाई आणि अपुरा निधी दुहेरी संकट घरकुलासाठी मिळणारी दीड लाखांची रक्कम आजच्या महागाईच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. विटा,सळाख,रेती,गिट्टी, मजुरी,वाहतूक या सगळ्याच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्यामुळे घरकुलाचे संपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी कर्ज काढण्याशिवाय दुसरा मार्ग उरत नाही. प्रशासकीय अडथळे आणि जबाबदारीचा प्रश्न घरकुल मंजूर झाल्यानंतर निधी वेळेवर आणि योग्यप्रमाणात मिळावा. ही जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असते.मात्र अनेक लाभार्थ्यांच्या तक्रारीनुसार हप्ते मंजूर करण्यात होत असलेली टाळाटाळ,वेळकाढूपणा आणि माहिती अपूर्ण ठेवण्याच्या घटना सर्रास घडत आहेत. तालुक्याच्या ग्रामीण विकास कार्यालयामार्फत योजनेची अंमलबजावणी होत असून,वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सर्वेक्षण करून प्रगती तपासणे अपेक्षित आहे.मात्र अनेक वेळा लाभार्थ्यांना माहितीच न दिली जाणे,किंवा पुन:पुन्हा कागदपत्रं मागवली जाणे,ही मोठी समस्या बनली आहे.घरकुल हे हक्काचं घर,की कर्जाचं ओझं?प्रशासनाने योजनांचा लाभ जाहीर केला.पण प्रत्यक्षात तो लाभ लाभार्थ्यांपर्यंत अडथळ्यांमधून पोहोचतो.

कर्जबाजारी लाभार्थी हे योजनेचं अपयश दर्शवतं.योजनेचा हेतू चांगला असला तरी अंमलबजावणीत तूट जाणवते. लाभार्थ्यांचे अनुभव पाहता ही योजना 'घर देणं' कमी आणि 'फॉर्म व उंबरठे झिजवणं' अधिक वाटते.शहरात सुटसुटीत तर गावात कसरत;अनुदानात तफावत का? ,लाभार्थ्यांना प्रत्येक टप्प्याला अधिक कागदपत्रं,अधिक वेळ आणि अधिक खर्च करावा लागतो. ही परिस्थिती पाहता,शासनाच्या 'घर सर्वांसाठी' या ध्येयाला वास्तविकतेची जोड मिळते की नाही.यावर प्रश्नचिन्ह उभं राहतं.

### अपघातात एकाचा मृत्यू

**बाळापूर :**अकोला ते खामगाव राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने अनेकांना अपघातास सामोरे जावे लागत होते.. आज हिंगणा संभापूर येथील दोन युवक बाळापूरवरुन दुचाकीने घरी जात असताना अचानक समोर खड्डा दिसल्याने त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि अपघात झाला. त्यामध्ये एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना गुरूवारी सायंकाळी ७ वाजता बाळापूर शहरातील तालुका कृषी कार्यालयाजवळ घडली.अतुल अंबादास कवळकार (वय ३०) असे मृतक युवकाचे नाव असून ज्ञानेश्वर गजानन साबे हा युवक गंभीर जखमी आहे साबे यांना वैद्यकीय उपचाराकरिता शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले .

## महत्त्वाचे

### रमाई आवास योजना: २१० जणांना अनधिकृत लाभ

**वाशीम :** अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास योजना (२०२३-२४) अंतर्गत मालेगाव पंचायत समितीत मंजुरी नसलेल्या तब्बल २१० जणांना अनधिकृत लाभ देण्यात आल्याचा घोटाळा उघड झाल्यानंतर, ११ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अर्पित चौहान यांच्या दालनात जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांसह (बीडीओ) संबधितांची बैठक पार पडली. यावेळी मालेगावच्या गटविकास अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरण्यात आले. संबंधीत कर्मचाऱ्याचे कपाट फोडुन पंचनामा करा, सर्व रेकॉर्ड ताब्यात घ्या, असे आदेश दिले. बैठकीदरम्यान सीईओंनी मालेगावच्या बीडीओला एवढ्या जणांना लाभ कसा देण्यात आला, अशी विचारणा केली असता संबधित कर्मचारी गेल्या महिन्याभरापासून वैद्यकीय रजेवर असल्याचे सांगितले.

### गावठाणमधील अतिक्रमण नियमानुकूल होणार

**वाशिम :** २०११ पूर्वीपासून निवासी प्रयोजनार्थ गावठाणमध्ये अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल होणार आहे. त्यासाठी आवश्यक दस्तावेज व पुराव्यासह संबंधित ग्रामपंचायतींकडे प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन वाशिम पंचायत समिती प्रशासनाने केले आहे. वाशिम तालुक्यात १७सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. त्याअंतर्गत ग्रामीण भागातील गावठाणमधील २ अतिक्रमणधारकांची प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले आहेत.

### रोजगार सहायक निवड प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप!

**मंगरुळपीर :** तालुक्यातील पिंपळगाव (ई) ग्रामपंचायतीत रोजगार सहायक निवड प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत रवीप्रसाद राठोड यांच्यासह ९३ जणांनी तहसीलदारांना निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, १६ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामसभेत रोजगार सहायक निवडीसाठी गावात वेळेवर दवंडी किंवा जाहिरात न देता अर्ज मागविण्यात आले. शासन निर्णयाप्रमाणे निकष, अटी आणि जाहिरातीद्वारे प्रसार करणे आवश्यक असताना हे नियम पाळले गेले नाहीत.

# जनसुरक्षा कायद्या विरोधात राष्ट्रवादी आक्रमक

## जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे विधेयक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मानोरा, दि. १२ :** महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटना विरोधी आणि लोकशाहीला बाधक असुन जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे आहे.त्यामुळे हे जन विधेयक सत्ताधारी सरकारने रद्द करावे, या मागणीसाठी

रा. काँ. शरद पवार पक्षाच्यावतीने रा.का. शरद पवार पक्षाचे राज्य संघटक तथा जि. प. चे माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले यांच्या नेतृत्वात दि. १० सप्टेंबर रोजी तहसील कचेरीवर आंदोलन करून तहसीलदार डॉ. संतोष यावलीकर यांना निवेदन देण्यात आले.

तहसीदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सध्याच्या सरकारने हे जन सुविधा विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मुस्कुटबाजी हुकूमशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणले आहे. सत्ताधारी सरकार या कायद्याचा उपयोग विरोधक डाव्या संघटना आणि डाव्या संघटनाशी संबंधित लोकांना, सरकारच्या विरोधात बोलणाऱ्या सामान्य नागरिकांना तसेच पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांना अटक करून दडपशाहीचा वापर करत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशी भीती विविध संघटना व कार्यकर्तामध्ये भीती निर्माण करण्यासाठी आहे. त्यामुळे सामान्य नागरिक व कार्यकर्त्यांमध्ये या विधेयकामुळे प्रचंड असंतोष व भितीचे वातावरण पसरले आहे.

या जनसुविधा विधेयक विरोधात संपूर्ण राज्यात प्रचंड रोष व संताप जनतेतून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सदरील जनसुविधा विधेयक सत्ताधारी महायुती सरकारने रद्द करावे, याबाबत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्यावतीने सरकारचा निषेध करत आंदोलन पुकारून तहसीलदार यांना निवेदन दिले. निवेदन देतेवेळी रा.का. शरद पवार पक्षाचे प्रदेश संघटक अरविंद पाटील इंगोले, तालुकाध्यक्ष काशीराम राठोड, महंत फकीर बाबा रमेश महाराज, सुनील जामदार संचालक कु उ बाजार समिती मधुसूदन राठोड माजी प स सदस्य, काँग्रेसचे जेष्ठ पदाधिकारी रामनाथ राठोड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादित जमीन: सानुग्रह अनुदान वितरणाचा मार्ग मोकळा



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :**सरळ खरेदीने संपादीत केलेल्या जमिनीला हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान वितरणातील अडचणी येत होत्या. या अडचणी सोडविण्यासाठी बूलढाणा येथील अधीक्षक अभियंता गाडे यांनी केलेल्या पाठ पुराव्यामुळे सानूग्रह अनूदान वितरणातील अडचणी अंतिम टप्यात आल्या आहेत. त्यामुळे अनूदान वितरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मागिल सहा महिन्यांपासून विदर्भ बळीराजा प्रकल्प ग्रस्त कृती संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे गूरूजी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ सातत्याने प्रयत्नशिल होते. ११ सप्टेंबर रोजी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समिती पदाधिकारी यांनी सकाळी ११-३० वाजता पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलढाण्याचे अधिक्षक अभियंता,गाडे यांची भेट घेऊन दूपारी ४ वाजता जिगांव प्रकल्प पाटबंधारे मंडळ शेगाव चे अधिक्षक अभियंता श्रीराम हजारे यांची भेट घेतली,व सानुग्रह अनुदान वितरणातील समस्यांचा आढावा घेऊन अनेक प्रश्न मार्गी लावले. यावेळी वाशीम तथा विदर्भातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या बाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी संबंधित अधिकारी यांनी समितीस योग्य सन्मान देऊन कामे मार्गी लावली यावेळी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष तथा विभागिय कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे सर समिती पदाधिकारी शिवदास पाटील ताठे, महादेवराव निंबोकार, संजय भरदुक इ. उपस्थित होते.

## घरकुलचा हप्ता देण्याची मागणी: अन्यथा उपोषणाचा इशारा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**घरकुल बांधकामाची सी सी झाली असुन मस्टरचे २६,००० हजार रुपये एक वर्ष उलटूनही मिळालेले नाही. यासाठी पंचायत समिती कार्यालयाची पायरी झिजवत आहे. त्यामुळे न्यायाची मागणी पिडीत लाभार्थ्यांनी केली आहे. या बाबत घरकुल अभियंता अतुल राठोड यांना माहिती विचारण्यासाठी फोन केला असता त्यांचा फोन बंद होता.याकडे गटविकास अधिकारी यांनी लक्ष घालावे.**

**मानोरा, दि. १२ :** तालुक्यातील कोलार येथील रमाई योजनेअंतर्गत दोन घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले असुन सी सी होऊन देखील एका वर्षापासून बिलाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे येत्या १५ दिवसात घरकुलाचे रक्कम द्यावी, अन्यथा पंचायत समितीच्या आवारात आमरण उपोषण करणार. असे निवेदन गटविकास अधिकारी यांना घरकुल लाभार्थी महेंद्र मोतीराम डापसे व जितेंद्र मोतीराम डापसे यांनी दिले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तालुक्यातील कोलार येथील घरकुल लाभार्थी महिंद्र डापसे आणि जितेंद्र डापसे यांनी रमाई योजनेअंतर्गत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे. घरकुलाची रक्कम मिळावी म्हणून रोजगार सेवक यांच्याकडे मस्टर काढण्यासाठी आधार कार्ड खाते क्रमांकाची सत्यप्रत दिलेली आहे. तसेच शाखा अभियंता यांनी सी.सी. सुद्धा केलेली आहे.

परंतु एका वर्षाचा कालावधी पूर्ण झाला तरी अद्यापही मस्टरची रक्कम पंचायत समिती कार्यालयातून खात्यात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे येत्या पंधरा दिवसात घरकुल बांधकामाची रक्कम खात्यात जमा यावी, अन्यथा पंचायत समिती कार्यालय येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा पीडित घरकुल लाभार्थ्यांनी दिला आहे.

## व्हॉईस ऑफ मीडिया: केडर कॅम्पला उपस्थित राहण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १२ :** व्हॉईस ऑफ मीडियाच्या अंमळनेर येथे १३ व १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या केडर कॅम्पला पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया वाशीमचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी यांनी केले आहे.

जळगाव जिल्ह्यातील अंमळनेर येथे होणारा पत्रकारांचा केडर कॅम्प हा व्हॉईस ऑफ मीडियामध्ये कार्यरत असलेल्या पत्रकारांसाठी आयोजित केला आहे. या कार्यक्रमात व्हॉईस ऑफ मीडियाचे मुख्य पदाधिकारी देखिल उपस्थित राहणार आहेत.

अमळनेर येथे होणाऱ्या प्रशिक्षण शिबिरात नेतृत्त्व विकास कार्यशाळा मार्गदर्शन आणि नेटवर्किंग या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच, आधुनिक पत्रकारिता आणि संघटन कौशल्याच्या विविध अंगांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. स्थानिक ते राज्यस्तरावरील संघटन मजबूत करण्यासाठी प्रभावी योजना सांगितल्या जाणार आहेत. सोशल मिडिया, फॅक्ट चेकिंग, डिजिटल सेफ्टी, प्रभावी संवाद अनब टीम बिल्डिंग याबाबतही सखोल माहिती मिळणार आहे, तरी वाशीम जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी प्रशिक्षण शिबिराला जाण्यासाठी वेळेत नोंदणी करून आपल्या उपस्थितीची खात्री व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी यांच्याकडे करावी, असे आवाहन भागवत मापारी यांनी केले आहे. व्हॉईस ऑफ मीडिया साप्ताहिक तसेच केडर कॅम्पमध्ये पत्रकारांचे नेतृत्व आणि पत्रकारांचा विकास तसेच पत्रकारांचे अधिकार या विषयावर कार्यशाळा होत असून तज्ञ आणि विविध विषयाचे ज्ञान असणारे नेतृत्व या ठिकाणी लाभणार आहे. हा केडर कॅम्प मंगळग्रह मंदिर अमळनेर जिल्हा जळगाव या ठिकाणी होत असून दिनांक, १३ आणि १४ सप्टेंबर २०२५ होत आहे.

तरी जिल्ह्यातील व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकारी व बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने या केडर कॅम्प मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया जिल्हाध्यक्ष भागवत मापारी यांनी केले आहे.

## प्रलंबित मागण्यासांठी महसूल सेवकांचे तहसीलवर धरणे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १२ :** महसूल सेवक (कोतवाल) यांना शासकीय सेवेत चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळावा या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांच्या पुर्ततेसाठी महसूल सेवकांनी १० सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज केले. ११ सप्टेंबर रोजी एकदिवशीय धरणे आंदोलन करुन प्रलंबित मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधले. यावेळी आपल्या मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. महसूल विभागाचा कणा मानला जाणारे महसूल सेवक हे महसूल विभागातील विविध जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत असतानाही त्यांना अद्यापही शासकीय सेवेत चतुर्थ श्रेणीचा दर्जा प्राप्त झालेला नाही, यामुळे त्यांना इतर शासकीय कर्मचार्याप्रमाणे आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत. महसूल सेवकाचे दैनंदिन कामकाज जबाबदार्या, गाव पातळीवर शासकीय योजना राबविणे, माहिती संकलन, जनगणना, निवडणूक कार्य, आपत्ती व्यवस्थापन, शासकीय आदेशाची अंमलबजावणी, ई पिक पाहणी, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, अशी महत्त्वाची कामे महसूल सेवक यांच्याकडून केली जात आहेत मात्र या जबाबदार्यांना साजेसा सुविधा व चतुर्थ श्रेणीचा दर्जा अद्याप यांना मिळालेला नाही. त्यामुळे शासनाने महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून दर्जा देऊन सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी वाशीम जिल्हा महसूल संघटनेच्या वतीने निवेदनातून केली आहे.

या धरणे एकदिवशीय आंदोलनात महसूल सेवक संघटना वाशीम जिल्हा अध्यक्ष गणेश भोयर, उपाध्यक्ष मुंगशीराम ससाने, सचिव महादेव धोंगडे, किशोर धामणे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व महसूल सेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रलंबित मागण्या निकाली न काढल्यास यापुढे तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला.

## ग्रामीण भागातील तरुणांना सीएससी केंद्रांमधून स्वयंरोजगार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या राज्यभरातील लाभार्थ्यांना आता त्यांच्या गावातील जवळच्या सीएससी केंद्रामधून महामंडळाच्या योजनांचा लाभ घेता येणार आहे. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख आणि सीएससी केंद्राचे प्रमुख वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत आज मुंबई येथे झालेल्या करारामध्ये या उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला.

सीएससी केंद्रांवर पुढील सेवा उपलब्ध देण्यात येत आहे : ऑनलाइन अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, योजनेची सद्यस्थिती तपासणे.

राज्यात सध्या ७२ हजारांहून अधिक सीएससी केंद्रे कार्यरत आहेत. यामधून लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र, बँक कर्ज मंजुरी व बँकेचा हप्ता,बँक स्टेटमेंट अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी प्रत्येकी केवळ रू ७०/- शुल्क आकारले जाणार असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. देशमुख यांनी दिली.

महामंडळाचे अध्यक्ष म्हणाले की, ङ्गया उपक्रमामुळे लाभार्थ्यांना जिल्हा ठिकाणी जाण्याची गरज राहणार नाही. वेळ वाचेल, खर्च कमी होईल आणि ग्रामीण भागातील तरुणांना स्वयंरोजगार व उद्योजकतेसाठी प्रोत्साहन मिळेल. यामुळे अनधिकृत एजंटांच्या व्यवहारांनाही आळा बसेल.ङ्ख

याशिवाय भविष्यात महामंडळाचे मोबाईल ॲप व चॅटबॉट सुविधाही लाभार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत.या नवीन उपक्रमामुळे योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि किफायतशीर होणार असल्याचे मत व्यवस्थापकीय संचालकांनी व्यक्त केले.

न्याय हक्क | भाई जगदीश इंगळे यांचे प्रतिपादन

## दान केलेल्या जमिनी भूमिहिनांना वाटपाची संकल्पना विनोबा भावेची

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १२ :** दलित आदिवासी भूमिहीन बेघर ओबीसी गरीब मराठा तथा सातबारा नावावर नसलेल्या लोकांच्या न्याय हक्कांसाठी संविधनातमाक मार्गाने संघर्ष करणारी आशिया खंडातील पहिली क्रांतिकारी संघटना बिगर सातबारा शेतकरी संघटना सदर संघटनेच्या वतीने भूदान चळवळीचे प्रणेत विनोबा भावे यांची दि. ११ सप्टेंबर रोजी लहूजी नगर परिसरात बाबसाहेब गोपले भवनात वाशिम जिल्हाध्यक्ष राजु इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या जयंती उत्सवात बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदिश कुमार इंगळे म्हणाले की, विनोबा भावे हे एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक, आणि समाजसुधारक होते मालकी हक्काच्या जमिनी नसलेल्या भूमिहीन लोकांना जमिनी मिळवून देण्यासाठी विनोबा भावे स्वैछिक चळवळीची सुरुवात केली त्यामुळे त्यांना भूदान चळवळीचे प्रणेत म्हणून ओळखले जाते ते महात्मा गांधीच्या प्रेरणेने अहिंसेच्या मार्गावर चालत गेले आणि पुढें स्वतंत्रचळवळीत सक्रीय झाले असल्यामुळे महात्मा गांधी यांनी आपले आध्यात्मिक वारसदार म्हणून घोषीत केले. त्यामुळे ब्रिटिश राजविरोधी, भारतीय स्वतंत्र लढ्यातील सविनय कायदे भंग चळवळ गतिमान केली तसेच जमिनीची मालकी नसलेल्याना जमिनी मिळवून देण्यासाठी भूदान चळवळीची स्थापना केली. त्यांच्या या चळवळीमुळे सदन शेतकऱ्यांनी जमिनी दान केल्या आणि दान केलेल्या जमिनी भूमिहीनांना वाटप करण्याची संकल्पना विनोबा भावे ची होती. आजही भूदान चळवळीच्या जमिनीच्या सगोपणा बाबत यवतमाळ जिल्ह्यात भूदान यज्ञ मंडळ कार्य करित आहे . असे अनेक परिवर्तनाचे कार्य विनोबा भावे यांनी केले असल्यामुळे बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्या वतीने त्यांची जयंती साजरी करण्यात आली. आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते पिरीपा महामंत्री सरकार इंगोले आपले मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म रायगडावर झाला,महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्यातील महाड येथील चवदार ताळ्यावर सत्याग्रह केला. त्याच धर्तीवर विनोबा भावे यांचा जन्म सुद्धा ११ सप्टेंबर १९८५ रोजी रायगड जिल्ह्यात झाला आणि विदर्भातील वर्धा जिल्यातील पवनार येथे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी मृत्यू झाला. म्हणजे कोकणात जन्माला आलेल्या प्रत्येक महापुरुष्याचा विदर्भातील जनतेवर मोठा प्रभाव पडला असल्यामुळे विदर्भात परिवर्तन झाले असल्यामुळे विनोबा भावे यांची जयंती बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्या वतीने साजरी होत असल्याची प्रतिक्रिया पिरीपा महामंत्री सरकार इंगोले यांनी दिली .

यावेळी अखील भारतीय मातंग संघाचे राज्यकार्यअध्यक्ष संजय वैरागडे यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितलें की विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचे कार्य अनमोल असुन सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेवुन जमीन नसणाऱ्या लोकांसाठी सर्वोदय योजनेची पुनरावृत्ती करणे ही काळाची गरज आहे अशी भावना व्यक्त केली यावेळी महाराष्ट्र किसान सभेचे वाशिम जिल्हाप्रमुख संजय बाजड, बाराबलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष समाज भुषण पुरस्कारप्राप्त राजु धोंगडे यांनी विनोबा भावे यांना आदरांजली वाहिली.

## शांतता समितीच्या बैठकीला प्रतिसाद



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १२ :**तालुक्यातील आसोला खुर्द येथे दि. १२ सप्टेंबर रोजी हनुमान मंदिर हॉल सभागृहात शांतता समितीची सभा उत्साहात पार पडली. असोला खुर्द हे गाव सोमनाथ महाराजांचे तीर्थक्षेत्रासाठी प्रसिद्ध असल्याने या गावात मानोरा तालुक्यासह विदर्भातील मोठ्या संख्येने श्रद्धाळू तीर्थक्षेत्र पोहरादेवी नंतर दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी येत असतात.

शांतता समितीच्या बैठकीत ठाणेदार नैना पोहेकर यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून गावात शांतता ठेवण्याचे आवाहन केले. या सभेला पीएसआय अभिजीत बारे, भावके, तलाठी भालेकर, पोलीस पाटील गोविंद हेडा, तंटामुक्ती अध्यक्ष दुर्योधन जाधव, शाळा समिती अध्यक्ष दीपक शामराव राठोड, उपसरपंच बादल राठोड, भीमराव राठोड, दुलसिंग राठोड, वसंता राठोड, गजानन हांडे, नामदेव राठोड, सुभाष महाराज राठोड, कैलास महिंद्रे, पुरुषोत्तम राठोड, सोमकांत हांडे, रवी हांडे, साहेबराव हांडे, रवींद्र पवार, दुर्गादास जाधव, योगेश जाधव, लाला राठोड, गणेश राठोड, पुरुषोत्तम गिरी, किशोर भोयर, सुधाकर गावंडे, अमोल गावंडे आदीसह शेकडो नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पोलीस पाटील गोविंद हेडा यांनी केले तर आभार मनोज पवार यांनी मानले.

# समृद्ध पंचायतराज अभियानातून गावात विकासपर्व

## स्पर्धेतून मिळेल लोकचळवळीला गती: त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेला बळकटी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :** ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानातून गावागावांमध्ये विकासाची स्पर्धा वाढुन लोकचळळीला बळकटी मिळणार आहे. भारत कृषीप्रधान आहे. गाव त्याचे केंद्रबिंदुआहे. गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढयांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्वाचा आहे. त्यासाठी ग्रामविकास विभागाने या अभियानाच्या माध्यमातून राज्यात मोठी लोक चळवळ उभी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. याबाबत वाशिम येथे जि प च्या पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंदरे यांच्या पुढाकाराने नुकतेच जिल्हा स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



गावात स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा उभारण्यासाठी आता गावांना कोट्यावधीचे बक्षिस मिळणार आहे. यासाठी राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येणार आहे. याची सुरुवात दि. १७ सप्टेंबर रोजी होणार आहे. लोकसहभाग व श्रमदानातून अभियान राबविण्यासाठी २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी २४५.२० कोटी पुरस्कांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी आहे. यशस्वी १९०२ स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. यामध्ये ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यां संस्थांचा समावेश आहे. गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल. या अभियानाचा कालावधी दि. १७ सप्टेंबर ते दि. ३१ डिसेंबर २०२५ असुन एकुण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. यामध्ये पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमिकरण, रोजगार, पर्यावरण, करवसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईत, प्रत्येक ग्रामपंचायतीला दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ऑप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागणार आहे.

> ''मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची प्रशिक्षणे घेऊन तसेच ग्रामसभेच्या माध्यमातुन तयारी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व गावांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत तालुकास्तरावर निर्देश देण्यात आले आहेत. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मोडिया, यशोगाथा, चित्रफित आणि इतर साधनांचा उपयोग होईल. जिल्ह्यात या अभियानातून लोकचळवळ उभी करून जास्तीत जास्त गावांना पुरस्कार मिळुन त्यामाध्यतुन गावाचा विकास व्हावा या बाबीवर भर देण्यात येईल.''
>
> - **अर्पित चौहान**, मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम

## महत्त्वाचे

### बेपत्ता संजय नवरेचा विहिरीत आढळला मृतदेह



**मंगरुळपीर:** अकोला जिल्ह्यातील येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक,पिंजर शाखा मंगरूळपीर येथील सर्च ऑपरेशनच्या रेस्क्यु टीमला अखेर यश आले आहे त्यांनी विहिरीमधील मृत्यदेह शोधुन काढला.मंगरूळपीर शहरातील कोष्टीपुरा येथील संजय जयराम नवरे वय अंदाजे (५५) वर्ष यांनी फोन करून नातेवाईकांना सांगीतले की मी विहरीत आत्महत्या करत आहे याच सांगण्या वरुन नातेवाईक आणी गावकरी यानी जवळपासच्या विहरी शोधनं चालु केले. तेव्हा शहरालगतच्या शेतातील विहीरी जवळ मोबाईल चप्पल दिसुन आल्याने घरुन निघून गेलेली व्यक्ती याच विहरीत असल्याची दाट शक्यता आल्याने लगेचच मंगरूळपीर पोलीस ठाण्याचे एपिआय एम जे वाघमोडे,यांनी पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख दिपक सदाफळे जिव-रक्षक यांना माहीती दिली.

## लोहारा ते डोंगरगाव रस्त्यावर डांबराचे प्रमाण कमी; नवीन रस्त्यावर पडले खड्डे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कळंबी महागाव : दि. १२ :** अकोला जिल्ह्यातील व बाळापूर तालुक्यात ग्राम लोहारा ते डोंगरगाव या नवीन रस्तावर मोठ मोठे जीव घेणारे खड्डे झाले आहेत. लोहारा ते डोंगरगाव हा रस्ता बाळापूर तालुक्याकडे जाते. या रस्त्यावर संबधीत ठेकेदाराने डांबराचा वापर कमी केल्यामुळे नवीन बनविलेल्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

हा रस्ता लोहारा,डोंगरगाव,कळंबा,कसुरा, कोळासा, मार्ग असून बाळापूर येथे जाते. सध्या पावसाळ्यामुळे अनेक ठिकाणी रस्ते खराब झाले असून खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या समस्येवर उपाय म्हणून प्रशासनाकडून दुरुस्तीची कामे केली जावी अशी अपेक्षा व्यक्त होत असताना मात्र यांकडे बांधकाम विभागाने लक्ष दिले नाही. हे रस्ते आणि त्यावर पडलेले खड्डे सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवघेणे ठरत असून, यावर त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. रस्त्यावर खड्डे पडले आहेत आणि रस्त्यांची अवस्था काही ठिकाणी बिकट झाली आहे. यांकडे संबधीत अधिकाऱ्यांनी



लक्ष देऊन या रस्त्यावरील खड्डे बुजवावे असे लोहारा, डोंगरगाव, कळंबा, सोनगीरी येथील नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित ठेकेदाराने नवीन रस्ताबनवला मात्र त्यावर डांबर टाकण्यासाठी हात आखडता घेतला आहे. त्यामुळे नवीन रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास याला जबाबदार अकोला बांधकाम विभाग असणार आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग केव्हा येईल? दुर्दैवाने एखाद्याचा जीव गेल्यावर जाग येणार का? अशा प्रश्न उपस्थित करीत आहेत. .बाळापूर शहराला ग्रामीण भागातील रस्ते गाव खेड्यांना जोडणारे महत्वाचे साधन रस्ते गाव खेड्यांना जोडणारे महत्वाचे साधने असून गाव खेड्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात महत्वाची भूमिका बजावत आहेत. शेतात पिकविला जाणाऱ्या माल याच रस्त्याने शहरातील मार्केटला पाठविला जातो.कळंबा, सोनगीरी,डोंगरगाव येथील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी रोज जाणे येणे करतात. या मोठ्या खड्डूकडे कडे बांधकाम विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. या खड्ड्यामुळे रोज लहान अपघात होत आहेत का. जर रस्ते चांगले असतील तर नागरिक,विद्यार्थी, वेळेवर शिक्षण घेण्यासाठी वेळेवर पोहचतील. रस्ते. ठेकेदाराने नवीन रस्ताचे बांधकाम चांगला प्रकारे केले की नाही हे पाहण्यासाठी सुध्दा बांधकाम विभागातील वेळ नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या दर्जाचे रस्ते मिळत नसल्याचे दु:ख नागरिक व्यक्त करीत आहेत.

## लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ; नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वाशिम : दि. १२ :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत.या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील.




## महत्त्वाचे

### विवाहितेची गळफास लावून आत्महत्या

**शेगाव :** येथील व्यंकटेश नगरात एका विवाहितेने राहत्या घरात साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना १० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६.३० वाजता उघडकीस आली. याबाबत मृतक विवाहितेची आई सौ. रताबाई शिवदास डिवरे (५०) रा. अकोली जहागीर, ता. अकोट जि. अकोला बांनी शहर पोलिसात फिर्याद दिली की, मुलगी सौ. दिपाली विशाल लकार (३०) रा. ताड़ी शेगाव हिये जेठ संदीप सुपडा बेलोकर, प्रदिप सुपडा बेलोकार, बेठाणी सी. गंगा संदीप बेलोकार, सी. जया प्रदिप बेलोकार सर्व रा. व्यंकटेश नगर ताडी परिसर शेगाव यांच्या नेहमीच्या वादाला मारहाणला व शिवीगाळला कंटाळून माझी मुलगी सौ. दिपगलीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याने दिपाली हिने स्वतःचे राहते घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अशा तोडी रिपोर्ट वरून उसोक्त चौघांचा कलम १०८, ३(५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पडील तपास करीत आहेत.

### पतीवर हल्ला करणाऱ्या पतीस तीन महिने कारावास

**खामगाव :** पत्नीला दगड व चापटाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी करणाऱ्या पतीस खामगाव न्यायालयाने तीन महिने सश्रम कारावास आणि पाच हजार रुपयांचा दंड, अशी शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश मुदस्सर नदीम यांनी हा निकाल काल ११ सप्टेंबर रोजी दिला, पिंपळगाव राजा वेधील मुलवारपुरा भागातील रेखा राजेश सावरकर (२५) बांनी पती राजेश दामोदर सावरकर (३०) याच्याविरोधात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, १८ जून २०२१ रोजी भावजयीसोबत बोलत बसल्याच्या कारणावरून आरोपीने पतीच्या डोक्यावर व डोळ्यावर दगडाने प्रहार केले तसेच चापटाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी पिंपळगाव राजा पोलिसांनी कलम ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास पूर्ण केल्यानंतर दोषारोपपत्र दाखल केले. प्रकरणात अभियोग पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले, अतिरिक्त सरकारी वकील नितीन हिंगणे यांनी केलेला युक्तिवाद धरून न्यायालयाने आरोपी २ सुमनचाई दामोदर सावरकर व आरोपी क्र. ३ मनश्री विजयकांत सावरकर यांना सबळ पुरावा नसल्याने निर्दोष मुक्त केले. मात्र, आरोपी राजेश सावरकर बास दोषी ठरवून तीन महिने सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

### खंडोबा परिसरात घरफोडी

**मेहकर :** डोणगाव येथील खंडोबा परिसरात आशिष बोहरा यांच्या घरात भाड्याने राहणारे वैभव आखाडे यांच्या अपार्टमेंटमध्ये कुणीही नसल्याचे पाहून चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडले. कपाटात असलेले ३८ ग्रॅम सोने व चांदीचे दागिने आणि नगदी ४० हजार रुपये असा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास करीत पळ काढला.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव | |
|---|---|---|
| ज्वारी | १५७५ | २२५० |
| गहू | २५०० | २५७५ |
| तुर | ५१०० | ६३५० |
| हरभरा | ३४०० | ५६७५ |
| सोयाबीन | ३४०० | ४४२५ |
| उडीद | ५००० | ६३०० |
| मुंग | ४१०० | ६८०० |
| बाजरी | २०००० | २००० |

# शेगाव येथे होणाऱ्या राष्ट्रीय महाआरोग्य मेळाव्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली राष्ट्रपतींची भेट

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१२ :** संतनगरी शेगाव येथे होऊ घातलेल्या राष्ट्रीय आरोग्य महामेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासंदर्भातील निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांना केंद्रीय आयुष (स्वतंत्रप्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गुरुवारी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात स्नेहपूर्वक भेट घेऊन दिले. जिल्ह्यातील शेगाव येथे नोव्हेंबर २०२५ मध्ये राष्ट्रीय महाआरोग्य मेळावा आयोजित करण्यात येणार आहे.

या राष्ट्रीय महाआरोग्य मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हावे, अशी विनंती गुरुवारी ११ सप्टेंबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांच्यासोबत आयुर्वेद आणि आरोग्य या विषयावरही चर्चा केली. आयुष मंत्रालयातर्फे आयोजित या राष्ट्रीय पातळीवरील या महा आरोग्य मेळाव्याचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा-रिग्पा आणि होमिओपॅथी या भारतीय पारंपरिक पद्धतींची समृद्ध परंपरा, वैज्ञानिक भक्कम पाया आणि जनकल्याणकारी स्वरूप जनतेसमोर सादर करणे होय.

**राष्ट्रीय महाआरोग्य मेळावा २०२५ ची ठळक वैशिष्ट्ये:**

१.प्रतिबंधात्मक, प्रोत्साहक आणि उपचारात्मक आरोग्यातील आयुष प्रणालींचे प्रदर्शन
२.सार्वजनिक आरोग्य जागरूकता आणि निरोगी जीवनशैलीचा प्रचार
३.संशोधन व ज्ञान विनिमय यासाठी विद्वान, संशोधक, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना व्यासपीठ
४.उद्योग व उद्योजकता संधी औषधी वनस्पती उत्पादक,
५.एमएसएमइ आणि स्टार्टअप्ससाठी प्रोत्साहन
६.विशेष चर्चासत्र राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांत आयुष समन्वय, फिट इंडिया मूव्हमेंट, पर्यावरणपूरक आरोग्यसेवा, पारंपरिक औषधज्ञान संवर्धन

''बुलढाणा हा जिल्हा राष्ट्रमाता जिजाऊ यांची जन्मभूमी आणि संत गजानन महाराजांची यांची समाधीभूमी, तसेच जागतीक दर्जाचे लोणार सरोवरासारख्या अनोख्या नैसर्गिक वारशा असलेली भुमी आहे. येथे ऐतीहासीक, अध्यात्म, परंपरा आणि विज्ञान यांचा संगम साधणारे हे ठिकाण या राष्ट्रीय महाआरोग्य सोहळ्यासाठी सर्वोत्तम स्थळ आहे. राष्ट्रपतींच्या उपस्थितीने हा कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरेल,'' असा विश्वास केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला आहे. भारतीय विविधतेतील एक स्वतंत्र संस्कृती जपणारा व लढवय्या, साहसी म्हणून ओळखला जाणारा बंजारा समाज आजही आरक्षणाच्या प्रश्नावर अन्यायग्रस्त आहे. ''हैद्राबाद गॅझेट'' हा ऐतिहासिक पुरावा लागू करून महाराष्ट्रातील बंजारा समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करावे, अशी ठाम मागणी होत आहे.

## जनजागृती सप्ताह २०२५ निमित्त रॅली व चर्चासत्र संपन्न




अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१२ :** भुसावळ विभागात दक्षता जनजागृती सप्ताह २०२५ निमित्त दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विभागीय रेल्वे कार्यालय, भुसावळ येथे एक जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक व मुख्य दक्षता अधिकारी नीरज कुमार दोहरे यांनी हिरवा झेंडा दाखवून केला. रॅली विभागीय कार्यालयातून सुरू होऊन तेथूनच परत संपन्न झाली.

या रॅलीमध्ये मुख्यालयातील मुख्य दक्षता अधिकारी, अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) सुनील कुमार सुमन, अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) मुकेश कुमार मीना, विविध वरिष्ठ शाखाधिकारी, रेल्वे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून दक्षतेबाबत जनजागृती केली. विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, भुसावळ येथे दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दक्षता जनजागृतीबाबत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि मुख्य दक्षता अधिकारी नीरज कुमार दोहरे, मुख्य दक्षता अधिकारी (इंजीनिरिंग) प्रदीप पोळ, उपमुख्य दक्षता अधिकारी (ए आणि पी) चंद्रकांत कदम, उपमुख्य दक्षता अधिकारी (यातायात) श्रप्रदीप हिरडे, उपमुख्य दक्षता अधिकारी (विद्युत) सुनील बैरवा, वरिष्ठ दक्षता अधिकारी मनोज भावसार उपस्थित होते.

## शिक्षिकेची बदली: निरोप देतांना विद्यार्थ्यांनी फोडला टाहो

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लाखनवाडा दि.१२:** येथिल जि प केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापीका प्रमिला साखरे यांची नुकतीच या शाळे वरुन पिंप्री कोपर्डे येथे बदली झाली त्यांना शाळेतर्फे निरोप देतांना विध्यार्थ्यांनी एकच टाहो फोडला तेव्हा साखरे मॅडम ला सुध्दा रडू आवरले नाही तर उपस्थित सर्वांनाच अश्रू अनावर झाले, याला म्हणावे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा जिव्हाळा दि.१७ जून २०१८ रोजी प्रमिला साखरे ह्या जि.प.केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा लखनवाडा येथे शिक्षक पदावर रुजू झाल्या होत्या. त्या नंतर काही वर्षानी त्यांच्याकडे मुख्याध्यापकांचा पदभार आला असता त्यांनी शाळेत अनेक सुधारणा केल्या. वेळप्रसंगी स्वता हातात झाडू घेऊन त्या साफ-सफाई करायच्या एवढेच नव्हे तर त्या अध्ययनाचे काम सुध्दा अगदी चांगल्या पध्दतिने करायच्या म्हणूनच त्याांची बदली झाल्यामुळे विद्यार्थ्यांना रडायला आले.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी मेहकर तालुका अध्यक्षपदी संतोष भांबे -पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.१२ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे विचार, धेय्य धोरणाचा प्रचार व प्रसार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवण्यासाठी मेहकर तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी ओ.बी. सी. सेलच्या तालुकाध्यक्ष पदी लोणी गवळी येथील संतोष यादवराव भांबे- पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मेहकर तालुक्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विविध जातींच्या समाजबांधवांच्या अडीअडचणीला वाचा फोडण्यासाठी, ईतर मागासवर्गीय बांधवांची एकजुट करून राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी तर्फे त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. ना. मकरंद आबा पाटील. मा. आ. मनोज कायंदे. मा. कल्याण आखडे. प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉँग्रेस ओ.बी.सी. सेल. अँड. नाझेर काझी. प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी व जिल्हा कार्याध्यक्ष शंतनु बोंद्रे यांनी दिलेल्या अधिकाराचा वापर करून राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी ओ.बी.सी. सेलचे जिल्हाध्यक्ष सुभाष बबनराव देव्हडे यांनी संतोष यादवराव भांबे-पाटील यांची मेहकर तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी ओ.बी.सी. सेलच्या मेहकर तालुका अध्यक्षपदी निवड केली. त्यांनी या निवडीचे श्रेय जिल्हाध्यक्ष अँड. नाझेर काझी साहेब, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी नेते प्रशांत पाटील व तालुक्यातील सर्व राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी अजित पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिले आहे.

## संजीवनी संस्थेला नॅशनल आयकॉन पुरस्कार प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**चिखली दि. १२ :** हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने शेंदुर्जन सेंदुर्जन येथील संजीवनी बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक संस्थेला नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२५ हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. निवृत्ती जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेने गेली १८ वर्षे अविरतपणे सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. याशिवाय महिला प्रशिक्षण, एक गाव एक गणपती, एक पेड मा के नाम, बेटी बचाओ बेटी पढाओ, एक गाव एक लग्नातीत, युवक-युवतींना प्रशिक्षण, युवकांसाठी व्यायामशाळा आणि गाव तेथे वाचनालय यांसारखे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम संस्थेने राबवले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला आहे. दैनिक कर्णधार आणि हिंदी मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात विविध मान्यवरांच्या हस्ते डॉ. जाधव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्रकारांच्या वतीने देण्यात येणारा हा सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. या पुरस्कारामुळे संजीवनी संस्थेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून, पत्रकारांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.

## थकलेले घरकुलाचे पैसे व रखडलेल्या सिंचन विहिरीसाठी शिवसेनेचा बिडीओंना घेराव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**चिखली दि.१२ :** बऱ्याच दिवसापासून चिखली तालुक्यातील सर्व गोरगरीब जनता पंचायत समितीच्या ऑफीसमध्ये हेलपाटे मारत आहेत. अनेकांच्या घरकुलाचे बांधकाम चालु आहे. अनेकांचे घरकुल पूर्ण झालेले आहे. परंतू घरकुलाच्या अनुदानासाठी सामान्य जनता त्रस्त असून त्यांचे अनुदान तात्काळ टाकण्यात यावे तसेच रखडलेले सिंचन विहिरीचे प्रकरणे निकाली काढून तात्काळ सिंचन विहिरी मंजूर करण्यात याव्या. यासाठी चिखली शिवसेना, युवासेना, किसानसेनेच्यावतीने पंचायत समितीच्या अधिकाऱ्याला घेराव घालून जाब विचारण्यात आला. प्रकरणात तात्काळ लक्ष घालून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे आश्वासन दिल्यानंतर निवेदनाअंती आंदोलन स्थगित करण्यात आले. निवेदन देते वेळी सर्व शिवसेना, युवासेना, किसानसेना, ज्येष्ठ शिवसैनिक, आजी माजी लोकप्रतिनिधी, आजी माजी पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## शासकीय हमीभावाने दिलेल्या ज्वारीचे पैसे तातडीने द्या - सचिन शेळके



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१२ :** मोताळा तालुक्यातील शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभावाने नाफेडला मोजून दिलेल्या ज्वारीचे पैसे अद्याप खात्यात जमा न झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. रब्बी हंगाम २०२४-२५ मध्ये जून-जुलै महिन्यात शेतकऱ्यांनी ज्वारी मोजून दिली असली तरी अजूनपर्यंत त्यांचे पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

याच पार्श्वभूमीवर बुलढाणा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित सेवा पंधरवडा कार्यशाळा व जिल्हा नियुक्ती वाटप कार्यक्रमात राज्याचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री तथा सहपालकमंत्री संजय सावकारे बुलढाणा येथे आले असता, मोताळा तालुका भाजपा अध्यक्ष सचिन शेळके पाटील यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने ठामपणे मागणी मांडली. शेळके पाटील म्हणाले की, ''शेतकरी बांधवांनी आपल्या घामाने पिकवलेली ज्वारी नाफेडला मोजून दिली, मात्र अजूनपर्यंत त्यांचे पैसे मिळालेले नाहीत. यामुळे मुलांच्या शिक्षणाच्या खर्चात अडचणी येत आहेत तसेच ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तात्काळ ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्याात जमा करण्यात यावी.'' या वेळी मोताळा तालुका भाजपा व शेतकरी बांधवांच्या वतीने सहपालकमंत्री संजय सावकारे यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी जिल्हा सचिव अशोक किंन्होळकर, प्रवीण खर्चे, उमेश वाघ, तालुका सरचिटणीस सागर पाटील, उपतालुकाध्यक्ष राजु सुरपाटणे, श्रीकांत घाटे, दादाराव जुनारे, भुरा ठाकुर, किसान सेना तालुका अध्यक्ष विश्वासराव पाटील, कौतिक वाघ, निलेश मने, संजय पठारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सारोळा पीर ते रोहिणखेड शेत रस्ता पन्नास वर्षापासून प्रलंबित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मोताळा दि.१२:** तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आणि जीवन मरणाचा प्रश्न असलेल्या सारोळा पीर ते रोहिणखेड रस्त्यासाठी ग्राम स्वराज्य समिती आणि आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या वतीने मोताळा तहसीलदार आणि भूमी अभिलेख कार्यालयाला ९ सप्टेंबरला तिसरे स्मरण पत्र देत रस्ता तत्काळ सुरू करण्याची मागणी केली. सारोळा पीर ते रोहिणखेड दहा किलोमीटरचा शेत पांदन रस्ता मागील पन्नास वर्षापासून नागरिकांसाठी शेतकऱ्यांसाठी जीवघेणा ठरतोय. असंख्य शेतकऱ्यांना शेतातील मशागत करणे दुरापास्त झाले आहे. रस्त्या अभावी शेतामध्ये बैलगाडी अवजारे ने आण करणे शक्य नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेती पडीत पडलेली आहे. तर असंख्य शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी मेटाकुळीस आले आहे.

या अनुषंगाने सारोळा पीर रोहिणखेड, फर्दापूर ग्राम स्वराज्य समितीच्या वतीने जिल्हाधिकारी,उपजिल्हाधिकारी, महसूल, तहसीलदार, भूमि अभिलेख व संबंधितांना नियमानुसार निवेदन देत रस्ता अतिक्रमण मुक्त करून वहिवाटीसाठी सुरू करण्याची मागणी यापूर्वी वारंवार करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत कोणतीही ठोस कारवाई संबंधित प्रशासनाने केली नाही. त्यामुळे ९ सप्टेंबरला ग्राम स्वराज्य समिती आणि आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मोताळा तहसीलदार हेमंत पाटील आणि भूमि अभिलेख अधिकारी यांच्यासोबत मॅरेथॉन बैठक घेत चर्चा केली आहे. निवेदनाच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करून रस्ता अतिक्रमन मुक्त न झाल्यास बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशारा सुद्धा यावेळी निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला. यावेळी अॅड.सतीशचंद्र रोठे पाटील, राम व्यवहारे, संजय एंडोले, सुशांत पाटील, कमलाकर व्यवहारे, संदेश जाधव, प्रवीण जाधव, प्रशांत जाधव, शंकर लोखंडे, बळीराम जाधव, सुरेश जाधव, पुंडलीक पाटील, भीमराव जाधव, आकाश जाधव, शेषराव जाधव, चेतन व्यवहारे, अर्जून व्यवहारे, ज्ञानेश्वर व्यवहारे, दयाराम जाधव, प्रभात जाधव, वासुदेव जाधव, संजय जाधव यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी, ग्राम स्वराज्य समिती मोताळा, आझाद हिंद शेतकरी संघटना, आणि राष्ट्रीय बजरंग दलाचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# सात तासानंतर शेतकऱ्यांचे विमा कार्यालयातील आंदोलन स्थगित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.१२ :** निसर्गाच्या लहरीपणापासून संरक्षण मिळावे म्हणून शेतकऱ्यांनी सन २०२४-२५ साठी पीक विमा काढला होता. त्यानुसार नुकसानभरपाई मिळणे अपेक्षित असते; मात्र चिखली तालुक्यातील काही शेतकऱ्यांना दि०९ सप्टें.रोजी केवळ १९, ६३,९९,२००,३०० रुपये अशी रक्कम जमा करून पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांची क्रूर थट्टा केल्याचा प्रकार समोर आला.

शेतकरी संघर्ष समितीचे विनायक सरनाईक, देविदास कणखर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आक्रमक पावित्रा घेत चिखली येथील विमा कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले होते. तालुका प्रशासनाच्या मध्यस्तीनंतर पिक विमा जिल्हा प्रतिनिधी यांनी आंदोलनातील मुद्द्यानूसार लेखी अश्वासन दिले आहे. त्याचप्रमाणे तहसिलदार यांनी या मागण्यांच्या अनुषंघाने शासन नियुक्त पिक विमा तक्रार निवारण समितीची बैठक दि.१६ सप्टेंबर रोजी घेवून समितीचा अहवाल शासनास पाठविण्यात येणार असल्याचे लेखी पत्र काढण्यात आल्याने आंदोलन स्थगीत करण्यात आले.

१० दिवसात मागण्यांची पुर्तता होवून पिक विमा न मिळाल्यास व तुटपुंजी उर्वरीत विमा रक्कम शेतकऱ्यांना न मिळाल्यास तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा नव्याने स्थापन झालेल्या संघर्ष समितीने दिला आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीपोटी पीक विमा कंपन्यांकडून भरघोस मदत मिळणे अपेक्षित असताना चिखली तालुक्यात काही शेतकऱ्यांच्या खात्यावर केवळ १९, ६३, १४८, २९०, ३८६ रूपये इतकी तुटपुंजी रक्कम जमा करण्यात आली आहे. त्याामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांना अशी अत्यल्प रक्कम मिळाली आहे, त्याांच गटातील दुसऱ्या शेतकऱ्यांना तब्बल लाखभर रूपयांची भरपाई मिळाली आहे. याचा फटका अनेक शेतकऱ्यांना बसला आहे.




पीक विमा कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईतील ही तफावत आणि भेदभावामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे यंदा अतिवृष्टीमुळे शेतकरी आधीच अडचणीत आले आहेत. त्या गतवेळच्या नुकसानीपोटी अशा पद्धतीने शेतकऱ्यांना नागविण्याचा प्रकार सुरू असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. पीक विमा देताना झालेला अन्याय दूर करण्यासह त्यावेळी शेतात कृषी सहाय्यक व विमा प्रतिनिधी यांनी केलेल्या सर्व्हे फॉर्म(पंचनामा) प्रति उपलब्ध करून देण्यात याव्यात, तुटपुंजी विमा रक्कम प्राप्त शेतकऱ्यांना उर्वरीत रक्कम अदा करण्यात यावी, रक्कम मंजूर असून देखील तालुक्यातील रखडलेल्या अंदाजे २५००० शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम अदा करण्यात यावी,पिक विमा देण्यास उशीर झाल्याने शासन आदेशानुसार व्याजासहित शेतकऱ्यांना विमा अदा करण्यात यावा, शेतकऱ्यांची हेळसांड थांबावी यासाठी तिन सहाय्यक प्रतिनीधी तालुक्यासाठी वाढविण्यात यावे, पैसे न दिल्याने नुकसान कमी दाखवलेल्या सर्वे साठी नियुक्त कंपनी प्रतिनिधी व दोषींवर कारवाई करण्यात यावी, विमा मिळालेल्या व उर्वरीत शेतकऱ्यांची यादी प्रकाशीत करण्यात यावी, सन२०२३ची लॅड सिडींग तृटीतील शेतकऱ्यांची यादी प्रकाशीत करूण त्यांची पिक विमा रक्कम अदा करण्यात यावी,यासह विविध मागणीसाठी विनायक सरनाईक, देविदास कणखर, विलास वसू, विलास मुजमुले, प्रविण पाटील, अमोल पडघान, भरत जोगदंडे, यांच्यासह शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीचा ताबा घेत आक्रमक आंदोलन सुरू केले होते. जो पर्यंत मागण्यांची दखल घेतली जात नाही तोपर्यंत कार्यालय सोडणार नसल्याची भुमिका आंदोलनकर्ते व शेतकऱ्यांनी घेतली होती.आंदोलनाची तिव्रता बघता कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्याण तहसिलदार काकडे, तालुका कृषी अधिकारी सुरडकर, ठाणेदार संग्राम पाटिल, यांच्या मध्यस्तीनंतर विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी यांना बोलवून घेवून शेतकऱ्यांच्या पिक विम्या संदर्भातील विविध मुद्द्यानवर सविस्तर चर्चा तालुका कृषी अधिकारी सुरडकर, कृषी विभागाचे लंबे व जिल्हा प्रतिनिधी वाघ यांनी केल्याने व मागण्यांची पूर्तता करु व उर्वरीत पिक विमा रक्कम जमा करण्याचे अश्वासन दिल्याने त्याचप्रमाणे तालुका तक्रार निवारण समितीची दि.१६ सप्टेंबर रोजी आंदोलनातील मुद्द्यानंवर व शेतकऱ्यांच्या तक्रारीवर बैठक घेतली जाऊन याचा अहवाल जिल्हा समिती मार्फत शासनास पाठविण्यात येणार असल्याचे अश्वासन तालुका प्रशासनाने दिल्याने तब्बल ७तासानंतर आंदोलन स्थगीत करण्यात आले आहे.मागण्यांची पुर्तता न झाल्यास पुनःच्छा तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघर्ष समितीने दिला आहे. यावेळी विनायक सरनाईक, देविदास कणखर, विलास वसू, अमोल पडघान, प्रविण पाटिल, भरत जोगदंडे, बालासाहेब ठेंग, दिलीप वायाळ, रामेश्वर चके, मुरलीधर येवले, रवि टाले, विलास तायडे, रविद्र इंगळे, भागवत कदम, रविंद्र ठेंग, राजु कुटे, विजय पाटिल, बंडू शेळके, संदिप गवई, पवन शेगोकार, भाऊराव गवई, परमेश्वर शेळके, नितिन शेळके, विष्णु मोरे, आत्माराम मोरे यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### वाहन पकडले; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**खामगाव :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील मलकापूर तालुक्यातील हटिल यादगार जवळ प्रतिबंधीत गुटख्याची बाहतूक करणाऱ्या बोलेरो वाहनासह दोघांना ताब्यात घेत तब्बल १५ लाख २४ हजार ७७५ रूपयांचा मुद्देमाल जम करण्यात आला आहे. ही कारवाई काल १९ सप्टेंबर रोजी करण्यात आली. महिंद्रा बोलेरो पीकअप बाहनाने प्रतिबंधित गुटख्याची अवैधपणे वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती त्यावरून मलकापूर पोलिसांनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर हॉटेल बादगार जवळ सापळा रचत वाहनांची तपासणी सुरू केली. यावेळी पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो पीकअप वाहन क्र. एमएच ४८ एवाय ५१७३ येतांना दिसले, त्यास थांबविले असता व वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गुटखा सदृष्य माल आढळून आला. त्यानंतर सदर बाहन व त्या असलेले तुषार गजानन लोहटे (२०), वाहन चालक रा. रिसोड जि. वाशिम व विनोद सागर घुगे (२०) रा. रिसोड जि. वाशिम यांना पोलिसांनी ताब्यात घेत पोलीस स्टेशनला आणले. तपासणी केली असता सदर बाहनामध्ये ३ लाख २९ हजार रू. किंमतीचे केसरयुक्त विमल पान मसाला, १८ हजार रू. किंमतीचे व्ही सुगंधित तंबाखु, १ लाख ९५ हजार रू. किमतीचे केसरयुक्त विमल पान मसाला, ३९ हजार २०० रू. किंमतीची कीर सुगंबित नोनु, ३ लाख १५ हजार रू. किंमतीचे प्रिमियम राज निवास पान मसाला, ८० हजार ३२५ रू. किंमतीचे प्रिमियम आर एन सुगंधित तंबाखु, ५६ हजार २५० रू. किंमतीचे पान बहार पान मसाला असा माल मिळून आला. यावेळी पोलिसांनी हा माल व वाहन जप्त केले. या प्रकरणी उपरोक्त दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**खामगाव :** दुचाकी अपघातात गोंधनापूर येथील पेंटर युवक जागीच ठार झाल्याची दुदैवी घटना काल ११ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजेदरम्यान शिरसगाव देशमुख जवळ घडली. गणेश शंकरराव राखोंडे (३८) रा. गोंधनापूर असे मृतकाचे नाथ आहे. गणेश राखोंडे हे घराच्या रंगरंगोटीचे काम करीत असत. दरम्यान काल गुरुवारी संध्याकाळी ते दुचाकी क्रमांक एम. एच. २८ एसी ५३५९ ने खामगाव येथून परी जात होते. यावेळी भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात गणेश राखोंडे याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या अपघातात राखोंडे यांच्या दुचाकीचे देखिल मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात बाहन चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे. या घटनेने गोंधनापूर गावात हळहळ व्यक्त होत आहे.

### राज्यस्तरीय ऑनलाईन योगासन स्पर्धेचे आयोजन

**खामगाव :** योगा फाऊंडेशन व महाराष्ट्र योगाशिक्षक संघाच्यावतीने शेगाव महायोगात्सव २०२५ निमित्त चौथी राज्यस्तरीय ऑनलाईन योगासन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा फक्त पारंपारिक योगा प्रकारात होणार असून राज्यभरातील बोगरसिकांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. सदर स्पर्धा पुर्णपणे ऑनलाईन पध्दतीने राहणार आहे. तर ५ आसनांचे सादरीकरण (३अनिवार्य अधिक २ पर्यायी) प्रत्येक आसन किमान १५ सेकंद टिकवणे बंधनकारक राहिल. प्रवेश फी २५० रुपये असून १५ सप्टेंबर २०२५ अंतिम तारीख आहे. नॉदगी केवळ गुगल फॉर्मव्दारेच होईल. यामध्ये प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

# मेहकर उपविभागात १७ सप्टेंबर पासून सेवा पंधरवाडा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.१२ :** छत्रपती शिवाजी महाराज राजस्व स्वाभिमान अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबर पर्यंत सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे या कालावधीत महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या दैनंदिनी गरजांची निगडित विविध उपक्रमाची अंमलबजावणी होणार असल्याची माहिती मेहकर उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी दिली. या मोहिमेत मेहकर तालुक्यातील ग्राम रस्ते, हद्दीचे रस्ते, पायवाटा,गाडी मार्ग, शेत रस्त्याचे सीमांकन करून अभिलेख अद्यावत करण्यात येणार आहे. प्रत्योक रस्त्याला विशिष्ट क्रमांक कोड देण्यात येईल. यासाठी ग्रामसेवक, तलाठी,महसूल सेवक, पोलीस पाटील व नागरिकांच्या सहभागातून गाव निहाय सर्वेक्षण होईल १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ग्रामसभा मध्ये रस्त्याबाबत दावे हरकती नोंदवून घेण्यात येतील १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान प्रत्याक्ष पाहणी सुनावणी व अतिक्रम निष्कषणाची कार्यवाही केली जाणार आहे त्यानंतर सर्व नोंदी अद्यावत करून गाव दप्तरात समाविष्ट केल्या जातील ग्रामीण भागातील शेत रस्त्याची अचूक नोंद व सीमांकन यासाठी पांदण रस्ते विषयक मोहीम राबविण्यात येणार आहे या नोंदीत नसलेले पांदण रस्ते दाखल करणे शेतकऱ्यांच्या संमती पत्रावर नवीन रस्ते उपलब्ध करून देणे प्रलंबित प्रकरणे सोडविण्यासाठी रस्ता अदालत आयोजित करणे या उपक्रमाचा समावेश असेल. २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे योजनेत शासकीय जमिनीची वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजन बैठकीसाठी मेहकर उपविभागीय अधिकारी कार्यालयात तहसीलदार निलेश मडके, तहसीलदार पिंपरकर साहेब, गटविकास अधिकारी दिनकर खरात, तसेच मंडळातील ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी तालुक्यातील सर्व नागरिक व शेतकऱ्यांनी उत्फुर्स सहकार्य करावे अशी आव्हान उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी केले.

# लैंगिक अत्याचार करणाऱ्याला कठोर शिक्षा द्या : मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.१२ :** अकोला शहरातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार करणाऱ्या फरार नराधम आरोपीला तात्काळ अटक करून कठोरात कठोर फाशीची शिक्षा देऊन पीडित मुलीला व तिच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी हजारो संख्येने भोई समाज बांधव यांच्यासह विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गा वाहिनी, शेतकरी संघटना, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान, काँग्रेस, शिवसेना (उबाठा ) तसेच विविध पक्ष संघटना सहभागी होवुन उपविभागीय अधिकारी




यांच्यामार्फत सरकारला निवेदन सादर करून निषेध व्यक्त केला.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अकोला जि. अकोला येथील गुलजारपुरा भागातील हिंदू धर्मीय भोई समाजातील १३ वर्षीय बालिकेचे कुटुंबीय गणेश विसर्जना करीता घराबाहेर गेले असतांना तोहीत समीर नावाच्या नराधमाने तिचे घरात घुसूनया चिमुकलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याची हृदय द्रावक घटना घडली होती. सदर नराधमाने वासनाधीनतेत धुंद होऊन सदर मुलगी व तिच्या भावाला चाकू व मृत्यूच्या भयाची धाक दाखवत राक्षसी पिंडाचा प्रत्यय दिला. शिवाय या विरोधात कोणीही पोलिसात गेल्यास जीवाने मारून टाकण्याचे धमकी दिली. अशी ही संतापजनक व निंदनीय घटनाघडली असून सद्यस्थितीत आरोपी फरार आहे तरीसुद्धा सदर आरोपीला तात्काळ अटक करून कठोर अशी फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी मोठ्या संख्येने निवेदन दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी उपविभागीय कार्यालय मलकापूर यांच्यामार्फत महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या नावे देण्यात आले.

# खरबडी येथे ग्रामपंचायतीतर्फे आरोग्य शिबीर संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.१२ :** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, बोराखेडी व ग्रामपंचायत खरबडी यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे खरबडी येथे भव्य आरोग्य शिबीराचे दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. महिला व बालस्नेही ग्रामपंचायत म्हणून खरबडीची निवड झाल्यानंतर या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरामध्ये गावातील १८ ते ४९ वयोगटातील महिलांची हिमोग्लोबिन व तपासणी, तसेच , शुगर व रक्त तपासणी करून आरोग्य समुपदेशन देण्यात आले. लाभार्थ्यांचे आयुष्मान भारत कार्ड काढण्यात आले. याशिवाय शिबिरात विविध आरोग्यविषयक योजना यांची माहिती नागरिकांना देण्यात आली. आरोग्य शिबिरादरम्यान नागरिकांना जलजन्य व किटकजन्य आजारांचे प्रतिबंध, पोषणाहार, लसीकरण, कुटुंब नियोजन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले.




या शिबिराचे मार्गदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ.विवेक थिगळे, यांनी केले.तर शिबिराच्या यशस्वीतेसाठी आरोग्य निरीक्षक सुनिल पडघान, आरोग्य सहाय्यक संजय शिंदे, लिपीक पंकज थिगळे, गजानन वैरी, प्रज्ञा मिसाळ, मंगला वानखेडे, आरोग्य सेविका, गिता पांडे, आशा गुळे, मंगला गिरी, लता नेवगे, कोमल राठोड, आरोग्य सेवक शेख इकबाल, कैलास बिबे तसेच आशा सेविका व यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होऊन महिला व बालस्नेही ग्रामपंचायतीच्या संकल्पनेला अधिक बळकटी मिळाली.

# नवनियुक्त मुख्याध्यापिका स्वाती कात्रे यांचे स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१२ :** तालुक्यातील भोनगाव येथील शाळेत नुकत्याच नियुक्त झालेल्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती कात्रे यांचे आगमन झाल्यानंतर गावातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्याांचे स्वागत करण्यात आले.

शाळा समिती अध्यक्ष गणेश आनंदराव पवार, उपाध्यक्ष धनराज मोरखडे, ज्येष्ठ नागरिक रामदासजी शेळके, सत्यावान मोरखडे, नंदू पांडे, दत्ता घोपे, विनोद अतुरकार, अमोल मोरखडे, पत्रकार नारायण दाभाडे तसेच शिक्षक राहुल वैराळ सर यांच्या वतीने नवनियुक्त मुख्याध्यापिका सौ. स्वाती कात्रे यांचे पुष्पगुच्छ



देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी नव्या मुख्याध्यापिकांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होईल, शाळेचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

# संस्कार सायन्स कॉलेज शेंदुरजन संघाने जिंकली तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१२ :** शालेय क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या सिंदखेडराजा तालुकास्तरीय कबड्डी सामन्यांमध्ये संस्कार सायन्स कॉलेज शेंदुरजन च्या संघाने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. त्याांच्या या विजयामुळे आता त्याांची निवड थेट जिल्हास्तरीय स्पर्धे साठी झाली आहे, ही एक मोठी आणि अभिमानास्पद बाब आहे.



हा सामना १९ वर्षांखालील गटात आयोजित करण्यात आला होता. सुरुवातीपासूनच, संस्कार सायन्स कॉलेजच्या खेळाडूंनी त्याांच्या उत्कृष्ट रणनीती, चपळाई आणि संघभावनेचा परिचय दिला. त्यांनी प्रतिस्पर्धी संघांना कोणत्याही क्षणी डोके वर काढू दिले नाही. प्रत्येक रेड आणि पकडीमध्ये त्याांच्या खेळाडूंचा आत्मविश्वास स्पष्टपणे दिसून येत होता. यामुळेच, त्यांना हा विजय सहज मिळवता आला आणि त्यांनी त्यांच्या प्रतिभेची झलक दाखवून दिली. अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव या महतत्वपूर्ण विजयाबद्दल संस्कार सायन्स कॉलेजच्या सर्व विजयी खेळाडूंचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्याांचे कठोर परिश्रम आणि समर्पण याचे हे फळ आहे. या विजयामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास नक्कीच वाढला आहे आणि आता ते जिल्हा स्तरावर देखील चमकदार कामगिरी करतील अशी आशा आहे. यावेळी सामन्याच्या ठिकाणी संस्कार सायन्स कॉलेज शेंदुरजनचे प्राचार्य आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. त्यांनी खेळाडूंचे मनोबल वाढवले आणि त्यांच्या विजयानंतर त्यांचे अभिनंदन केले. तसेच, तालुका समन्वयक नागरे सरांनीही या संघाचे विशेष कौतुक केले. संस्कार सायन्स कॉलेजच्या या यशाने हे सिद्ध केले आहे की, त्यांच्या संस्थेत शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही तितकेच महतत्व दिले जाते. आता संपूर्ण तालुक्याच्या आणि महाविद्यालयाच्या आशा या युवा खेळाडूंकडून आहेत की ते जिल्हा स्तरावरही विजय मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल करतील.

# शेवटच्या घटकापर्यंत शासकीय सेवा पोहोचविण्याचा ध्यास : तहसीलदार अजित दिवटे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१२ :** प्रशासनाने सामान्य नागरिकांच्या दारापर्यंत सरकारी सेवा पोहोचवण्याच्या ध्येयाने सेवा पंधरवडा ही विशेष मोहीम सुरू केली आहे. महसूल विभागाच्या पुढाकाराने राबविण्यात येत असलेल्या या अभियानांतर्गत, छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जाणार आहेत. तहसीलदार अजित दिवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या पंधरवड्यात पांदण रस्ते, सर्वांसाठी घरे आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत.

सूक्ष्म नियोजनावर भर

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. सर्व शासकीय कामे वेळेत आणि गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून जास्तीत जास्त नागरिकांना या योजनांचा लाभ घेता येईल. या अभियानांतर्गत, माननीय जिल्हाधिकारी महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली तीन टप्प्यांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील.

पहिला टप्पा: पांदण रस्ते मोहीम (१७ ते २२ सप्टेंबर २०२५) या टप्प्यात शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत महतत्वाच्या असलेल्या पांदण रस्ते आणि शिव रस्त्यांच्या कामावर विशेष भर दिला जात आहे. यामध्ये पांदण रस्त्यांना क्रमांक देणे, त्यांचे संरक्षण करणे आणि गाव नकाशावर त्यांची नोंद घेणे यांसारखी कामे केली जातील. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेतली जातील. प्रलंबित प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी विशेष रस्ता घालत शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि शेतकऱ्यांचे कष्ट कमी होतील अशी अपेक्षा आहे.




दुसरा टप्पा: सर्वांसाठी घरे आणि पट्टेवाटप मोहीम (२३ ते २७ सप्टेंबर २०२५) हा टप्पा सर्वांसाठी घरे या महतत्वाकांक्षी योजनेवर केंद्रित आहे. या योजनेअंतर्गत, घर बांधण्यासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींचे पट्टे पात्र लाभार्थ्यांना वाटप केले जातील. त्याचबरोबर, शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील. यामुळे अनेक गरजू कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे घर मिळवण्याचे स्वप्न पूर्ण करता येईल.

तिसरा टप्पा: नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५) या टप्प्यात प्रशासन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार आहे. यात आपली लक्ष्मी मुक्त योजना, आपसी हिस्सेवाटणीची प्रकरणे निकाली काढणे आणि शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रे (सर्टिफिकेट) वाटप करणे यांसारख्या कामांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना थेट प्रशासकीय सेवेचा अनुभव घेता येणार आहे. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव केला जाईल. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनाही यात सहभागी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून प्रशासकीय कामे अधिक प्रभावीपणे पार पडतील. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सिंदखेड राजा तालुक्यातील सर्व नागरिकांनी सहभाग घेऊन विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### महिला सरपंचास मारहाण; तिघाविरूध्द गुन्हा

**खामगाव :** लोणी गुरव येथील सरपंच अंबिका दिलीप भगत (५५) यांनी काल ११ सप्टेंबर २५ रोजी ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. त्यामध्ये नमुद केले आहे की, काल ११ सप्टेंबर २५ रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास सरपंच अंबिका भगत ह्या घरी असतांना गणेश संतोष मोरे, ऋषीकेश संतोष मोरे दोघे रा.लोणी मुख व मंगेश विजय कदम रा. केळवद ता. चिखली हे त्यांच्या घरी आले. यावेळी गणेश मोरे याने आपल्या गावातील पांडेबुवा तुमच्यामुळे गावात येत नाही. त्यामुळे गावाचे काही काम होत नाही, असे म्हणुन काठीने मारहाण केली. तर ऋषीकेश मोरे याने सुध्दा चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. तर मंगेश कदम याने लोटपाट केली. तसेच तिघांनी संगनमत करून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अंबिका भगत यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोस्टेला उपरोक्त तिघांविरूध्द कलम ११८(१), ११५ (२), ३३३, ३५२. ३५१ (२) (३), ३(५) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोहेकॉ. गणेश जाधव करीत आहेत.

### इनरव्हील क्लबचा अन्नसेवेत सहभाग

**खामगाव :** स्थानिक सामान्य रुणालयात लॉयन्स संस्कृती अन्नछत्रच्या माध्यमातुन रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दररोज १ वेळ भोजन देण्याचा उपक्रम १ फेब्रुवारी २०२५ पासुन अविरत सुरू आहे. या सेवेसाठी इनरव्हील क्लबच्या वतीने दरमहा १ दिवसाच्या १ वेळच्या भोजनासाठी आर्थिक सहकार्य करण्यात येते. त्यानुसार ३ सप्टेंबर २५ रोजी क्लबच्या सदस्यांनी या सेवा कार्यात सहभागी होऊन जवळपास ३०० जणांना भोजन वाटप केले. यावेळी क्लब अध्यक्षा सौ. स्वाती अग्रवाल, सेक्रेटरी सौ. नेहा गणात्रा, प्रकल्प प्रमुख सौ. रंजीता अग्रवाल व सदस्य उपस्थित होते, अशी माहिती क्लबच्या एडीटर केला यांनी दिली.

### प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी संपर्क साधावा - केवारे

**खामगाव :** राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील टेंभुर्णा ते पारखेड फाटा बायपाससाठी सन २०१३ मध्ये शेतजमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत. परंतु प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मागणीनुसार मोबदला मिळालेला नाही. त्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे. तरी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत मात्र मागणीनुसार मोबदला मिळाला नाही अशा शेतकऱ्यांनी न्याय व हक्कासाठी लढा देण्याकरिता संपर्क साधावा, असे आवाहन संदीप किशोर केवारे (मो.नं.७६२०६३००७१) यांनी केले आहे.

### पगारिया विरूध्द दोन वर्षासाठी तडीपारीचा प्रस्ताव

**खामगाव:** स्थानिक सिव्हील लाईन भागातील रहिवासी रोहीत सुरजमल पगारिया याचेविरुध्द शहर, शिवाजी नगर व खामगाव ग्रामीण पोस्टेमध्ये विविध कलमान्वये गुन्हे दाखल आहेत. त्याअनुषंगाने उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी रोहीत पगारिया यांना कारणे दाखवा नोटीस बजावुन २६ ऑगस्ट २५ रोजीचा चौकशी अहवाल सादर करून त्यामध्ये गंभीर स्वरूपाचे आरोप केलेले आहेत. त्यानुसार शहर पोस्टे ठाणेदार यांनी रोहित पगारिया याला बुलढाणा, अकोला, जालना, वाशिम व जळगाव खांदेश या पाच जिल्ह्याच्या सिमेतुन २ वर्षाकरीता हद्दपार करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे उपविभागीय दंडाधिकारी खामगाव यांचेकडुन ९ सप्टेंबर २५ रोजी रोहित पगारिया याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

## गैरव्यवहार चौकशीच्या मागणीसाठी नागरिकांचे पंचायत समिती समोर डफडे बजाव आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१२ :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील काही ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांमध्ये गंभीर भ्रष्टाचार, अनियमितता व गैरव्यवहार उघड झाल्याचे समोर आले असून याविरोधात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे तात्काळ चौकशी करून जबाबदारांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. आपल्या म ागणीकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी पंचायत समिती समोर डफळे वाजवून आंदोलन केले.



यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात विविध योजनांतील निधीचा अपहार, कंत्राटदारांना बिनकामाचे पैसे देणे, अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे काम, तसेच ग्रामपंचायत व्यवस्थापनातील निष्काळजीपणाबाबत ठोस मुद्दे मांडण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांचा दर्जा घसरत असून गावकऱ्यांचा विश्वास डळमळीत होत आहे. निवेदनातील नमूद केले आहे कीभ्रष्टाचाराची चौकशी ग्रामसेवक राजू गावडे व ज्ञानेश्वर पवार यांच्यावर गंभीर स्वरूपाचे भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर निधी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून, या संदर्भात सविस्तर चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. पंचायत समितीतील लेखापरीक्षण () पंचायत समितीमार्फत अंमलात आलेल्या सर्व योजनांचे सखोल लेखापरीक्षण करून अनियमितता उघड करण्याचे निर्दे श देण्यात यावेत, असे निवेदनात म्हटले आहे. आर.ओ. प्लांट प्रकरण ग्रामपंचायतीकडून बसविण्यात आलेल्या आर.ओ. प्लांटच्या संदर्भात ३ वर्षांचा करार संपल्यानंतरही तो नूतनीकरण न करता नियमबाह्य पद्धतीने चालविण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. संबंधित बिलांचे देयक मंजूर होऊन निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप करण्यात आला. कचरा व्यवस्थापन प्रकल्प ग्रामपंचायत स्तरावर कचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मंजूर झालेले निधी योग्य पद्धतीने न वापरता अपव्यय झाल्याचे समोर आले आहे. या गैरव्यवहाराबाबत चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. रस्ते विकासातील अनियमितता गावातील अनेक रस्त्यांची कामे फक्त कागदोपत्री झाल्याचे आढळले असून प्रत्यक्षात रस्ते बनविले गेलेले नाहीत. मात्र, कंत्राटदारांना बिलाचे पैसे देण्यात आले आहेत. यामुळे अधिकारी व कंत्राटदारांचा संगनमताने झालेला भ्रष्टाचार उघड झाला आहे. 'हरितग्राम मुक्त गाव' योजना २०१७ ते २०२१ या कालावधीत 'हरितग्राम मुक्त गाव' योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे सांगण्यात आले. यासाठी तृतीयपक्षीय चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजना या योजनेंतर्गत अपात्रांना घरे देण्यात आल्याचे गंभीर आरोप करण्यात आले. ज्यांना प्रत्यक्षात घरे मिळायला हवी होती, त्यांना वंचित ठेवण्यात आल्याची बाब समोर आली. संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून गैरप्रकार उघड करण्याची मागणी करण्यात आली आहे. गटर व नळपाणीपुरवठा योजना २०१६ पासून गटर व नळपाणीपुरवठा योजनांमध्ये अपूर्ण व निकृष्ट काम झाले असून, संबंधित बिलांचे पैसे मंजूर झाले आहेत. जे.ई. (कनिष्ठ अभियंता) यांच्या देखरेखीत हा प्रकार घडल्याने त्यांच्याविरुद्धही कारवाईची मागणी झाली आहे. ग्रामस्थांच्या तक्रारींना प्रतिसाद नाही ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही पंचायत समितीकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने गावकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. 'हक्कभंग' प्रकरणी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली.चुकीच्या नियमांमुळे नुकसान चुकीच्या नियमांच्या हवाला देऊन ग्राम स्थांची दिशाभूल करण्यात आली. यामुळे जनतेचे हक्क हिरावले गेले असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या सर्व प्रकरणांमुळे गावात असंतोष पसरला आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी विकासकामांसाठी मंजूर होतो, मात्र तो प्रत्यक्षात जनतेच्या उपयोगासाठी न वापरता भ्रष्टाचाराच्या खाईत जातो. पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या संगनमताने झालेला हा निधी अपव्यय तातडीने थांबविणे आवश्यक आहे. या गंभीर बाबींवर तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकारी, ग्रामसेवक व कंत्राटदारांवर कारवाई केली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी आणि गावकऱ्यांचा विश्वास परत मिळविण्यासाठी शासनाने या तक्रारी गांभीर्याने घेत तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी एकमुखी मागणी होत आहे.

## महाविद्यालय, शाळा येथे सिक्युरिटी लावण्यात यावी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि. १२ :**तालुक्यातील प्रत्येक महाविद्यालय शाळा कॉलेज येथे सिक्युरिटी गार्ड ठेवण्यात यावी कारण असे की आपण बघितले असेल की वारंवार मुलींवर होत असलेले अत्याचार हे बघून त्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालय कॉलेजवर सेक्युरिटी ठेवणे हे गरजेचे असून सिक्युरिटी ही लायन्स धारक असावी आपण सर्व म हाविद्यालय शाळा कॉलेज यांना परिपत्रक आदेश काढून सर्वांनी सिक्युरिटी गार्ड आपल्या शाळा कॉलेज मध्ये विद्यार्थी यांच्या संरक्षणासाठी ठेवण्यात यावे हि आपणास विनंती.



यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, चेतन ठोंबरे , सोपान वाडेकर संतोष दुतोंडे रोशन उमाळे आशिष माने व महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकाची बदली रद्द करण्यासाठी विद्यार्थ्यांचा शाळेत न जाण्याचा निर्णय

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लाखनवाडा दि. १२:** खामगाव पंचायत समिती अंतर्गत शिरला नेमाने विद्यार्थ्यांनी येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेवर कार्यरत असलेले आर आर नेवरे (विषय) शिक्षक यांची नुकतीच बदली झाली असून ही बदली रद्द करण्यात यावी या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला आहे नेवरे सर २०१८ ला शिरला नेमाने येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेवर रुजू होऊन आज पर्यंत अध्यापनाचा काम योग्य रीतीने पार पाडले असून विद्यार्थी आणि शिक्षक वृंदा मध्ये आपुलकीची भावना त्यांच्याबद्दल व्यक्त होत आहे सरांनी विविध उपक्रम ाच्या माध्यमातून जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा शिरला नेमाने येथील शाळा आयएसओ वरून विविध योजनेच्या अंतर्गत शैक्षणिक भौगोलिक दर्जा सुधारण्याचे काम नेवरे सरांनी केले आहे त्यामुळे एक उत्कृष्ट शिक्षक शिक्षक ज्यांची तळमळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रामाणिकपणे पूर्ण प्रयत्न सदा करत असतात अशा शिक्षकांची



बदली रद्द करण्यात यावी या मागणीसाठी विद्यार्थी पालक व गावकरी गावकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार करून या या पत्राची दखल घेण्यात यावी व नेवरे सरांची बदली रद्द करून पुन्हा जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा शिरला नेमाने येथे नियुक्ती करावी अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे विद्यार्थी आणि पालकांशी संबंधित अधिकाऱ्यांनी चर्चा केली असता शिक्षण अधिकारी गायकवाड यांनी आर आर नेवरे यांना जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा शिरला नेमाने येथे प्रतिनियुक्ती देण्याचे आश्वासन दिला आहे.

## संग्रामपूर तालुक्यातील मुलांचा आट्या-पाट्या स्पर्धेत विजय

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१२ :** येथे म हाराष्ट्र राज्य आट्यापाट्या म हामंडळाच्या वतीने भरविण्यात आलेल्या राज्यस्तरीय सब-ज्युनियर आट्यापाट्या अजिंक्यपद स्पर्धे त बुलढाणा जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या विजयात संग्राम पूर तालुक्यातील खेळाडूंनी मोलाची भूमिका बजावली आहे.

संघाचे नेतृत्व कॅप्टन सोहम सावतकार यांनी तर व्हाईस कॅप्टन रणजीत ठाकरे यांनी भक्कम साथ देत केले. संघातील सोहम इंगळे, विरेन मोहे, विश्वजीत मारोडे, भावेश चांडक, रुद्र बोबडे, सोहम धुर्डे आणि सोहम ढोकणे या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांना दमदार आव्हान दिले.

या यशामध्ये प्रशिक्षकांचा वाटा विशेष महत्वाचा ठरला. डॉ. गजानन पैकट, वैभव देशमुख, देवानंद ढगे, अनिकेत टाकसाळ, मयूर ढगे आणि प्रदीप डाखोकार यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी शिस्त, जिद्द व संघभावनेच्या




जोरावर पराक्रम गाजवला.

हा द्वितीय क्रमांक केवळ संग्रामपूर तालुक्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, पालक आणि नागरिकांनी विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## विदर्भ महसूल सेवक संघटनेचे तहसील समोर धरणे आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि. १२:** विदर्भ महसूल सेवक संघटना संग्रामपूर शाखेच्या वतीने महसूल सेवक (कोतवाल) यांना शासनाकडून चतुर्थ श्रेणी दर्जा देण्यात झालेल्या विलंबाच्या निषेधार्थ आज ११ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

महसूल सेवकांच्या मागण्यांमध्ये मुख्यत्वे कोतवालांना चतुर्थ श्रेणी म ान्यता किमान ३० हजार रुपये मानधन, निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी, पदोन्नतीची संधी, प्रवास भत्ता, १० टक्के



आरक्षण, १५ हजार रुपये सेवा निवृत्ती वेतन,तसेच इतर अनेक सुविधा तातडीने लागू करण्याची मागणी आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनांनंतरही अजूनपर्यंत निर्णय न झाल्याने महसूल सेवकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. शासनाने तातडीने मागण्यांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलनाचा स्वरूप अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. यावेळी शाखा अध्यक्ष व्ही. एस. मिरगे, उपाध्यक्ष बी.ए. रावणकार सह महसूल सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेला मोताळा तालुक्यात मोठे भगदाड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि. १२ :** तालुक्यातील क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे निष्ठावंत कार्यकर्ते दत्ता पाटील शिंबरे यांनी दिनांक ११ सप्टेंबर रोजी आपल्या सहकाऱ्यांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. अनेक वर्षे संघटनेशी जोडलेले राहून कार्य केल्यानंतर त्यांनी मा.आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये दाखल होत पक्षाला मोठी ताकद मिळवून दिली आहे.



बुलढाणा येथे भारतीय जनता पार्टीच्या सेवा पंधरवडा कार्यशाळा आणि जिल्हा कार्यकारिणी नियुक्तीपत्र वाटप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला मा.ना. संजयजी सावकारे (जिल्हा पालकमंत्री व सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य), आमदार रणधीरजी सावरकर (अकोला), महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आमदार चैनसुख संचेती, विकासकन्या आमदार श्वेताताई महाले पाटील (चिखली), जिल्हाध्यक्ष व मा.आमदार विजयराज शिंदे, आमदार तोतारामजी कायंदे, जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा पक्षात जाहीर प्रवेश करण्यात आला.

या प्रवेश सोहळ्यात परडा येथील दत्ता पाटील शिंबरे, विलास पाटील, अभिजीत पाटील, मनोज मढे, रवी मेढे, राजु तायडे, अंकुश मेढे, शिवाजी पिसे तर कोथळी येथील संतोष शिवराम घाटे, शिवा लक्ष्मण कुटे, महेंद्र सोंडे, नारायण शिंदे, विशाल तायडे, गजानन वानखेडे, बाळासाहेब शिंदे, अंबादास तायडे या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी भाजपा ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम लोखटिया, उपजिल्हाध्यक्ष गजानन घोंगडे, गजानन सोळंकी, जिल्हा सचिव अशोक किन्होळकर, प्रवीण खर्चे, मोताळा तालुका अध्यक्ष सचिन शेळके पाटील, तालुका सरचिटणीस राजूभाऊ सुरपाटणे, सागर पाटील, तालुका उपाध्यक्ष श्रीकांतजी घाटे, दादाराव जुनारे, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष विश्वासराव पाटील तसेच तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रवेशामुळे मोताळा तालुक्यात भाजपची ताकद आणखी वाढली असून आगामी काळात या नव्या ऊर्जेच्या जोरावर पक्ष आणखी बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## खामगाव तहसीलदारांविरुद्ध शिवसेनेची तक्रार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१२:** केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा.ना. प्रतापराव जाधव, कामगार मंत्री तथा खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.ना. आकाश दादा फुंडकर, महसूल मंत्री, महसूल प्रधान सचिव, विभागीय आयुक्त, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे खामगावचे तहसीलदार सुनील पाटील यांच्या हिटलरशाही कारभाराविरोधात शिवसेना व शेतकऱ्यांनी तक्रार नोंदवली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून, त्यांना उडवाउडवीची उत्तरे देणे, मदत नाकारणे, शिवीगाळ व दमदाटी करणे अशा प्रकारे तहसीलदार सुनील पाटील वागतात, असा आरोप करण्यात आला आहे. मागील वर्षी पिंपरी गवळी, कोलरी, आवार, जळका तेली, नागापूर आदी गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. या शेतकऱ्यांनी वारंवार तहसील कार्यालयात निवेदने दिली, मात्र तहसीलदार



पाटील यांच्याकडून ''तुम्हाला पिकाची मदत मिळाली असल्याने जमिनीचे नुकसानभरपाई मिळणार नाही'' असे उत्तर मिळाले. असा कुठलाही शासन आदेश नसतानाही शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आली, असा आरोप करण्यात आला आहे शेतकऱ्यांना तहसीलदार पाटील यांनी थेट ''आय सी गेट आउट'' म्हणत कार्यालयातून बाहेर हाकलल्याचेही सांगण्यात आले. तसेच, ''तुम्हाला काही कळत नाही, तुम्ही बालबुद्धी आहात'' असे अपमानास्पद वक्तव्य करून, मदत मागणाऱ्यांची सातबारे उतारे तीन वर्षांसाठी ब्लॉक करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या गेल्या, असा गंभीर आरोप आहे. शिवसेनेचे सोशल मीडिया कार्यकर्ते व बुद्धिस्ट बांधव धम्म पाल गवई यांना ''तू काय कॅमेरा घेऊन पैदा झाला का?'' अशा वाईट शब्दात सुनावण्यात आले. वयोवृद्ध शेतकऱ्यांशी देखील गुन्हेगारांप्रमाणे वागणूक देण्यात येते, असे शिवसेनेने म्हटले आहे. नैसर्गिक आपत्तीग्रस्त कुटुंबाला मदत थांबली कारेगाव हिंगणा येथे पुरात वाहून गेलेल्या सहा वर्षांच्या मुलाच्या कुटुंबाला अद्याप म दत मिळालेली नाही. वारंवार फाईलमध्ये त्रुटी दाखवत ती परत केली जाते. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातून मदत बंधनकारक असूनही ती नाकारली जात आहे, अशी तक्रार करण्यात आली. शिवसेना महिला आघाडी व स्थानिक शेतकरी तहसील कार्यालयात निवेदनासाठी गेले असता तहसीलदार वेळ देत नाहीत, मात्र एजंट लोक मात्र तासनतास बसून असतात, असा आरोप आहे. तहसीलदारांच्या हिटलरशाही कारभारामुळे शेतकरी व सामान्य नागरिक त्रस्त झाल्याने शिवसेनेने ही बाब वरिष्ठ शासकीय, प्रशासकीय व राजकीय अधिकाऱ्यांकडे मांडली आहे. या तक्रारीवर शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख सुरेश भाऊ वावगे, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शहरप्रमुख चेतन भाऊ ठोंबरे, बांधकाम कामगार सेना विदर्भ प्रदेशप्रमुख सचिन भाऊ विटे, जिल्हाप्रमुख निलेश भाऊ बोरे, महिला आघाडी तालुकाप्रमुख जयश्रीताई देशमुख, तसेच शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, किसान सेना, विद्यार्थी सेना, सोशल मीडिया विभाग यांचे पदाधिकारी व शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. शिवसेनेच्या या तक्रारीनंतर आणखी काही गंभीर बाबी पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.
डॉ. रविराज पांडे (एम.डी.)
वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.
व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )
C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )
C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )
वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत
मो. 9890043911, 9372151186

# कमी पटसंख्येची परीक्षा केंद्र कायमची होणार बंद

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय | शिक्षण मंडळाने दिले निर्देश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** राज्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठीच्या केंद्रांची पुनर्रचना यंदा केली जाणार आहे. मागील परीक्षेत ज्या केंद्रांवर कॉपीचे प्रकार जास्त झाले किंवा जेथे विद्यार्थीसंख्या कमी होती, अशी केंद्रे यंदाच्या शालांत परीक्षेसाठी न निवडण्याच्या दृष्टीने विचार केला जात आहे. अशा केंद्राची तपासणीची प्रक्रिया माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यभर सुरू केली आहे.

येत्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात दहावी, बारावीच्या परीक्षा होणार आहेत. या परीक्षांसाठी परीक्षा केंद्रे देण्याच्या दृष्टीने चाचपणी परीक्षा केंद्रांची होणार पुनर्रचना सुरू केली आहे. मागील शालांत परीक्षेत ज्या केंद्रांवर गैरप्रकार झाले होते, अशी केंद्रे बंद करण्याच्या दृष्टीने विचार केला जात आहे. ज्या संस्थांमध्ये कमी विद्यार्थी असतील त्या केंद्रांचाही फेरविचार केला जाणार आहे. परीक्षा केंद्रासाठी विद्यार्थी संख्या, प्रत्येक रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि संरक्षण भिंत हे महत्त्वाचे मुद्दे यात समाविष्ट आहेत. राज्यातील दहावी



आणि बारावीच्या परीक्षांमध्ये गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य मंडळाने कडक पावले उचलली आहेत. ज्या केंद्रांवर गैरप्रकार किंवा कॉपी करताना विद्यार्थी सापडले. ती केंद्र कायमची बंद करण्यात येणार आहेत. पुनर्रचनेचा एक भाग म्हणून परीक्षा केंद्रांसाठी किमान विद्यार्थी संख्येचे निकष कठोरपणे लागू केले जाणार आहेत.

कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी राज्य मंडळाने परीक्षा केंद्र व्यवस्थेची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. या पुनर्रचनेत कॉपीची प्रकरणे घडलेली केंद्र बंद होवून कमी पटसंख्येची केंद्र बंद केली जाणार आहे. यात परीक्षा केंद्रांची संख्या कमी होवू शकतात.

> परीक्षा केंद्राच्या पुनर्रचनेसंदर्भात वरिष्ठाकडून प्राप्त सूचनाप्रमाणे विभागीय शिक्षण मंडळामार्फत वरिष्ठांच्या मार्गदर्शनात कारवाई केली जात आहे.
>
> **संगीता साळुंके,**
> **सहसचिव, वि. शि. मंडळ**

### आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना फटका

पारदर्शकतेसाठी परीक्षा केंद्रांची पुनर्रचना करण्यात येणार आहे. किमान विद्यार्थी संख्येच्या अटीमुळे ग्रामीण व दुर्गम भागातील परीक्षा केंद्र बंद होऊ शकतात. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना फटका बसू शकतो, परंतु पर्यायी केंद्र कमी अंतराचे निश्चित करावे लागेल. एखाद्या भागात विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी परीक्षा केंद्र कायम ठेवायचे असेल तर तसा प्रस्ताव विभागीय शिक्षण मंडळाच्या सक्षम समितीपुढे सादर करावा लागणार आहे. परीक्षा केंद्र सुरू ठेवण्यासाठी ठरावीक विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे. यापुढे निकषात शिथिलता मिळणार नाही.

# जिल्हापरिषदेत ९ अनुकंपाधारकांना नोकरी

## २३ जागांकरिता ६२ उमेदवारांची समुपदेशन प्रक्रिया

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** जिल्हा परिषदेत अनुकंपा भरती प्रक्रियेअंतर्गत गट ड पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना घटक पदांवर नियुक्ती देण्यासाठी समुपदेशन प्रक्रिया पार पडली. गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेतील सभागृहात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत समुपदेशनाने नऊ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली.



या प्रक्रियेसाठी एकूण ६२ अनुकंपा धारकांना बोलावण्यात आले होते. त्यांच्या करिता 23 रिक्त घटक पदे उपलब्ध करून देण्यात आली होती. उपलब्ध पदांमध्ये विस्तार अधिकारी (सांख्यिकी), वरिष्ठ सहाय्यक (लेखा), कनिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (पंचायत), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य झ ग्रामीण पाणीपुरवठा विभाग), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य झ बांधकाम विभाग), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम विभाग), पर्यवेक्षिका (महिला व बालकल्याण विभाग), विस्तार अधिकारी (कृषी विभाग), पशुधन पर्यवेक्षक (पशुधन विभाग), आरोग्य पर्यवेक्षक (आरोग्य विभाग), औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ तसेच आरोग्य सेवक (पुरुष ६ पदे व महिला ४ पदे) अशी विविध पदे समाविष्ट होती. निवड झालेल्यांमध्ये काजोल सुनील देशमुख, अर्पिता पंडागळे, स्वप्नील हिवराळे, प्रतीक निंभोरकर, फैजल अब्दुल शेख, अभिषेक पवार, यश गजभिये, अनिकेत लायवर व रुपेश सुरजुसे यांचा समावेश आहे. ही संपूर्ण समुपदेशन प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे यांनी प्रत्यक्ष समुपदेशनाची जबाबदारी पार पाडली.

या प्रक्रियेत सहाय्यक प्रशासन अधिकारी निलेश तालन, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, वरिष्ठ सहाय्यक सतीश पवार, वरिष्ठ सहाय्यक सुजित गावंडे, राहुल रायबोले, जीवन नारे, श्रीकांत मेश्राम समक्ष चांदुरे, हर्षद पावडे, शालिनी खरे, प्रमिला उंबरकर, देवानंद दुबळे आदींनी सहकार्य केले. अनुकंपा भरती ही प्रक्रिया दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना दिलासा देणारी असून, या प्रक्रियेतून निवड झालेल्या उमेदवारांना स्थैर्य व नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे.

# १२५ किलो प्लास्टिक जप्त

**अमरावती :** सिंगल युज प्लास्टिकविरोधात अमरावती महानगरपालिकेने धडक मोहीम राबवली. या कारवाईत १२५ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले असून तीन आस्थापनांवर कारवाई करून एकूण १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी वस्ती परिसरात ही मोहीम हाती घेण्यात आली. सोमवार बाजार व समोसा चौक परिसरातील किरकोळ भाजीपाला व फळफ्रूट विक्रेते तसेच आस्थापनांना सिंगल युज प्लास्टिक वापरू नये, अशा सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी दोन स्वतंत्र डस्टबिन वापरण्याबाबत जनजागृतीही करण्यात आली. या कारवाईत १२५ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आला असून, १५ हजाराचा दंड वसूल करण्यात आला.

# रेती माफियावर कारवाई

## ६० लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदुर बाजार, दि. १२ :** शिरजगाव कसबा पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई करून एकूण ६०.८० लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. कारवाईत एक ट्रक, रेतीचा साठा आणि मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. + सप्टेंबर रोजी शिरजगाव कसबा पोलिस पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, पांढऱ्या रंगाचा १६ टायरांचा टाटा सिग्ना ट्रक (एमएच ४०/डीसी२७७७) मध्यप्रदेशहून बेकायदेशीर रेती वाहतूक करत आहे. पंचासमक्ष सापळा रचून ट्रक थांबवण्यात आला आणि तपासणीअंती पुढील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्तीमध्ये टाटा सिग्ना ट्रक (अंदाजे ६० लाख), अवैधरित्या आणलेली १० ब्रास रेती (किंमत ७० हजार), मोबाईल फोन (१० हजार) मुद्देमाल दाखविण्यात आले आहे. यामध्ये ट्रक चालक फैझल खान फिरोझ खान (वय २३, रा. बाडीपुरा, करजगाव) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि कलम



१३०/१७७ मोटार वाहन कायदा अंतर्गत दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक कुमावत यांच्या मार्गदर्शनात सपोनि महेंद्र गवई, पोलीस अंमलदार राजेंद्र सोनवणे, मनोज पंडीत, अर्जुन परीहार, अजय कुंभरे, विनीत क्षीरसागर आणि सैनिक विनोद नागापुरे यांनी केली.

# सीईओंच्या अचानक भेटीने मेळघाटात तारांबळ

## अनेक कार्यालयाची केली पाहणी | दोन शिक्षकांना शोकॉज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धारणी, दि. १२ :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी गुरुवारी धारणी तालुक्यातील अतिदुर्गम अशा बैरागड, रंगबेली आणि हिरदा या गावांमध्ये सकाळी अचानक गोपनीय दौरा करून परिस्थितीची पाहणी केली. दरम्यान शाळा, आरोग्य केंद्रे व अंगणवाडींची तपासणी करण्यात आली. अचानक भेटीने स्थानिक कर्मचायांची मात्र चांगलीच तारांबळ उडाली होती.

सीईओ संजीता महापात्र यांनी बुधवारी रात्री अचलपूर येथे मुक्काम करून पहाटे सकाळी ७ वाजता दौऱ्याला सुरुवात केली. बैरागड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा आणि अंगणवाडी केंद्राची तपासणी केली. त्यानंतर रंगबेली येथील शाळेच्या बांधकामाचा दर्जा तपासला, फिरते पथकाची कार्यवाही जाणून घेतली आणि अंगणवाडीतील पोषण आहारातील खिचडीची चव घेऊन दर्जाबाबत अभिप्राय नोंदविला. यानंतर त्यांनी दिरदा येथील जिल्हा परिषद शाळा आणि



### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दम

सीईओंच्या आकस्मित भेटीदरम्यान एका शाळेतील गुणवत्तेच्या अभावामुळे दोन शिक्षिकांना शोकॉज देण्यात आली आहे. अंगणवाडी किचन शेडची दुरवस्था झाल्याने संबधित कर्मचाऱ्यांना सीईओंनी खडसाविले. अस्वच्छेमुळे बैरागडच्या ग्रामपंचायत अधिकारी यांना दम देण्यात आला.

अंगणवाडी केंद्राची तपासणी करून मुलांच्या शिक्षण व पोषण सुविधांचा आढावा घेतला. या गोपनीय दौऱ्यामुळे अतिदुर्गम भागातील सेवांची अंमलबजावणी आणि दर्जा तपासून त्या भागातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून पुढाकार घेण्यात येत आहे.

# सोळा तास रांगेत राहूनही संच मिळेना

## कामगारांना गृहपयोगी संच वाटपात गैरप्रकार झाल्याचा आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** शासनाच्या बांधकाम कामगारांसाठी असलेल्या गृहपयोगी संच वाटप योजनेत गंभीर गैरव्यवस्थापनाचा अभाव असल्याचे समोर आले आहे. या संचासाठी कामगारांना तब्बल १६ तास रांगेत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील कामगारांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील सर्व कामगारांना केवळ नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा येथे बोलावण्यात आल्यामुळे येथे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

एकच केंद्र, हजारो कामगार - या योजनेसाठी ऑनलाइन नोंदणी करताना केंद्र निवडण्याचा पर्याय उपलब्ध असूनही, प्रत्यक्षात केवळ




दाभा येथेच संच वाटप सुरू आहे, असा आरोप संतप्त कामगारांनी केला आहे. परिणामी, ८ सप्टेंबर रोजी दाभा केंद्रावर प्रचंड गर्दी झाली होती.

पूर्वीच्या ३ आणि ४ सप्टेंबरच्या संच न मिळालेल्या कामगारांसह ८ सप्टेंबरच्या नोंदणी केलेल्या कामगारांची उपस्थिती असल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली होती. या वेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तही लावण्यात आला होता.

**ठेकेदारावर संशय :** मिळालेल्या माहितीनुसार, संच वाटपाचे कंत्राट एका खासगी ठेकेदाराला देण्यात आले असून, तो राज्यातील एका मोठ्या नेत्याचा जवळचा असल्याचे समोर आले आहे. या ठेकेदाराला यापूर्वीच्या कामात तोटा झाल्याने पुन्हा त्याच व्यक्तीला कंत्राट दिल्याची चर्चा आहे. यामुळे संचाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, एकाच केंद्रावर वाटप केल्याने अतिरिक्त खर्च वाचवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही होत आहे.

### प्रशासनाकडून दुर्लक्ष

या गंभीर प्रकरणी अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सहायक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कामगार करत आहेत.

### बच्चू कडूंनी दिला आंदोलनाचा इशारा

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शासनाच्या या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्ह्यात इतर तीन वितरण केंद्रे लवकरात लवकर सुरू झाली पाहिजेत. एकाच केंद्रावर वाटप सुरू असल्याने गर्दी वाढत आहे. जर इतर केंद्रे सुरू केली नाहीत, तर आम्ही बळाचा उपयोग करून वितरण प्रक्रिया मार्गी लावू, असा इशारा त्यांनी दिला आहे. कामगार संघटनांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली असून, सरकारने तालुका स्तरावर योग्य व्यवस्था करून कामगारांना दिलासा देण्याची मागणी केली आहे.

# मिनी मंत्रालय अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतीचे नवे आरक्षण जाहीर

## नवीन आरक्षणाने जिल्ह्यातील जि.प. सर्कलचे चित्र बिघडणार | अनेक नेत्यांच्या मतदार संघाच्या आरक्षणामुळे पेचप्रसंग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** राज्य शासनाने जारी केलेल्या ताज्या अधिसूचनेनुसार अमरावती जिल्हा परिषदेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच १२ पंचायत समित्या व आदिवासी क्षेत्रातील समित्यांमध्ये सभापती पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्थानिक राजकारणाचे समीकरण मोठ्या प्रमाणात बदलणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर महिला नेतृत्व उदयास येणार आहे. चिखलदरा व धारणी या आदिवासी बहुल तालुक्यांसाठी वेगळी आरक्षण योजना निश्चित करण्यात आली आहे. यामुळे मेळघाटातील आदिवासी समाजातील महिला नेतृत्वाला ऐतिहासिक संधी उपलब्ध झाली आहे.

सर्वसाधारण भागातील १२ पंचायत समित्या अधिसूचनेनुसार, सर्वसाधारण भागातील १२ पंचायत समित्यांमध्ये सभापती पदांसाठी पुढीलप्रमाणे आरक्षण होणार आहे. अनुसूचित जाती - १, अनुसूचित जाती महिला - २, अनुसूचित जमाती-१, नागरिकांचा मागास प्रवर्ग-२, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला- २, सर्वसाधारण- २, सर्वसाधारण महिला-२ या व्यापक आरक्षणामुळे जिल्ह्यातील राजकीय नेत्यांच्या गणितांमध्ये आमूलाग्र बदल होणार आहे.स्थानिक राजकारणावर परिणाम होणार आहे. अनेक नवोदित महिला नेत्यांना संधी मिळणार असून स्थानिक पातळीवर राजकीय चुरस वाढण्याची शक्यता आहे. आदिवासी समाजातील महिला






आरक्षणामुळे मेळघाटातील नेतृत्वाची नवी पिढी पुढे येण्यास चालना मिळेल. ग्रामीण भागात महिलांच्या प्रतिनिधित्वामुळे शिक्षण, आरोग्य व महिला सक्षमीकरण यांसारख्या विषयांना गती मिळेल. आदिवासी भागात पायाभूत सुविधा, सिंचन, पोषण व रोजगार या क्षेत्रांना प्राधान्य मिळेल, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. एकंदरीत, या नव्या आरक्षण योजनेमुळे अमरावती जिल्हा परिषदेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पंचायत समित्यांचे सत्तासमीकरण पूर्णपणे बदलणार असून आगामी निवडणुका चुरशीच्या ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती पदासाठी नव्यानेच आरक्षण जाहीर झाले आहे. जाहीर झालेल्या आरक्षाणमुळे अनेक जि.प. सर्कमुळे उलटापलट झाल्याचे दिसून येत आहे. अनुसूचित जाती, जमाती, एससी, इतर मागासवींय प्रभागात बदल झाल्याने अनेकांच्या मतदार संघावर गधा निर्माण झाली आहे. गेल्या एक वर्षापासून मतदार संघाची बांधणी करणाऱ्यांना आता आजू-बाजूचे मतदार संघ शोधावे लागणार आहे. नवीन आरक्षणामुळे आजू-बाजूच्या मतदार संघावर कब्जा करण्याचा प्रयत्न केल्यास बंडखोरीचे प्रमाण वाढण्याचे शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नेत्यांना सुद्धा आता विचार करूनच पावले उचलावी लागणार आहे.

## थोडक्यात

### तडीपार आरोपीकडून चाकू जप्त

**अमरावती :** हमालपुरा परिसरातील सुर्योदय चौकात एका युवकाला ताब्यात घेत पोलिसांनी लोखंडी चाकू जप्त करून ऑर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोहेकॉ दीपक सुंदरकर यांनी याप्रकरणी फिर्याद दाखल केली. या घटनेचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाल पोलीस करीत आहे.

### सर्पदंशाने युवकाचा मृत्यू

**अमरावती :** कुलरखाली असलेला सापाने दंश केल्याने एका युवकाला जिल्हा रूग्णालयात भरती करण्यात आले परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पवन विनोद वासनिक वय ३९, रा. रसूलपूर असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेले

**मोर्शी :** एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. याप्रकरणी वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनेश नामक युवकाविरूध्द पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### महिलेसह मुलाला घराबाहेर हाकलले

**अंजनगाव सुर्जी :** काही दिवस चांगली वागणूक दिल्यानंतर घरगुती कारण व माहेरहून पैशासाठी तगादा लावून छळ केला. पैसे घेवून ये असे म्हणून पीडितेला मुलासह घराबाहेर काढले. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पतीसह सासरच्या सात जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मेहराद्दीन एजाजद्दीन, मोजीबोद्दीन, हाफिज मोईन व अन्य महिला यांच्याविरूध्द अंजनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला.

### मुलगा होत नसल्याने महिलेचा छळ

**मंगरूळ चवाळा :** मुलगा होत नसल्याने मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे आशिष जयसिंगपुरे, ज्ञानेश्वर जयसिंगपुरे, वैभव जयसिंगपुरे व एक महिला सर्व रा. तेलीपुरा, नेर, जि. यवतमाळ यांच्याविरूध्द मंगरूळ चवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### महिलेच्या पर्समधून रोख लंपास

**चांदूरबाजार :** ऑटो रिक्षातून प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्सला ब्लेडने चिरा मारून त्यातील ५० हजार रूपयांची रोकड चोरून नेल्याची घटना बेलोरा चौक परिसरात घडली. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात दोन महिलाविरूध्द चांदूरबाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूरबाजार पोलीस करीत आहे.

### गोदाम फोडून मुद्देमाल लंपास

**धारणी :** तालुक्यातील बैरागड शिवारात इंडियन कंपनीचे गोदाम फोडून त्यातील १६ हजार १६० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी डॉ. देवेंद्र देवराज कोल्हे वय ६५, रा. बैरागड यांच्या तक्रारीवरून धारणी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढिल तपास धारणी पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

## थोडक्यात

### युवकाचा मोबाईल लंपास

**अमरावती :** पोलीस भरतीकरीता व्यायाम करण्याकरीता गेलेल्या युवकाचा रियल मी कंपनीचा २५ हजार रूपये किंमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना 8 सप्टेंबर रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रेरणास्थळ येथे घडली. अजय इंदल राठोड वय २० हा पोलीस भरतीकरीता सकाळी व्यायाम करण्याकरीता गेला होता. व्यायामापूर्वी त्याने लोअर पॅन्ट काढून ठेवली होती. त्या पॅन्ट खिशातून सदर मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केला. याप्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### युवकाचे पाकिट उडविले

**अमरावती :** बसमध्ये चढताना एका इसमाचे पॉकिट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० सप्टेंबर रोजी मध्यवर्ती बस स्थानकात घडली. त्या पॉकिटात ६ हजार २०० रूपये होते. याप्रकरणी मोहन श्रावण बाविसथवे यांनी वय 58, रा. मोर्शी यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### पैशासाठी महिलेचा शारीरिक छळ

**अमरावती :** माहेरहून पैशासाठी तगादा लावून मानसिक व शारीरिक छळ करीत असल्याची तक्रार पीडित महिलेने पोलीस ठाण्यात केली. त्या आधारे पती मो. सलीम अब्दुल कलाम, देर मो. सलीम अब्दुल कलाम अन्य महिला यांच्याविरूध्द नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाल नागपुरी गेट पोलीस करीत आहे.

### गळफास लावून दोघांची आत्महत्या

**अमरावती :** एका ५५ वर्षीय इसमाने घराच्या ग्रिलला दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना व्यंकय्यापुरा, अमरावती येथे १० सप्टेंबर रोजी उघडकीस आली. गौतम विठ्ठल साखरे असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. सितम साखरे यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे तर दुसरी घटना मंगलधाम कॉलनीत उघड झाली. समृध्दी हाईट्स येथील रहिवासी तन्वी अरविंद डोंगरे या १८ वर्षीय मुलीने पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना १० सप्टेंबर रोजी उघडकीस आली. वडिलांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी मर्ग दाखल केला.

### महिलेच्या तक्रारीवरून दोघांवर गुन्हे दाखल

**अमरावती :** घरगुती कारणावरून पती दारूच्या नशेत मारहाण करून मानसिक व शारीरिक छळ करीत असल्याची तक्रार पीडित महिलेने पोलीस ठाण्यात केली. त्या आधारे गाडगेनगर पोलीस ठाण्यात पती आनंद बरडे, सासरे प्रफुल्ल बरडे दोघेही रा. नारायणनगर, अमरावती यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### कारची दुचाकीला धडक

**अमरावती :** उभ्या दुचाकीला कारने धडक दिल्याने यात दुचाकीचे अंदाजे ५ हजार रूपये किंमतीचे नुकसान झाले. चमन शहावली येथील मुख्य मार्गावर हा अपघात घडला. दुचाकी चालक कृष्णा रवींद्र देवतळे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात इंडिगो कार चालकाविरूध्द गुन्हा नोंदविला.

## अंजनगाव बारीतील समर्थ रामगीर महाराज मंदिर जीर्णावस्थेत

### समाधी मंदिराला ४७ वर्ष पूर्ण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. १२ :** परिसरातील तिर्थक्षेत्र कोंडेश्वर मंदीराचे समकालीन ऐतिहासिक ४७२ वर्षे पुरातण वास्तु श्री समर्थ रामगीर महाराज यांच्या समाधी मंदीराचे बांधकाम पूर्णत: जिर्ण झाले असून, खचण्याच्या स्थितीत आहे. यात्रा महोत्सवाचे दिवसात आता या मंदीरावर चढून रंगकामही करता येणार आहे नाही.



या देवस्थानाला आजतागायता ७ पिढ्यांची परंपरा लाभली आहे. दरवर्षी या ठिकाणी डिसेंबर महिन्यात यात्रा महोत्सवाचे आयोजन केल्या जाते. यावेळी मतदार संघातील आमदार, खासदार, समाजसेवक, प्रतिनिधी आपली आवर्जुन हजेरी लावतात व मुख्य मंदीराच्या जिर्णोद्धाराचे आश्वासन देऊन मोकळे होतात. यात आजपर्यंत ६ ते ७ लाखांपर्यतची तुरळक बांधकामेही आमदार निधीतुन झाली आहे, मात्र महत्वाचे समाधी मंदीराचा जिर्णोध्दार केंव्हा होणार हा प्रश्न अद्यापही सुटला नाही. शासणामार्फत या देवस्थानाला क दर्जा प्राप्त झाला असुन तिर्थक्षेत्र निधीपासुन ही वास्तु अद्यापही वंचित आहे. या मंदीराच्या जिर्णोध्दार कार्याची सरासरी रक्कम बधाल तर ती १ कोटीच्या घरात आहे. यासाठी नुसती लोकवर्गणी पुरेसी नसुन शासकीय तिर्थक्षेत्र निधीची यासाठी प्रमुख आवश्यकता आहे.

या देवस्थानाचे मुख्य प्रवेशव्दारासमोर पावसाळ्यात मोठा नाला वाहत असतो. यामुळे याठिकाणी पुलाची योजना असणे ही गरजेचे आहे. संबधीत ग्रामपंचायत मार्फत आतापर्यंत हे काम न झाल्याने याची दखल घेणे सुद्धा महत्वाचे ठरते. मंदीराचा जिर्णोध्दार व पुलाचे बांधकाम झाल्यास भाविक भक्तांना बिनधास्त पणे मंदीरात जाण्याची व येथे विविध सामाजिक कार्यक्रम राबविण्याची सोय होईल.



## उर्दू शाळा चपराशीपुरा कॅम्पला आदर्श शाळा पुरस्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** शिक्षक दिनानिमित्त, म.न. पा पूर्व माध्यमिक उर्दू शाळा चपराशी पुरा कॅम्पला महानगरपालिका शिक्षण जर विभागाने आयोजित केलेल्या एका भव्य पुरस्कार समारंभात आदर्श पाठशाळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा समारंभ क्षितिज पॅलेस), नवसारी रोड, अमरावती येथे पार पडला. जिथे महानगरपालिका शिक्षण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम साहेब यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी, महानगरपालिका शिक्षण विभागाने तयार केलेल्या पथकाने शाळेची, विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची शैक्षणिक कामगिरी, शिस्त, तांत्रिक सुविधा, हिरवेगार वातावरण आणि सर्जनशील उपक्रमांचे मूल्यांकन केले आणि निवड केली. समारंभात शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद अकील आणि सहाय्यक शिक्षकांचे विशेष स्वागत करण्यात आले. यावेळी महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व्यासपीठावर उपस्थित होत्या आणि त्यांनी शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले.



शिल्पा नाईक या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून देखील उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मेघना वासनकर, श्यामसुंदर देव, दत्तात्रय फिस्के , अमित डेंगरे, नंदकिशोर तिखिले, सचिन बोंद्रे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रकाश मेश्राम यांनी केले. संचालन प्रियंका हंबर्डे व प्रणाली ठाकरे यांनी केले.

## सती श्री संत शांतामाई यांचा प्रथम पुण्यस्मरण महोत्सव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. १२ :** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील दहीगाव रेचा येथे सती श्री संत शांतामाई यांचा प्रथम पुण्यस्मरण महोत्सव संपन्न झाला असुन या सोहळ्या निमित्त पंचम दिवसीय संगीतमय शिव तत्त्वज्ञान महायज्ञ दिनांक २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२५ रोजी कथा प्रवक्ते गुरुवर्य श्री श्री १०००८ धर्मभूषण स्वामी कृष्णकांतनंद पुरीजी महाराज शिंदी आश्रम यांच्या मंत्रमुग्ध सुमधुर वाणीतून करण्यात आला महाराज्यांच्या मते शांताई ही एक संत नसुन आदिमाया शक्तीचा अवतार आहे.एवढी अपार शक्ती दहिगाव रेचा येथे अवतरली होती अनेकांचा उध्दार केला आणि शेवटी आपला देह त्यागून दिला , समाधिस्त झाली



आपल्या गावा साठी आपल्या वर जिवापाड प्रेम करणाऱ्या लेकरांनी साठी नेहमीच टाहो फोडला,संताचे शरीर जरी या निसर्ग रुपी क्षेत्रातून विरहित झाले तरी त्यांचे विचार आचार आणि त्यांची शिकवण कधीच विरहित होत नाही तर उलट त्यांना रहित ठेवतात एवढी शक्ती ईश्वराने त्यांना दिलेली असते आणि आज जर या भारत देशात संत किंवा संताचे विचार नसते तर कल्पना तुम्हीच करा भारत देशाची संस्कृती राहली असती काय! नाही संपूर्ण जगातून महादेवाला च देवांधी देवा ची उपाधी आहे म्हणजे सज्जनो या मातीत देव आणि संताचा निवास आहे. तर या कार्यक्रमाला स्वामी गंगेश चैतन्य महाराज दहिगाव,साध्वी सुश्री निजात्मातीर्थ गरजधरी आश्रम, साध्वी सुश्री स्नेहकांता दीदी पुरीजी शिंदी आश्रम, साध्वी स्वयंप्रभा दीदी अकोट, ह.भ.प. रामदास महाराज गायगोले, ह.भ.प.भागवताचार्य देवेंद्र महाराज रेखाते श्री क्षेत्र श्रद्धासागर आकोट सहीत सर्व दहिगाव रेचा येथील नागरिक उपस्थित होते.

## जन सुरक्षा विधेयक विरोधात एल्गार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १२ :** महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक सरकारने मागे घ्यावे आणि दोन्ही सभागृहात पारित झालेल्या या विधेयकावर राज्यपालांनी सही करू नये या प्रमुख मागण्यासाठी जन सुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती अमरावती च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ निदर्शने करण्यात आली.





सदर आंदोलनाचे निवेदन महामहीम राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी अमरावती यांचे मार्फत पाठविण्यात आले. सदर निवेदनामध्ये आपली भूमिका समितीने स्पष्ट केली.

महाराष्ट्र विधिमंडळाने नुकतेच जनसुरक्षा विधेयक मंजूर केले आहे .या विधेयकाला विविध नागरिक संघटनांनी व राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांनी विरोध दर्शवून चिंता व्यक्त केली आहे. १० व ११ जुलै रोजी विधिमंडळात मंजूर झालेल्या या विधेयकाची सखोल समीक्षा करण्यासाठी मार्चमध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अध्यक्षतेखाली 26 सदस्यिय संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने जनतेकडून सदर विधेयकावर हरकती व सूचना मागविल्या होत्या. समितीमध्ये एकूण १२७५० हरकती व सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ९५०० पेक्षा जास्त हरकती सदर विधेयक रद्द करा. या बाजूच्या होत्या यावरून राज्यातील जनता या विधेयकाच्या विरोधात आहे हे स्पष्ट आहे. मात्र समितीकडे प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांची राज्य सरकारने कोणतीही दखल घेतली नाही.

या विधेयकातील अनेक तरतुदी संविधानिक मूल्याची अवहेलना करणाऱ्या आहेत. ज्या बाबी करिता राज्य सरकार हा कायदा करू पाहत आहे. त्या शहरातील नक्षलवाद व बेकायदेशीर कृत्ये यांची परिभाषा या विधेयकात सुस्पष्ट नाही .

सर्व प्रकारच्या दहशतवादी नक्षलवादी कृत्यांना आळा बसलाच पाहिजे. याबाबतीत कोणाचे दुमत नाही. परंतु बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक कायदा , महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा , भारतीय न्याय संहिता सारखे कायदे अस्तित्वात असताना ,त्याच प्रकारच्या आणखी एका विशेष कायद्याची आवश्यकता नाही .असे आमचे मत आहे. जनतेच्या सुरक्षेच्या नावाखाली अशा कठोर उपाय योजना लादल्यास समाजात भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. लोकशाही व्यवस्था खुल्या संवादावर, पारदर्शकतेवर आणि विश्वासावर आधारित असते त्यामुळे कोणतेही विधेयक जे नागरिकांचे अधिकार कमी करते ,त्यावर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे .

सदर निवेदनावर तुकाराम भस्मे, अशोक सोनारकर ,सुनील मेटकर, सुनील घटाळे, सुभाष पांडे,रमेश सोनुले, राजेंद्र भांबोरे , बबलू देशमुख, बबलू शेखावत, अनिल जळमकार, डॉ. हेमंत देशमुख,भास्कर ठाकरे,अरुण धर्माळे, अनंतराव गुढे, प्रवीण हरमकर, मनोज कडू, पराग गुडदे, महेश देशमुख, सतीश ढोरे, सुनील देशमुख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### घरातून वीजतार लंपास

**अमरावती** - गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील गणेडीवाल ले-आउट परिसरातील एका बांधकाम सुरू असलेल्या घरात चोरीची घटना घडली. चोरट्यांनी घरातील वीजतार चोरून नेल्या.



## रामगावात ग्रामस्थांचे ‘रस्ता रोको आंदोलन’

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. १२ :** गावातील मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून सततच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून ग्रामस्थांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

या निषेधार्थ ग्रामस्थांनी एकत्र येऊन शांततामय मार्गाने रस्ता रोको आंदोलन करून आपला रोष व्यक्त केला. आंदोलनादरम्यान गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आंदोलनातून प्रशासनाला इशारा देण्यात आला की जर तात्काळ रस्ता दुरुस्तीसाठी आवश्यक ती पावले उचलली नाहीत तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

## अनुलोम द्वारा भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा





दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. १२ :** भारतीय संविधानाचा अम्रूत महोत्सव निमित्ताने संत मदर टेरेसा न्यु इंग्लिश सॉयन्स कॉलेज अंजनसिंगी इथे अनुलोम द्वारा भारतीय संविधानाचा अम्रूत मोहत्सव आयोजित करण्यात आला

भारतीय संविधान. समता, स्वतंत्र, बंधुभाव एकात्मता या आधारे सर्वांना समान अधिकार आहे.आज भारत देशाची लोकसंख्या १४० कोटी च्या वर असुन विविध भाषा, विविध राज्ये यांनी एक संघ ठेवण्याचे काम भारतीय संविधान करित आहे. आपण सर्वांनी भारतीय संविधानाचा सन्मान करावा असे अतिथी तर्फे विचार मांडण्यात आले यावेळी विवेक विचार मंच अमरावती जिल्हा संयोजक प्रशांत मुन अनुलोम चे अमोल भारती मदर टेरेसा न्यु इंग्लिश सॉयन्स कॉलेज अंजनसिंगी चे प्राचार्य प्रविण सीरसाट, प्रमोद कुर्जेकार मनिषा पडोळे, विनोद कुरजेकार महेश नावणकर सह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधान प्रस्तावना वाचुन झाली व सांगता राष्ट्रगीतांने झाली विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचा सन्मान करण्याचा संकल्प केला

## संत नानागुरू महाराज गणपती मिरवणूक ठरली लक्षवेधी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि. १२ :** श्री संत नानागुरु महाराज मंदिरातील श्री गणेशाच्या विसर्जनाची मिरवणूक मोठ्या थाटामाट निघाली. बारा दिवस चाललेल्या गणेश उत्सवाची सांगता सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी गणेशाच्या मूर्तीच्या विसर्जनाने झाली. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करीत येथील बारा दिवसाच्या गणेश उत्सवातील सहभागी झालेल्या १० सार्वजनिक मंडळातर्फे काशी नदीच्या पात्रात श्री गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. या दिवशी सकाळपासून दिवसभर बाप्पाच्या नावाने शिरखेडनगरी दुमदुमली. महिला, पुरुषांनी मिरवणूक पाहण्यास व मानाच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. स्वराज फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने गणेशभक्तांकरिता फराळ व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी स्वराज फाऊंडेशन तर्फे देण्यात आलेली अँब्युलन्स सुद्धा सेवेत हजर होती .



श्री संत नानागुरू महाराज मंदिरातील गणरायाचे पालखीचे बाजार चौकातून सकाळी ९ वाजता ढोल, ताशा, टाळ-मृदंगाचा गजर करीत गुलाल व फुलांची उधळण करून लाडक्या बाप्पाची मिरवणूक काढण्यात आली. विसर्जननंतर दहीहांडी कार्यक्रम झाल्यानंतर दुपारी ४ वाजता महाप्रसादाला सुरुवात झाली. या महाप्रसादामध्ये ४० क्विंटल ज्वारीच्या कण्या व ८० क्विंटल कोहळ्याची भाजी, ४५ पिपे गोळे तेलाचे असा महाप्रसाद वाटप करण्यात आला. या महाप्रसादाचा ४० ते ४५ हजार भाविक भक्तांनी लाभ घेतला. आपल्या लाडक्या बाप्पाला भाविकांनी शांततेत निरोप दिला. यात्रा सुद्धा मोठ्या प्रमाणात भरवल्या गेली होती. महिला, पुरुषांनी मिरवणूक पाहण्यास व मानाच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. ठिकठिकाणी मंदिरातील बाप्पाचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले आणि भाविक भक्तीत तल्लीन होऊन गेले. विसर्जन शोभायात्रा शांततेत पार पाडण्याकरिता शिरखेड पोलिसस्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांच्यासह ३ अधिकारी, १९ अंमलदार पुरुष व महिला पोलिस कर्मचारी, १८ सैनिक आणि एस.आर. पी. एफ प्लाटून यांनी चोख बंदोबस्त ठेवून शांततेत विसर्जन पार पाडले.



## महत्वाचे




### लोनबेहळ येथे शेळीपालकांना व्यावसायिकतेचे धडे

**आर्णी :** शेळीपालनाकडे केवळ जोडधंदा म्हणून न पाहता, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून आर्थिक उन्नती साधावी, या उद्देशाने आर्णी तालुक्यातील लोनबेहळ येथे विशेष प्रशिक्षण शिबिर पार पडले. 'विकासगंगा' आणि 'रिलायन्स फाउंडेशन'सह विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने, 'शाश्वत उपजीविका विकास प्रकल्पा'अंतर्गत हे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. संदेश राठोड यांनी गोठा व्यवस्थापनावर, तर पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विकास अहुंकार आणि डॉ. तुषार गुजर यांनी लसीकरण, आजार व शासकीय योजनांची माहिती दिली. जातिवंत बोकड निवड, चारा व्यवस्थापन, विमा व अनुदान अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाला लोनबेहळसह तालुक्यातील पिंपळनेर, शेंदूरसनी, सुकळी, काठोडा आदी गावांमधील शेतकरी, महिला आणि पशुसखी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'मविम'च्या तालुका व्यवस्थापक सीमा आणि 'उमेद' अभियानाचे देशमुख हेही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव गायकी यांनी, तर आभार प्रदर्शन प्रदीप पवार यांनी केले.



### बेलोरा (रुई) येथे 'स्व. सुमित गुघाणे वृद्धाश्रमा'चे उद्घाटन

**यवतमाळ :** निराधार वृद्धांना उर्वरित आयुष्य सुखाने आणि सन्मानाने जगता यावे, या उदात्त हेतूने 'आसाऱ्या फाउंडेशन'ने बेलोरा (रुई) येथे 'स्व. सुमित गुघाणे वृद्धाश्रमा'ची उभारणी केली आहे. मुख्य वनसंरक्षक किशोर मानकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच या वृद्धाश्रमाचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. या वृद्धाश्रमासाठी आपली एक एकर बहुमूल्य जमीन दान करणारे सुधाकर गुघाणे यांचा यावेळी सपत्नीक सत्कार करण्यात आला. 'वृद्धाश्रम ही काळाची गरज बनली आहे,' असे मत किशोर मानकर यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले. उपवनसंरक्षक धनंजय वायभासे आणि तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांनीही फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक रमेश लोहकरे, डॉ. आशिष तावडे, प्रकाश शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते. वृद्धाश्रम व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. सुशील वानखडे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. उत्कर्ष मोहोड यांनी फाउंडेशनच्या कार्याचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे संचालन मृणालिनी दहिकर यांनी, तर आभार डॉ. किशोर बनसोड यांनी मानले.




### प्रमोद कुदळे यांच्यावर किसान सेनेची जबाबदारी

**आर्णी :** शेतकरी आंदोलनातील अनुभव आणि संघटन कौशल्य लक्षात घेत, प्रमोद कुदळे यांची शिवसेनाप्रणित किसान सेनेच्या पश्चिम विदर्भ समन्वयकपदी निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने झालेल्या या निवडीचे पत्र, पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते एका कार्यक्रमात कुदळे यांना प्रदान करण्यात आले. काही काळापूर्वी प्रहार जनशक्ती पक्षातून शिवसेनेत दाखल झालेल्या प्रमोद कुदळे यांच्यावर पक्षाने ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी त्यांच्या शेतकरी आंदोलनातील सहभागाची दखल घेत, ही निवड केली. माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. आपल्या निवडीचे श्रेय कुदळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय राठोड, पराग पिंगळे, श्रीधर मोहोड, हरिहर लिंगनवार यांच्यासह सर्व वरिष्ठ नेत्यांना दिले. संघटना बांधणीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन पालकमंत्री राठोड यांनी यावेळी कुदळे यांना दिले. या कार्यक्रमाला पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा आज

**यवतमाळ :** येथील महावीर इंटरनॅशनलच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शनिवारी (दि. १३) आयोजित करण्यात आला आहे. शहरातील ३० शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेचा पारितोषिक सोहळा लोकनायक बापूजी महिला विद्यालयात संपन्न होणार आहे. दुपारी ३ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पोलिस अधीक्षक कुमार चिंता भूषवतील, तर प्रमुख अतिथी म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा आणि विनादेवी दर्डा हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संध्या सुब्रमण्यन उपस्थित राहणार आहेत. 'शिक्षण व कला क्षेत्रातील प्रतिभेला चालना देण्यासाठी हा उपक्रम असून, यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढेल,' असे संस्थेचे अध्यक्ष प्रवीण निमोदिया यांनी सांगितले. संस्थेचे सचिव शोभा दोडेवार, प्रकल्प प्रमुख श्याम भन्साली, उपाध्यक्ष राजेश भूत, कोषाध्यक्ष डॉ. शेखर बंड यांनी नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# 'झेडपी'चे अध्यक्षपद 'सर्वसाधारण'

## सोडतीमुळे इच्छुकांच्या आशा पल्लवित; सर्वच पक्षात राजकीय हालचालींना आला वेग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१२ : गेल्या चार वर्षांपासून प्रशासकीय राजवटीखाली असलेल्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत अखेर जाहीर झाली असून, हे पद 'सर्वसाधारण'प्रवर्गासाठी खुले झाले आहे. या घोषणेमुळे 'मिनी मंत्रालया'चे प्रमुख बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या जिल्ह्यातील अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली असून, जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे.**



'सर्वसाधारण'प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाल्याने अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यासाठी कोणत्याही विशिष्ट आरक्षणाची अट राहिलेली नाही. त्यामुळे, जिल्ह्यातील अनेक प्रस्थापित नेत्यांसह नवीन चेहऱ्यांनीही अध्यक्षपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. बदललेली गट आणि गणांची रचना लक्षात घेऊन इच्छुकांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेवर वर्चस्व असलेल्या काँग्रेसमध्ये अध्यक्षपदासाठी सक्षम उमेदवार कोण असेल, यावर खल सुरू झाला आहे. दुसरीकडे, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने निवडणुकीची तयारी आधीच सुरू केली होती, या घोषणेमुळे त्यांच्यातही उत्साह संचारला आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्ह्यात शिंदे गटाची मजबूत फळी निर्माण केली असून, त्यांच्या नेतृत्वात पक्ष निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी सज्ज आहे.

### चार वर्षांचा प्रशासकीय वनवास संपणार

**यवतमाळ जिल्हा परिषदेवर गेल्या चार वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने 'मिनी मंत्रालय'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेचा जनतेशी थेट संपर्क तुटला होता. ग्रामीण भागातील विकासकामे ठप्प झाली होती आणि नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी कोणतेही हक्काचे व्यासपीठ उरले नव्हते. आता अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने लवकरच निवडणुका होतील आणि हा प्रशासकीय वनवास संपेल, अशी आशा नागरिकांना लागली आहे.**

### बदललेली राजकीय समीकरणे, चुरस वाढणार

**गेल्या जिल्हा परिषद निवडणुकीवेळी असलेले राजकीय समीकरण आता पूर्णपणे बदलले आहे. त्यावेळी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र होते. मात्र, आता राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती असे दोन प्रमुख राजकीय गट अस्तित्वात आहेत. त्यामुळे यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. प्रत्येक पक्ष आपली ताकद आजमावण्यासाठी सज्ज झाला असून, जागावाटप आणि आघाड्या कशा होतात, यावरच जिल्हा परिषदेच्या सत्तेचे भवितव्य ठरणार आहे.**

आगामी निवडणुकीत भाजप आणि शिंदे गट एकत्र लढणार का, यावर सध्या चर्चा सुरू असून, त्यांच्या आघाडीच्या निर्णयावर अनेक राजकीय गणिते अवलंबून आहेत. एकूणच, अध्यक्षपदासाठीची चुरस वाढली असून, जिल्हा परिषदेवर कुणाची सत्ता येणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**यवतमाळ, दि. १२ :** शिक्षक दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटरच्या शिक्षण विकास मंचातर्फे शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'मूल्यांकनाच्या नव्या दिशा' हा स्पर्धेचा विषय असून, शिक्षकांनी स्वानुभवावर आधारित चिंतन मराठी किंवा इंग्रजी भाषेत मांडावे, असे अपेक्षित आहे. प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक अशा तीन गटांत ही स्पर्धा होईल. स्पर्धेसाठी १५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून, दीड हजार शब्दांतील निबंध २६ ऑक्टोबरपर्यंत पीडीएफ स्वरूपात अपलोड करायचा आहे. प्रत्येक गटातील चार उत्कृष्ट निबंधांना राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत गौरविण्यात येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षण विकास मंचचे जिल्हा मुख्य संयोजक आमीन चौहान व त्यांच्या समन्वयकांनी केले आहे.

## वणी शहरातील चौकाचौकात गतीरोधक बसविण्याची मागणी

### मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. १२ :** शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतूक नियंत्रणात आणण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी चौकाचौकात गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राज्याध्यक्ष राजु धावंजेवार यांच्या नेतृत्वात वणी नगर परिषदेचे मुख्याधिकारी याना देण्यात आलेल्या निवेदनातून केली आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते त्यातच काही दुचाकीस्वार व ऑटो चालक आपले वाहन सुसाट वेगाने हाकलत



असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख परशुराम पोटे, सौ.सुमित्राताई नारायण गोडे, यवतमाळ जिल्हा महिला संपर्कप्रमुख, यवतमाळ जिल्हा महिला उपाध्यक्षा सौ. मनिषा सुरेंद्र निब्रड, वणी शहर अध्यक्ष अजय चन्ने, वणी शहर महिला अध्यक्ष सौ प्रेमीला मनोज चौधरी, सुरेश बन्सोड प्रदेश कार्यकारिणी सदस्य, संजय चिंचोळकर, संदिप बेसरकर, राकेश दिकुंडवार इत्यादी उपस्थित होते.

## वणी येथे २० फूट खड्ड्यात कोसळला विजेचा खांब

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**वणी, दि. १२ :** येथील निर्गुडा नदीच्या काठावर असलेल्या छोरिया ले-आउटमध्ये भूस्खलन झाल्याने, एका पाचमजली इमारतीला मोठा धोका निर्माण झाला आहे. या घटनेत एक विजेचा खांब तब्बल वीस फूट खड्ड्यात कोसळल्याने, परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र घबराटीचे वातावरण पसरले आहे. प्रशासनाने यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

शहरालगतच्या गणेशपूर ग्रामपंचायत हद्दीतील 'विनायक रेसिडेन्सी' ही पाचमजली इमारत नदीकाठापासून केवळ दहा मीटर अंतरावर आहे. सततच्या पावसामुळे नदीच्या प्रवाहाने जमिनीची धूप होऊन हे भूस्खलन झाले. यामुळे विजेचा खांब वीस फूट खोल खड्ड्यात गेला, ज्यामुळे इमारतीच्या पायाला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरातील घरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, रहिवासी भीतीच्या छायेखाली आहेत. कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी, प्रशासनाने नदीकिनारी संरक्षण भिंत बांधावी किंवा इतर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी येथील भयभीत नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गोडवे ले-आउट ते महादेव मंदिर रस्त्याची चाळणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. १२ :** शहरातील गोडवे ले-आउट ते शिसोदिया ले-आउटमधील प्रसिद्ध महादेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे. रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे भाविक आणि नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असून, नगर परिषदेच्या दुर्लक्षामुळे अपघातांना निमंत्रण मिळत असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

या रस्त्यावरून दररोज शेकडो भाविक मंदिरात दर्शनासाठी येतात. मात्र, संपूर्ण रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्याने विद्यार्थी, महिला आणि वृद्ध नागरिक अनेकदा पडून जखमी होत आहेत. पाणीपुरवठा वाहिनीजवळ पाणी साचल्याने परिसरात दूषित पाणीपुरवठ्याचा धोकाही निर्माण झाला आहे. वारंवार



तक्रारी करूनही नगर परिषद प्रशासन या गंभीर समस्येकडे लक्ष देत नाही, असा आरोप नागरिक करत आहेत. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि संभाव्य अपघात रोखण्यासाठी, नगर परिषदेने रस्त्यावरील खड्डे बुजवून त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी शिवभक्त आणि परिसरातील रहिवाशांकडून केली जात आहे. प्रशासनाने लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## घाटंजी येळाबारा रस्त्यावर डंपर उलटला

### काम सुरू असतानाही वाहतूक सुरक्षेची वानवा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी , दि. १२ :** येळाबारा राज्य मार्गावर सायखेडा फाट्याजवळ असलेल्या छोट्या पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत सध्या सुरू आहे. मात्र, हे काम पावसाळ्यात सुरू केल्यामुळे स्थानिकांना आणि प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

आज सकाळी सिमेंटचे मिश्रण भरून नेणारा डंपर पुलाजवळील कामासाठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये अडकून पलटला. यामुळे काही काळ संपूर्ण वाहतूक ठप्प झाली. वाहनधारक आणि प्रवाशांना रस्त्यात तासनतास अडकून पडावे लागले. डंपर उलटल्यानंतर तत्काळ वळण रस्ता तयार करण्यात आला, परंतु योग्य नियोजनाअभावी तो देखील निष्फळ



ठरला. दुसरा मालवाहू ट्रक याच वळण रस्त्यावर फसला. हा रस्ता अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा आल्याने केवळ घाटंजी नव्हे तर आसपासच्या गावांतील नागरिकांनाही याचा फटका बसतो आहे. अपघाताचा धोका वाढत असताना कंत्राटदार कंपनी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसून येतो.या रस्त्यावर अनेक ठिकाणी पुलाच्या कामासाठी रस्त्यावर केलेल्या खड्ड्यांमुळे वाहतुकीसाठी अडचण निर्माण होत असताना कंत्राटदार कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे त्यामुळे संपूर्ण पावसाळ्यात या रस्त्यावर वाहने चालवताना वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे असे वास्तव असतांनाही संबंधित कंत्राटदार कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्यावर अपघात घडण्याची वाट बघत होते कां? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

# मुख्यमंत्र्यांच्याहस्ते आज विविध विकासकामांचा शुभारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१२, :** आदी कर्मयोगी अभियान व जिल्ह्यातील विविध विकास कामांचे लोकार्पण तसेच विविध योजनांचे लाभ वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे उद्या, शनिवारी (दि.१३ सप्टेंबर) होणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज एकूण ३३५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच शुभारंभ होत आहे. त्यात आदिवासी विकास विभागाच्या ५१ कोटी रुपये किंमतीच्या कामांचा समावेश आहे. तसेच बांधकाम विभागाची ६७ कोटींची कामे, मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजनेची १५८ कोटी व इतर विविध विभागांच्या ५९ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या मिशन कॉम्पेटेटीव्ह एक्सीसेंस, रोड मेंटेनन्स डिजीटल प्लॅटफॉर्म, ई-मित्र चॅटबॉट, मिशन उभारी, समग्र डॅशबोर्ड, प्रोजेक्ट सॅन्ड मॅप, शासन आपल्या मोबाईलवर, उठऋ ?न्ड वार रुप डॅशबोर्ड यासह इतर विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ देखील होत आहे.

यातील ई-मित्र चॅटबॉटद्वारे ३४ योजनांची माहिती केवळ २ क्लिकवर नागरिकांना उपलब्ध होणार आहे. 'उभारी' ॲपद्वारे गेल्या पाच वर्षातील ७७० आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा ऑनलाईन सर्वे करण्यात आला. या कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी 'उभारी' हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. यवतमाळ डिस्ट्रिक्ट डॅश बोर्डच्या माध्यमातून विविध



शासकीय योजनांचा रिअल टाईम आढावा आणि मॉनिटरींग करणे सोपे होणार असून कमी कालावधीत योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. जिल्हा प्रशासनाने शासन आपल्या मोबाईलवर हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. नागरिकांसाठी अतिशय उपयुक्त अशा योजना, उपक्रमांचे व्हिडिओ सोप्या भाषेत तयार करून त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात येत आहे. आतापर्यंत ५६हजार नागरिकांनी या उपक्रमाच्या चॅनेलला भेट देऊन लाभ घेतला आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात आपण अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती देण्याची मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविली. नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम सूची आपण जाहीर केली आहे. त्यातील गट क व गट ब च्या प्रत्येकी १० याप्रमाणे २० उमेदवारांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात येत आहे. तसेच लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या गट क च्या १० उमेदवारांना देखील प्रातिनिधीक स्वरुपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्ती पत्र दिले जाणार आहे. यवतमाळहा आदिवासीबहुल जिल्हा आहे. आदिम जमातीच्या विकासासाठी केंद्र शासनातर्फे आदि कर्मयोगी अभियानाची सुरूवात करण्यात आली आहे. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी १७ विभागांच्या २५ योजना-उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याला जोडून आदि कर्मयोगी अभियान हे विकेंद्रित आदिवासी नेतृत्व व आदर्श प्रशासन निर्माण करण्यासाठीची चळवळ आहे. जिल्ह्यातील ३६६ गावांचा त्यात समावेश असून, आदिवासी बांधवांना त्याचा लाभ होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून २ लाख ९४ हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे. शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेतून एक लाख २९ हजार शेतकऱ्यांचे वीज बील माफ करण्यात आले आहे. जिल्ह्यात विशेष गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत ८१ उद्योग घटकांसोबत एक हजारजार ६०३ कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून ३ हजार २४९ युवकांना तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ६ लाख ९२ हजार महिलांना लाभ दिला जात आहे. यवतमाळ जिल्ह्यात ३१५ किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग आहे. शक्तीपीठ महामार्ग जिल्ह्यातून जात असून त्याची जिल्ह्यातील लांबी १३७ किलोमीटर इतकी आहे. वर्धा यवतमाळ नांदेड रेल्वेमार्गाचे काम देखील गतीने होत आहे. हे मार्ग जिल्ह्याच्या विकासाला गती देणार आहे.

## महत्वाचे

### जनरेटरमधून डिझेलची चोरी

**कळंब :** कळंब परिसरात चोरट्यांनी आपला मोर्चा आता डिझेल चोरीकडे वळविला असून, एका टॉवरच्या जनरेटरमधून डिझेल लंपास केल्याची घटना घडली आहे. ६ सप्टेंबर रोजी घडलेल्या या घटनेत चोरट्यांनी तब्बल १० हजार १४० रुपये किमतीचे ११० लिटर डिझेल चोरून नेले. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुमित दत्तात्रय गोटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अज्ञात चोरट्यांनी मोबाईल टॉवरच्या जनरेटरचे दरवाजे तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी जनरेटरमधील सर्व डिझेल चोरून नेले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या चोऱ्या वाढल्याने चिंता व्यक्त होत आहे. गोटे यांच्या तक्रारीवरून कळंब पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### जेवायला बोलावून दगडाने हल्ला

**यवतमाळ :** बिटरगाव येथे एका तरुणाला जेवणाच्या बहाण्याने शेतात बोलावून दगडाने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ९ सप्टेंबर रोजी घडलेल्या या घटनेत, फिर्यादी आकाश विजय राठोड याला आरोपींनी जेवायला बोलावले. मात्र, तो शेतात पोहोचताच आरोपींनी त्याला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी दगडाने मारहाण करून आकाशला गंभीर जखमी केले. या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आकाश राठोड याच्या तक्रारीवरून बिटरगाव पोलिसांनी धर्मा सतीश राठोड, करण तुकाराम जाधव, विपुल इंदल मुडे आणि रोशन अनिल मुंडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

## निधन

### सीमा राऊत



**आर्णी :** तालुक्यातील अंबोडा येथील प्रतिष्ठित शिखर बँकेचे माजी संचालक रामराव राऊत पाटील यांच्या पत्नी सीमा राऊत (रा. ह.मु. शीतल नगर, काळेले -आउट, यवतमाळ) यांचे आज गुरुवारी (दि.११) दुपारी निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी (दि.१२) दुपारी १२ वाजता मूळ गाव आंबोडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

# सरकारला शेतकऱ्यांच्या लुटीचा जाब विचारा

## माजी मंत्री बच्चू कडू यांचे शेतकऱ्यांना आवाहन, नेरमध्ये 'शेतकरी हक्क यात्रे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१२ : 'गरजेल तो पडेल काय?'या म्हणीला खोटे ठरवत, माजी मंत्री बच्चू कडू यांनी नेर येथे भर पावसात जमलेल्या हजारो शेतकऱ्यांसमोर सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्ला चढवला. 'शेतकरी हक्क यात्रे'अंतर्गत आयोजित या जाहीर सभेत, देशात शेतमालाच्या भावावरून शेतकऱ्यांची लूट सुरू असून या लुटीचा जाब विचारण्यासाठी आता पेटून उठा, असे आवाहन करत त्यांनी संघर्षाची नवी दिशा दिली.**



नेर तालुका प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने स्थानिक निर्मलबन्सी लॉन येथे या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू असतानाही, बच्चू कडू यांचे विचार ऐकण्यासाठी शेतकऱ्यांनी सभेला तुफान गर्दी केली होती. प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांनी आपल्या खास शैलीत सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा समाचार घेतला. ते म्हणाले की, इथली व्यवस्थाच शेतकऱ्यांच्या विरोधात उभी राहिली आहे. या जाहीर सभेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर प्रहारच्या वतीने बच्चू कडू यांचा रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात 'प्रबोधन पंढरीचा संत कर्मयोगी गाडगेबाबा' या पुस्तकाचे लेखक संतोष आरसोड आणि पाच हजार किलोमीटरची 'सुराज्य सायकल यात्रा' पूर्ण करणारे रवी मानव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष बिपीन चौधरी यांनी केले, तर संतोष आरसोड, रवी मानव, मनोहर राठोड, गणेशआप्पा झाडे यांनीही समयोचित भाषणे केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद दरोई यांनी केले. या सभेला प्रहारचे प्रदेश कार्याध्यक्ष बल्लू जंजाळ, जिल्हाध्यक्ष बिपीन चौधरी , गौरव नाईकर, संतोष आरसोड, रवी मानव, प्रा. मनोहर देशमुख, मंगेश देशमुख आणि पंकज खानझोडे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. बच्चू कडू यांच्या या दौऱ्यामुळे आणि त्यांनी केलेल्या घणाघाती टीकेमुळेजिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

### आयत्या बिळावर नागोबा

**केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क शून्य टक्क्यांवर आणल्याने, परदेशी कापूस देशात येईल आणि स्थानिक कापसाचे भाव पाडले जातील, असा गंभीर आरोप बच्चू कडू यांनी केला. तसेच,१५ दिवसांत काढणीला येणाऱ्या सोयाबीनचा भावही सध्याच्या ३४०० रुपयांवरून ३००० पर्यंत घसरेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली . सरकारच्या या धोरणांमुळे देशातील व्यवस्थाच शेतकऱ्यांच्या विरोधात उभी राहिली आहे, असे ते म्हणाले.**

### नाव मोठे, लक्षण खोटे

**बच्चू कडू यांनी सध्याच्या आणि पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यशैलीत जमीन-अस्मानाचा फरक असल्याचे म्हटले . त्यांनी आठवण करून दिली की, स्व. वसंतराव नाईक यांनी दुष्काळात शेतकऱ्यांना मदत न मिळाल्यास आत्महत्येची धमकी केंद्र सरकारला दिली होती. याउलट, आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शेतकरी लुबाडला जात असतानाही कर्जमाफी देण्यास तयार नाहीत, अशी घणाघाती टीका त्यांनी केली .**

## CAPTION जगाचा पोशिंदाच हतबल...



**यवतमाळ : चालू खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. आर्थिक संकटात सापडले आहेत. परतीच्या पावसाचा मुक्काम २० ऑक्टोबरपर्यंत वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविल्याने चिंता अधिकच वाढली आहे. कापूस आणि सोयाबीनसारखी प्रमुख पिके पाण्याखाली गेल्याने जमीनदोस्त झाली आहेत. सततच्या पावसामुळे शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. हाताला काम नसल्याने शेतमजुरांवरही उपासमारीची वेळ आली आहे. एकीकडे पिके उद्ध्वस्त झाली असताना, दुसरीकडे लागवडीसाठी घेतलेले कर्ज कसे फेडावे, या विवंचनेत शेतकरी अडकले आहेत, अशी भीषण परिस्थिती शेतकरी नेते मनीष जाधव यांनी मांडली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बळीराजाही हवालदिल झाला आहे.**

# 'एनएचएम'कर्मचाऱ्यांचा संप मागे

## मागण्या मान्य झाल्याने आनंद; रक्तदान करून मानले आभार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१२ :** गेल्या २२ दिवसांपासून सुरू असलेले राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन गुरुवारी (दि. ११) अखेर मागे घेण्यात आले. आरोग्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मागण्या मान्य झाल्यानंतर, यवतमाळमधील कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून शासनाचे आभार मानत एक नवा आदर्श घालून दिला.



**यवतमाळ: येथील शासकीय रक्तपेढीत रक्तदान करताना 'एनएचएम'चे अधिकारी व कर्मचारी.**

१९ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या संपामुळेराज्यातील आरोग्यसेवा विस्कळीत झाली होती. अखेर आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर यांच्यासोबत झालेल्या यशस्वी बैठकीत कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. या सकारात्मक निर्णयानंतर, कर्मचारी पुन्हा कामावर रुजू झाले. आंदोलनामुळे रुग्णांना झालेल्या त्रासाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी आणि शासनाचा अभिनव पद्धतीने सन्मान करण्यासाठी, यवतमाळ येथील 'एनएचएम'च्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासकीय रक्तपेढीत रक्तदान केले. या अनोख्या उपक्रमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. आता शासनाने मान्य केलेल्या मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# बकऱ्या चारणाऱ्याच्या नावे बनविला 'इंजिनिअर'चा शिक्का!

## 'सामतदादा ऑनलाइन'च्या संचालकाचा प्रताप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि.१२ :** शासनाच्या बांधकाम कामगार योजनेसाठी बनावट प्रमाणपत्रे देण्यासाठी, चक्क बकऱ्या चारणाऱ्या व्यक्तीच्या नावाने इंजिनिअरचा बनावट शिक्का तयार केल्याचा धक्कादायक प्रकार दिग्रसमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी 'सामतदादा ऑनलाइन वर्क'चा संचालक निखिल चव्हाण याला गुरुवारी (दि. ११) ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

बांधकाम कामगारांना विविध लाभ मिळविण्यासाठी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असते. याच संधीचा फायदा घेत, आरोपी निखिल भाऊसिंग चव्हाण याने फिर्यादी राजेश जलसिंग जाधव (रा. वसंतनगर) यांच्या नावे इंग्रजीत बनावट शिक्का तयार केला. राजेश जाधव हे बकऱ्या चारत असतानाही, त्यांना इंजिनिअर दाखवून हा शिक्का तयार करण्यात आला व त्याचा गैरवापर झाला. खुद्द राजेश जाधव यांनीच याप्रकरणी तक्रार दिल्यानंतर, पोलिसांनी निखिल चव्हाणविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३४१(२), ३४१(३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी हा बनावट शिक्का जप्त केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मोर्चा

## 'ई-पीक पाहणी'तील त्रुटी दूर करा, सरसकट कर्जमाफीची मागणी



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१२ :** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी, शेतकरी चळवळ आणि संभाजी ब्रिगेडच्या नेतृत्वात शुक्रवारी (दि. १२) यवतमाळात भव्य मोर्चा काढण्यात आला. संविधान चौकातून निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला, जिथे मागण्या मान्य न झाल्यास लढा तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात, 'ई-पीक पाहणी'तील त्रुटी दूर करणे, कापूस-सोयाबीनला हमीभाव देणे, सरसकट कर्जमाफीची अंमलबजावणी आणि ओला दुष्काळ जाहीर करणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. 'शासनाने मागण्या त्वरित मान्य कराव्यात, अन्यथा हा लढा अधिक उग्र होईल,' असा इशारा शेतकरी आंदोलक सचिन मनवर यांनी दिला. या मोर्चात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे, मराठा सेवा संघाचे ज्ञानेश्वर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्षा निकम, काँग्रेसचे प्रा. डॉ. बबलू देशमुख, प्रा. पंढरी पाठे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# साहेबराव कांबळे यांच्यावर हिंगोली विधानसभेची जबाबदारी

## आगामी निवडणुकांसाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**महागाव, दि.१२ :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने पक्ष संघटनेत मोठे बदल करण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस साहेबराव कांबळे यांची हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर विश्वास दाखवत ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवातून राजकारणात आलेले कांबळे यांनी आपली राजकीय कारकीर्द उमरखेडमधून सुरू केली होती. अल्पावधीतच त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा कामाचा आवाका आणि जनसंपर्क लक्षात घेऊन, पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांना एकत्र आणणे आणि आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखणे, ही त्यांची प्रमुख जबाबदारी असेल. त्यांच्या नियुक्तीमुळे हिंगोली आणि उमरखेडमधील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. या निर्णयामुळे आगामी काळात पक्ष अधिक बळकट होईल, असा विश्वास स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. कांबळे यांनीही पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी सज्ज असल्याचे म्हटले आहे.

# कथा म्हणजे गोष्ट नव्हे, तर जीवन जगण्याची दिशा!

## मोरारी बापू : रामकथेत सातव्या दिवशी ज्ञानवर्षाव, कीर्तन परंपरेचे गायले गोडवे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** 'ऐकावे जनाचे, करावे मनाचे' यातील 'ऐकण्याला' दिशा देण्याचे काम कथा करते, असे सांगत प्रख्यात कथाकार मोरारी बापू यांनी शुक्रवारी कथेचा सखोल अर्थ उलगडला. कथा ही केवळ गोष्ट नसून, ती रूपात्मक, सूत्रात्मक, मंत्रात्मक आणि स्नेहात्मक अशा चार स्तंभांवर उभी असून, ती जीवन जगण्याची योग्य दिशा दर्शवते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

दारव्हा रोडवरील चिंतामणी बाजार समितीच्या प्रांगणात दर्डा परिवारातर्फे आयोजित रामकथा पर्वाच्या सातव्या दिवशी बापूंनी माता-पित्याच्या स्थानावर निरूपण केले. ते म्हणाले की, शास्त्रानुसार आई हे ईश्वराचे पहिले, तर वडील हे दुसरे रूप आहेत. पित्याची महिमा मोठी असली तरी त्याचा प्रभाव मर्यादित असतो, मात्र मातृभाव हा अमर्याद असतो. यानंतर त्यांनी साधूची व्याख्या स्पष्ट केली. जो वाद-विवाद टाळून समाजात राहतो, साधेपणात आनंद मानतो आणि प्रशांतता जपतो, तोच खरा साधू होय, असे बापूंनी सांगितले.




याप्रसंगी त्यांनी कीर्तन परंपरेचे महत्वही सांगितले. पूर्वेला चैतन्य महाराजांपासून ते महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, तुकोबाराय आणि पश्चिमेला नरसी मेहता, मीराबाईपर्यंत अनेक संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून देश जोडण्याचे महान कार्य केले, असे ते म्हणाले. त्यांच्या या निरूपणाने उपस्थित हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले होते. रामकथा आता केवळ एक धार्मिक सोहळा न राहता, तो एक वैचारिक आणि सामाजिक जागर बनला आहे, जिथे जीवनाच्या विविध पैलूंवर सकारात्मक चिंतन घडत आहे. या सोहळ्यात मानवतेचे दर्शन घडले. २००२ मध्ये आयोजित भागवत कथेवेळी मानव सेवा समितीकडे जमा झालेल्या निधीतून, ७० लाख रुपयांचा धनादेश नागपूरच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटला देण्यात आला. लोकमत एडिटोरिअल बोर्डचे चेअरमन डॉ. विजय दर्डा यांनी, बापूंच्या उपस्थितीत, एनसीआयचे कार्यवाहक शैलेश जोगळेकर यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द केला. याप्रसंगी समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### राजकीय आणि अध्यात्मिक संगम

**शुक्रवारी कथेला महामंडलेश्वर डॉ. संगीतकृष्ण सावरिया बाबा, खासदार प्रतिभा धानोरकर, माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, आमदार सई डहाके आणि जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या आई गोरंतीदेवी मीना उपस्थित होते. तर, शनिवारी (दि. १३) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासह रामकथेत सहभागी होणार आहेत.**

### माणूस ओळखायला शिका

**यजमान डॉ. विजय दर्डा यांनी बापूंनी मुंबईत देहविक्री करणाऱ्या महिलांची भेट घेतल्याच्या प्रसंगाचा उल्लेख केला. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा विचार महान आहे, असे ते म्हणाले. 'सुलतान भी बन जाए, तो दिल में फकीर जिंदा रख' हा शेर सादर करत त्यांनी, या महिलांच्या छळाविरोधात आपणही संसदेत आवाज उठवला होता, असे सांगितले.**

# बिअर शॉपी परवान्यासाठी चक्क 'सीओं'ची बनावट सही

## दारव्हा येथील प्रकार उघडकीस; गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दारव्हा, दि.१२ :** बिअर शॉपीचा परवाना मिळविण्यासाठी, दारव्हा नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची बनावट सही आणि शिक्का असलेले 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा घोटाळा उघड झाला असून, दारव्हा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी रामदास नामदेवराव चिरडे याने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे परवान्यासाठी अर्ज केला होता. त्यासोबत त्याने मुख्याधिकाऱ्यांच्या नावे बनावट एनओसी जोडली. अर्जात नमूद केलेला जमिनीचा सर्वे नंबरही खोटा असल्याचे तपासात समोर आले आहे. उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी विठ्ठल दत्तात्राम केदारे यांना कागदपत्रांवर संशय आल्याने, त्यांनी पडताळणी केली असता हा प्रकार उघड झाला. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी रामदास चिरडेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. यामागे बनावट सरकारी शिक्के आणि कागदपत्रे तयार करणारे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा संशय पोलिसांना असून, त्या दिशेने सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.

# शेतकऱ्याची सव्वातीन लाखांनी फसवणूक

**राळेगाव, दि. १२ :** ट्रॅक्टरच्या व्यवहारात 'एनओसी' आणून देतो, असे सांगून एका व्यक्तीची तब्बल ३ लाख २५ हजार रुपयांनी फसवणूक केल्याची घटना राळेगाव येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गजानन बापुरावजी निमट यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी प्रीतम अरविंद विरूटकर याने त्यांना ट्रॅक्टरचे पैसे थेट बँकेत न भरता, 'आरटीजीएस'द्वारे स्वतःच्या खात्यावर टाकण्यास सांगितले. पैसे मिळताच 'एनओसी' आणून देतो, असे आश्वासन त्याने दिले होते. निमट यांनी विश्वास ठेवून रक्कम आरोपीच्या खात्यावर वर्ग केली, मात्र त्यानंतर आरोपीने एनओसी दिली नाही आणि पैसेही परत केले नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली.